डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक १ ला, प्रकाशक: पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य

मे - २०२५

## पशुधन हिताय: बहुजन सुखाय:



छायाचित्र स्रोत: इंटरनेट

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे -४११०६७

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पशुसंवर्धन आयुक्तालय,**

महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

**वर्ष १ ले, अंक १ ला**

**मे - २०२५**

**संपादक**


**डॉ. प्रशांत भड**

उपआयुक्त पशुसंवर्धन

(पशुधन व कुक्कुट)

पशुसंवर्धन आयुक्तालय,औंध, पुणे-६७


**पशुसंवर्धन विभाग**

**टोल फ्री क्रमांक :**

**१८००-२३३-०४१८**

**राज्यस्तरीय कॉल सेंटर**

**संपर्क क्र : १९६२**

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**


**पशुसंवर्धन आयुक्तालय,**

**महाराष्ट्र राज्य,**

**औंध, पुणे - ४११००७**

Email: mahapshudhanvarta@gmail.com



या अंकात व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी तसेच लेखांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).




## या अंकात...


१. **पशुसंवर्धन विभागाची वाटचाल** (प्रमुख संस्था परिचय)

२. **राष्ट्रीय पशुधन अभियान** अंतर्गत उद्योजकता विकास परिषद

३. **देशी गोवंश परिपोषण योजना:** राज्यातील ५६० गोशाळांना लाभ

४. **१९६२ महापशुधन संजीवनी हेल्पलाईन:** सुविधा उद्घाटन

५. **अधिवक्ता कार्यशाळा:** गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अधिवक्ता कार्यशाळेचे वृत्त

६. **पशुसंवर्धनाच्या माध्यमातून उद्योजक बना:** मा. पंकजा मुंडे, मंत्री पशुसंवर्धन व पर्यावरण

७. पशुसंवर्धन विभागाचा १०० दिवसांचा नियोजन आराखडा

८. **संकल्पना व व्याप्ती:** महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम २०२३

९. **राष्ट्रीय पशुधन अभियान:** अंतर्गत उद्योजकता विकास योजना

१०. **गाई-म्हशीतील वंध्यत्व:** कारणे व उपाययोजना

११. उन्हाळ्यातील दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन

१२. **प्रभावी जैवसुरक्षा उपाय योजना:** बर्ड फ्लू प्रसार रोखण्याकरिता महत्वाचे साधन

१३. पशुसंवर्धनाची धरली कास, परसातील कुक्कुटपालनाने झाला गावाचा विकास

१४. परसातील कुक्कुटपालन: शाश्वत अर्थाजनाचा एक उत्तम स्त्रोत

सत्यमेव जयते



**श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,**
**मुंबई-३२**

## !! शुभसंदेश !!

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत पशुधनाला अनन्यसाधारण महत्व आहे. कृषी क्षेत्रासाठी केवळ पूरक नव्हे, तर हमखास उत्पन्न मिळवून देणारा पूर्णवेळ व्यवसाय म्हणून पशुसंवर्धनाच्या व्यवसायाकडे पाहिले जाते. प्रगत व उन्नत महाराष्ट्राच्या निर्मितीत सातत्याने भरीव योगदान देणाऱ्या पशुसंवर्धन विभागाकडून योजना, उपचार व सेवांची व्यापकता आणखी वाढविण्यासाठी करण्यात येत असलेले सकारात्मक प्रयत्न अभिनंदनीय आहेत.

राज्यात सर्वदूर निर्माण झालेल्या विकासात्मक वातावरणात आधुनिक तंत्रज्ञानाची होत असलेली उपलब्धता यामुळे पशुसंवर्धनाच्या व्यवसायाचे स्वरुप बदलत आहे. महाराष्ट्रातील पशुपालकही या संक्रमणात आपल्या व्यवसायात आधुनिक पशुपालन पद्धतीचा पुरस्कार करु लागला आहे. यास पूरक म्हणून पशुपालकाला शासनाच्या विविध योजना, पशुसंवर्धनविषयक ध्येयधोरणांची माहिती व उत्तम व्यवसाय पद्धती, याबाबतची माहिती सातत्याने उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

सध्याचे युग हे संगणकाचे युग आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत असली तरी, बऱ्याचदा त्या माहितीची अचूकता व प्रमाणीकरणाबाबत साशंकता असते. त्यामुळे राज्यातील पशुपालकाला सजग व व्यवसायसाक्षर करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने 'महापशुधन वार्ता' या डिजीटल स्वरुपातील मासिकाच्या प्रकाशनाचा घेतलेला निर्णय स्तुत्य व पर्यावरणपूरक वाटतो. विभागाच्या या महत्वपूर्ण उपक्रमातंर्गत प्रकाशित करण्यात येत असलेल्या 'महापशुधन वार्ता' या डिजीटल मासिकाच्या पहिल्या अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(देवेंद्र फडणवीस)**



**श्री. एकनाथ संभाजी शिंदे**

**उपमुख्यमंत्री तथा मंत्री** नगरविकास गृहनिर्माण,
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

राज्यामध्ये विकासाचे सर्वव्यापी संक्रमण वेगाने होत असून, शासनाचे सर्व विभाग गतिमान प्रशासनासाठी अनुषंगिक उपक्रमांचा करीत असलेले आयोजन प्रगत व उन्नत महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर अग्रभागी कायम ठेवणारी आहे.

राज्याच्या विकासात इतर विभागांप्रमाणेच पशुसंवर्धन विभागाचे योगदानही नेहमीच उल्लेखनीय राहिले आहे. पशुसंवर्धनाशी निगडीत विविध व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा हा विभाग अनेक नाविण्यपूर्ण उपक्रमांतून राज्याच्या महसुली उत्पन्नात भरीव योगदान देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिला आहे.

'पशुधन हिताय: बहुजन सुखाय' चा मंत्र देत राज्यातील बेरोजगारीची समस्या निकाली काढण्यासाठी पशुसंवर्धन विभाग क्षेत्रीय स्तरावर विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करतो आहे. याशिवाय पशुपालकांना व्यावसायिक व्यवस्थापनाचे ज्ञान व पशुसंवर्धनविषयक संकिर्ण माहिती पुरविण्यासाठी विभागाने 'महापशुधन वार्ता' या शिर्षकाखाली डिजीटल मासिक सुरु करण्याचा केलेला प्रयत्नही प्रशंसापात्र आहे. या मासिकाच्या माध्यमातून पशुपालकांना विभागाच्या योजना, घटना, उपक्रम, कार्यमोहिमा, यशोगाथा, सेवा, संशोधन, प्रशिक्षण आदी विविध विषयांची माहिती सहजपणे मिळेल, अशी मी खात्री बाळगतो. पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधन वार्ता' या डिजीटल मासिकाच्या प्रथम अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(एकनाथ संभाजी शिंदे)**

सत्यमेव जयते



**श्री.अजित अनंतराव पवार**
उपमुख्यमंत्री तथा मंत्री वित्त व नियोजन, राज्य
उत्पादन शुल्क, अन्न, नागरी पुरवठा व
ग्राहक संरक्षण महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

शेतीसाठी निविष्ठा, व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक सक्षमता निर्माण करून ग्रामीण अर्थचक्राला गतिमान करणारा व्यवसाय म्हणजे पशुसंवर्धनाचा व्यवसाय होय. महाराष्ट्राला नेहमीच प्रगतीपथावर ठेवण्यात पशुसंवर्धन विभागाचा वाटा मोठा राहिला आहे.

पशुसंवर्धन विभागाने शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वाटचालीतही ग्रामीण भागातील प्रत्येक समाजघटकाला सर्वांगीण विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेण्याचे काम सातत्यपूर्वक केले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांमुळे आज ग्रामीण भागात विकास आणि प्रगतीचे वारे वेगाने वाहू लागले आहेत. विकासाचे हे संक्रमण, तसेच धवलक्रांतीच्या कार्यकक्षा अधिक व्यापक व लोकाभिमुख करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने 'महापशुधन वार्ता' या नावाने डिजीटल इ-मासिक प्रकाशित करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे.

'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाच्या माध्यमातून पशुपालक व शेतकरी बांधवांना एक नवी व्यावसायिक दृष्टी व आत्मविश्वास देण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभाग यशस्वीपणे करेल, याची मला खात्री आहे. पशुपालक, शेतकरी व पशुसंवर्धनाचा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुण वर्गाला हे मासिक निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे. पशुसंवर्धनात राज्याला प्रगतीपथावर ठेवण्यासाठी विभागाचे हे व्यापक व सकारात्मक प्रयत्न आगामी काळात ग्रामीण व शहरी भागात प्रतिबिंबित होतील, अशी अपेक्षा आहे. 'महापशुधन वार्ता' या डिजीटल इ-मासिकाच्या पहिल्या अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(अजित अनंतराव पवार)**

सत्यमेव जयते



**श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे**
मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरण
बदल महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

प्रादेशिक गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध व संपन्न असलेले आपले महाराष्ट्र राज्य आज देशाच्या सर्वांगीण विकासात भरीव योगदान देणारे राज्य म्हणून गौरवान्वित होत आहे. राज्याच्या या गौरवशाली वाटचालीत पशुसंवर्धन विभागाचेही योगदान मोलाचे राहिले आहे. पशुसंवर्धनविषयक विविध योजना, संशोधन, सेवा व उपक्रमांच्या अंमलबजावणीतून ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र आणखी गतिमान करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने -महापशुधन वार्ता॰ या नावाने डिजीटल इ-मासिक सुरु करण्याचा घेतलेला निर्णय नक्कीच पशुपालक शेतकरी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करणारा आहे.

आगामी काळात पशुजन्य उत्पादनांच्या निर्मिती प्रक्रियेत राज्यास अव्वल करणे, पशुसंवर्धनविषयक जास्तीत जास्त उद्योग व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, संख्यात्मक पशुधनापेक्षा गुणात्मक पशुधनाच्या वृद्धीस चालना देणे व कालसुसंगत अभिनव तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आधुनिक पशुपालनाची व्यापकता राज्यभर वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे.

पशुसंवर्धन विभाग प्रकाशित करीत असलेले -महापशुधन वार्ता॰ हे डिजीटल इ-मासिक पशुपालक शेतकरी बांधवांना निश्चितच प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास आहे. विभागाचे हे सकारात्मक प्रयत्न ग्रामीण व पर्यायाने शहरी विकासाला अपेक्षित गती प्रदान करणारे ठरतील याची खात्री आहे. 'महापशुधन वार्ता' या डिजीटल इ-मासिकाच्या प्रथम अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(पंकजा गोपीनाथ मुंडे)**

सत्यमेव जयते



**डॉ. रामास्वामी एन.** (भा.प्र.से.)
सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

सद्यस्थितीत निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीव्यवसायात काहीशी अनिश्चितता निर्माण झाली असली, तरी शेतीला पूरक किंबहुना मुख्य व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी पशुसंवर्धनाशी संबंधित व्यवसायाची वाट निवडणे गरजेचे बनले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या योजनांचा शेतकरी बांधवांना लाभ देत त्यांच्यामध्ये पुन्हा नवी उमेद जागविण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभाग सातत्याने करीत आहे.

आगामी काळात आपल्या महाराष्ट्र राज्यात संख्यात्मक नाही, तर गुणात्मक पशुधनाची पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाने प्रभावी धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यानुषंगाने शेतकरी व पशुपालक बांधवांशी संवाद साधण्यासाठी पशुसंवर्धन विभाग विविध माध्यमातून प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून पशुसंवर्धन विभाग 'महापशुधन वार्ता' या डिजीटल स्वरुपातील मासिकाचे प्रकाशन करीत आहे.

पशुपालक व शेतकरी बांधवांना अधिकाधीक मार्गदर्शक व सहाय्यभूत ठरेल, यादृष्टीने सदरच्या मासिकाचे नियोजन करण्यात आले आहे. सरत्या वित्तीय वर्षातील गोडकडू आठवणींचा संदर्भ जपत नवीन वित्तीय वर्षातील ध्येय व संकल्पांच्या पूर्तीसाठी पशुसंवर्धन विभाग तुमच्या साथीने कार्यरत आहे. हा संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी पशुपालक शेतकरी बांधवांचा प्रतिसाद व त्यांचेशी संवादही तितकाच आवश्यक आहे. त्याकरिताच 'महापशुधन वार्ता' या डिजीटल मासिकाच्या प्रकाशनातून आपल्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहोत. 'महापशुधन वार्ता' या डिजीटल अंकाच्या पहिल्या अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(डॉ. रामास्वामी एन.)**

सत्यमेव जयते



**डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.)**

आयुक्त पशुसंवर्धन , महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

## !! शुभसंदेश !!

कोणताही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी व्यावसायिक दृष्टीकोनातून विचार व अनुरुप कार्यवाही होणे अत्यंत गरजेचे आहे. पूर्णत: व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून पशुसंवर्धनाचा व्यवसाय केल्यास हा व्यवसाय शाश्वत अर्थाजनाचे उत्तम माध्यम बनतो. पशुपालकांना दूध, दुग्धजन्य पदार्थ, अंडी व मांस या उत्पादनांमध्ये वाढ करण्याबरोबरच संघटीत व्यवसायाद्वारे विपणनाच्या संधी उपलब्ध करुन देत त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग विविध योजनांच्या माध्यमातून परिश्रम घेत आहे.

पशुजन्य उत्पादनांना सातत्याने वाढत असलेली मागणी व त्या तुलनेत कमी होणारा पुरवठा लक्षात घेता पशुसंवर्धनाच्या व्यवसायात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करण्याची क्षमता आहे. त्यामुळे तरुणांनी तसेच शेतकरी बांधवांनी आर्थिक स्थिरता साधत राज्याच्या विकासात योगदान देण्यासाठी पशुसंवर्धनाशी निगडीत व्यवसायांची निवड करणे गरजेचे आहे. विविध योजनांच्या माध्यमातून भरीव अनुदान देत बेरोजगारांना उद्योजक बनविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे.

पशुपालकांना नियमित मार्गदर्शन करण्यासाठी तसेच विभागातंर्गत सुरु असलेले कार्य, मोहिमा, उपक्रम व योजना यासह तांत्रिक माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी विभागाने -महापशुधन वार्ता॰ हे डिजीटल मासिक सुरु केले आहे. 'महापशुधन वार्ता' या डिजीटल इ-मासिकातील विविध तांत्रिक विषयांवर आधारीत लेख, विभागाचे उपक्रम व योजना तसेच ध्येयधोरणे याबाबत पशुपालकांना माहिती व मार्गदर्शन होऊन त्यांना आपले व्यावसायिक नियोजन आणि वाटचाल प्रशस्त करणे शक्य होईल, अशी मला खात्री आहे.

या मासिकासाठी सहायक संपादक म्हणून डॉ. सुभाष बोरकर (पशुधन विकास अधिकारी (विस्तार,पसं- १३)), प्राप्त लेखांचे संकलन, संपादन, मांडणी व सजावटीचे काम श्री. संतोष पवार (पशुधन पर्यवेक्षक, 'महापशुधन वार्ता' कक्ष) व मसुदा अंतिम करण्याचे कार्य तांत्रिक समितीने केले आहे. विभागातील सर्व अधिकारी वर्गाच्या सांघिक प्रयत्नातून प्रकाशित होत असलेल्या सदर मासिकाच्या प्रथम अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**(डॉ. प्रवीणकुमार देवरे)**




# १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम

## पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचा दुहेरी सन्मान

**मुंबई:** शासनात लोकाभिमुखता आणणारा '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला असून, पहिल्या टप्प्यात १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाला दुहेरी सन्मान प्राप्त झाला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मा. सचिव (पदु) श्री. रामास्वामी एन. यांना अभिनंदन पत्र देऊन गौरविण्यात आले.

मंत्रालयात १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमांबाबत प्रथम क्रमांक प्राप्त कार्यालयांचे सादरीकरण, राज्य स्तरांवरील सर्वोत्कृष्ट कार्यालयांना प्रशस्तिपत्र वितरण, धोरणात्मक बाबी, कार्यक्रमासंदर्भात उत्कृष्ट काम केलेल्या मंत्रालयीन विभागांचा व अधिकाऱ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे व प्रभारी मुख्य सचिव मा. राजेश कुमार यांचेसह मंत्रीमंडळातील सदस्य व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पशुसंवर्धन विभागाने '१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' या उपक्रमातंर्गत मा. सचिव (पदु) श्री. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयां-

कार्यालयांसाठी ७ कलमी कृति आराखडा तयार केला आहे. यामध्ये विभागाचे संकेतस्थळ अद्यावतीकरण, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयीन सोयीसुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी व गुंतवणूक प्रसार या बाबींचा समावेश होता. या लक्ष्यांकित बाबींची १०० टक्के पूर्तता करण्यासोबतच पशुसंवर्धन विभागाने ई-ऑफिस प्रणालींतर्गत आवश्यक सर्व सुविधा कार्यान्वित केल्या आहेत. याशिवाय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाजासाठी कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर देण्यात आला आहे.

'१०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' या उपक्रमातंर्गत पशुसंवर्धन विभागाने बीएसएल-२ व बीएसएल-३ प्रयोगशाळेच्या नविन इमारतीमध्ये कार्यान्वयन, शेळ्यांमधील देवी व लंपी चर्म रोग प्रतिबंधक लस निर्मिती, १०० टक्के रोगप्रतिबंधक लसीकरण, पुणे येथे c-GMP मानकांनुसार राष्ट्रीय संदर्भ लस चाचणी प्रयोगशाळेचे कार्यान्वयन, खनिज मिश्रण निर्मिती केंद्र, नागपूरचे कार्यान्वयन तसेच दि. २५ नोव्हेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत २१ व्या राष्ट्रीय पशुगणनेचे कार्य पशुसंवर्धन विभागाने पूर्ण केले. या पशुगणनेसाठी ७४७७ प्रगणक व १४२४ पर्यवेक्षकांची नेमणूक करत पशुसंवर्धन विभागाने विहित मुदतीत पशुगणनेचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

मंत्रालयात १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमातंर्गत आयोजित गौरव सोहळ्यात पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचा दुहेरी सन्मान झाल्यामुळे विभागातील अधिकारी-कर्मचारी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दि.६ मे ते २ ऑक्टोबर २०२५ हा पुढील १५० दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यासाठी विभागाने पूर्ण क्षमतेने नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.



# पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



महाराष्ट्र शासन

अभिनंदन पत्र

राज्यात नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर शासनाच्या सर्व ४८ विभागांनी "१०० दिवसांचा धोरणात्मक बाबींचा कार्यक्रम" हाती घेतला. या कार्यक्रमाद्वारे महत्त्वाची नवीन धोरणे, दूरगामी निर्णय व लोकाभिमुख उपक्रमांची आखणी सुरु केली. या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत आपल्या विभागाकरिता निश्चित करण्यात आलेली सर्व १८ उद्दिष्टे आपण १००% पूर्ण केली आहेत.

या परिवर्तनशील व सर्वंकष विकासाच्या वाटचालीच्या मोहिमेत आपल्या विभागाने केलेल्या अतिशय प्रभावी कामगिरीबद्दल आपले व आपल्या चमूचे हार्दिक अभिनंदन. तसेच भविष्यातील अशाच उत्कृष्ट कामगिरीसाठी आपणास मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)
मुख्यमंत्री

(अजित पवार)
उप मुख्यमंत्री

(एकनाथ शिंदे)
उप मुख्यमंत्री

श्री. एन. रामास्वामी,
सचिव (पशुसंवर्धन विभाग)

स्थळ: मुंबई
दिनांक: ७ मे २०२५



# पशुसंवर्धन विभागाची वाटचाल

पशुसंवर्धन हा शेतकरी व पशुपालकांचा बारमाही व्यवसाय आहे. पशुसंवर्धन हा व्यवसाय शेतीस पूरक तर आहेच, परंतु आजच्या गतीमान युगात या व्यवसायास उद्योगाचे स्वरूप आले आहे. पशुसंवर्धनामुळे शहरी तसेच ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध झाला आहे. पशुपालन क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीची जास्तीत जास्त क्षमता आहे. पशुसंवर्धनाच्या विविधांगी प्रकारांनी पशुपालक व पशुसंवर्धनाशी निगडीत असलेल्या सर्व व्यवसायांची भरभराट झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील जनसामान्यांचा आर्थिक विकास होऊन त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मोठा हातभार लागत आहे.

पशुसंवर्धनामुळे व्यक्ती व समाजाच्या उन्नतीबरोबरच हा व्यवसाय राष्ट्रीय उत्पन्नात भर घालण्यास निश्चितच मदत करतो. कारण, या व्यवसायातून निर्मित उत्पादने उदा. दूध, मांस, अंडी व इतर पदार्थ व उपपदार्थ यांच्या निर्यातीमुळे देशास परकीय चलन प्राप्त होते. ही महत्त्वाची पार्श्वभूमी लक्षात घेवून पशुसंवर्धनाच्या विकास व वाढीसाठी सातत्याने आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, जसे की कृत्रिम रेतनाच्या सुविधा आणि पशुआरोग्यासाठीच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानंतरही हा विभाग आपली गौरवशाली वाटचाल कायम राखून आहे.

## पशुसंवर्धन विभागाची पंचसुत्री

पशुसंवर्धन विभागामध्ये काम करताना १) पशुपैदास सुधारणा (Breeding) २) पशुधनाचे आरोग्य (Animal Health) ३) वैरण विकास (Fodder), ४) पशुखाद्य (Feed) आणि ५) पशुधनाचे व्यवस्थापन (Management) ही पंचसुत्री अंमलात आणण्यात येत आहे.

- **पशुपैदास सुधारणा**: या कार्यक्रमामध्ये अनुवांशिक सुधारणा व नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून उच्च गुणवत्ता व उत्पादकता असलेल्या पशूंची पैदास व त्यांच्या नवीन जातींची ओळख करून त्यांची उत्पादकता वाढविणे.
- **पशुधनाचे आरोग्य**: यामध्ये प्रतिबंधात्मक (प्रेसेंटेटिव्ह), प्रवर्तक (प्रोमोटिव्ह), उपचारात्मक (क्युरेटिव्ह) उपाययोजना करून पशुउद्योजकांना गुणवत्तापूर्ण पशुवैद्यकीय सेवा देणे.
- **वैरण विकास**: उच्च पोषणमूल्य असलेल्या पौष्टिक वैरणीची निर्मिती करणे, मुरघास, वैरणीच्या विटा अशा स्वरूपाच्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करुन वैरण विकास धोरणांची अंमलबजावणी करणे.
- **पशुखाद्य**: उच्च पोषणमूल्य असलेल्या व पौष्टिक पशुखाद्याच्या उत्पादनास व वापरास प्रोत्साहन देणे.
- **पशुधनाचे व्यवस्थापन**: पशु व्यवस्थापनाच्या सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करणे व त्यास चालना देणे.

कॅबिनेट दर्जाचे मंत्री हे पशुसंवर्धन विभाग प्रमुख आहेत. सचिव (पदुम) विभागातील प्रशासकीय विभाग प्रमुख आहेत. क्षेत्रीय यंत्रणाचे नेतृत्व आयुक्त पशुसंवर्धन करतात. सचिव (पदुम) यांच्या नियंत्रणाखाली विभागप्रमुख या नात्याने आयुक्त पशुसंवर्धन यांच्या प्रशासकीय नियंत्रण व निर्देशनाने पुणे येथील मुख्यालयाकडून विभागाचे नियंत्रण व प्रशासन केले जाते. पशुरोग अन्वेषण विभाग, पुणे- ४११०६७ , पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था पुणे- ४११००७ व इतर प्रमुख संस्थांचेही नियंत्रण व प्रशासन आयुक्त कार्यालयाकडून केले जाते. त्याचप्रमाणे आयुक्त कार्यालयाकडे प्रादेशिक व जिल्हास्तरीय कार्यालयांचे नियंत्रण व प्रशासन आहे. पशुसंवर्धनाची प्रमुख उद्दिष्टे व योजना पार पाडण्यासाठी राज्याचे एकूण सात विभाग असून, या विभागांचे प्रमुख म्हणून प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (७) हे नियंत्रण व प्रशासनाचे कार्य करतात. जिल्हास्तरावर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी नियंत्रण व प्रशासनाचे कार्य करीत करतात.

## दृष्टी, ध्येय, उद्दिष्ट्ये व कार्ये




**ध्येय:**

राज्यातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पशुजन्य पदार्थांची उदा. दूध, अंडी व मांस यांची मागणी व उपलब्धता यात असलेली तफावत दूर करणे व त्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करून ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करणे.

## उद्दिष्ट्ये व कार्ये

राज्यासाठी पशुधन धोरण तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन या विभागाचे प्रमुख कार्य आहे. विभागातंर्गत कार्यरत असलेल्या विविध संस्था व पदाधिकारी यांच्या माध्यमातून योजना व योजनेत्तर निधीमधून विविध विकासविषयक योजनांची अंमलबजावणी करून हे कार्य पार पाडण्यात येते. विभागाच्या प्रमुख कार्यांमध्ये खालील महत्त्वाच्या बाबींचा समावेश होतो:-

- **पशुपैदास धोरणांची प्रभावी अंमलबजावणी:** कृत्रिम रेतनाद्वारे पशुधनामध्ये अनुवंशिक सुधारणा घडवून उत्पादकता वाढविणे.
- पशुधनाचे रोगराईपासून संरक्षण करुन दूध, अंडी, मांस, लोकर या पशुजन्य उत्पादनांची निर्मिती वाढविणे.
- ग्रामीण शेतकरी व गरजू लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे, शेळी गट, कुक्कुट पक्षी वाटप करुन स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे.
- पशुधनास लागणाऱ्या वैरण व पशुखाद्याची क्षेत्रीय स्तरावर उपलब्धता वाढविणे.
- पशुधनास लागणाऱ्या लसींची निर्मिती करणे.
- प्रसिध्दी व प्रचार कार्यक्रमातंर्गत पशुपालकांपर्यंत पशुसंवर्धनविषयक योजनांची माहिती पुरविणे. तसेच राज्यस्तरीय प्रशिक्षण धोरणाची अंमलबजावणी करणे.
- पशुसंवर्धनविषयक सेवा व प्रशासकीय सेवा आधुनिक व गतीमान करणेसाठी आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.

# महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ

प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करणे अधिनियम, १९६० या कायद्यातील तरतुदींनुसार या अधिनियमाखाली प्राण्यांच्या कल्याणासाठी भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड (एडब्ल्यूबीआय) या संवैधानिक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. बोर्डाचे मुख्यालय बल्लभगड, जि. फरिदाबाद, हरियाना येथे कार्यरत आहे. केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे राज्यात प्राणी कल्याण कायद्यांचे संनियंत्रण करणे आणि प्राण्यांना होणाऱ्या अनावश्यक वेदनांपासून संरक्षण देणे यासाठी महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पुणे स्थापन करण्यात आले आहे. राज्यात ३६ जिल्हास्तरीय प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी गठीत करण्यात आल्या आहेत. मा. उच्च न्यायालय यांचे आदेशानुसार महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदे सनियंत्रण समितीही स्थापन करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ

- मंडळावर शासनाने नियुक्त केलेले राज्यातील एक संसद सदस्य / विधानमंडळ सदस्य हे अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत.
- **पदसिध्द सदस्य :** प्रधान सचिव (पदुम), आयुक्त (पशुसंवर्धन), आयुक्त (दुग्धव्यवसाय), आयुक्त (मत्स्यव्यवसाय), आयुक्त (कृषि), मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पोलीस महासंचालक, आयुक्त (परिवहन), महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह मुंबई.
- **पदसिध्द सदस्य सचिव:** अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन
- शासनाने नामनिर्देशीत केलेले बृहन्मुंबई परिसरातील २ अशासकीय सदस्य व राज्याच्या इतर क्षेत्रातील १० अशासकीय सदस्य अशा एकूण १२ सदस्यांची संरचना करण्यात आली आहे.
- मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व १२ अशासकीय सदस्य यांचा कार्यकाल नेमणुकीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा आहे.
- अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड माहे जुलै २०१६ व १२ अशासकीय सदस्य यांची निवड माहे जून २०१७ मध्ये करण्यात आलेली असून, त्यांचा तीन वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेला असल्याने त्यांची नियुक्ती प्रस्तावित आहे.



## जिल्हास्तरीय प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी (एसपीसीए)

- जिल्हाधिकारी हे या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष, तर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे पदसिध्द सदस्य सचिव आहेत.
- जिल्हा पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.), प्रादेशिक परिवहन अधिकारी, जिल्हा वन अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, महानगरपालिकेचे प्रतिनिधी हे पदसिध्द सदस्य आहेत. शासनाने नामनिर्देशीत केलेले १०-११ अशासकीय सदस्य अशा एकूण २१-२२ सदस्यांची संरचना करण्यात आली आहे.
- सर्व जिल्ह्यात अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली आहे.
- सदर मंडळाचे अशासकीय सदस्य यांचा कार्यकाल त्यांच्या नेमणूकीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा आहे.
- सर्व जिल्ह्यांमध्ये सोसायटीची नोंदणी करण्यात आली आहे.

## कार्ये व उद्दिष्टे

- प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम,१९६० व त्याअंतर्गत लागू असलेले नियम याची अंमलबजावणी करणे.
- प्राणी कल्याणासाठी प्रयत्न करणे आणि त्यांना अनावश्यक होणाऱ्या वेदनांपासून संरक्षण देणे.
- प्राणी क्लेष प्रतिबंधक कायदा अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारला मार्गदशन करणे.
- प्राण्यांना वाहतुकी दरम्यान होणाऱ्या वेदना किंवा त्यांच्या बंदीस्त अवस्थेस प्रतिबंध करत वैधानिक बाबींसंबंधी सल्ला देणे.
- माल वाहतुकीच्या गाड्यांमध्ये प्राण्यांना कमीत कमी त्रास व्हावा, या दृष्टिने वाहनाच्या रचनेमध्ये सुधारणा करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.



• जनावरांना योग्य निवारा, पाणी, वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावा यादृष्टिने योग्य मार्गदर्शन करणे.

• प्राण्यांची कत्तल करताना प्राथमिक अनावश्यक वेदना टाळण्यासाठी तसेच कत्तलखान्यांच्या रचनेत सुधारणा करण्यासाठी स्थानिक संस्थांना मार्गदर्शन करणे.

• प्राणी कल्याण संस्थांना अर्थसहाय्याची शिफारस करणे व अशा प्राणी कल्याण संस्था स्वत:च्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यास उत्तेजन देणे.

• सेवाभावी संस्थांच्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमधील पशुवैद्यकीय उपचारासंदर्भात राज्य शासनास सल्ला देणे.

• प्राण्यांवर दया करणे, त्यांचा छळ केला जावू नये याकरिता लोकांमध्ये जागृती निर्माण करणे.

• त्याकरिता मेळावे, प्रशिक्षण शिबीरे आयोजित करणे, पुस्तकांची छपाई करणे, दूरसंचार माध्यमांद्वारे प्रसार करणे.

## जिल्हास्तरीय प्राणीक्लेश प्रतिबंधक सोसायटीचे कामकाज:

• प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करणे अधिनियम, १९६० अंतर्गत लागू करण्यात आलेले विविध नियम, जसे, जनावरांची वाहतूक नियम २०११, कत्तलखाने नियम २००१, कुत्र्यांचे जन्मदर नियंत्रण नियम २००१ इ. नियमांचे संनियंत्रण करणे.

• सोसायटीची नोंदणी करणे, विविध प्रकारच्या देणग्या स्विकारणे, जिल्हा निधीतून राज्य शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन घेणे.

• पेट शॉप रुल्स तसेच डॉग ब्रिडींग एन्ड मार्केटींग रुल्स या नियमातंर्गत दुकान / संस्थांच्या नोंदणीसाठी आवश्यक तपासणी करणे व अहवाल सादर करणे.

• प्राण्यांवर उपचार करण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे व यासाठी जिल्ह्यातील शासकिय पशुवैद्यकीय संस्थांची मदत घेणे. जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाचा विस्तार करणे.

• जिल्ह्यात प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणे. प्राणी जन्म नियंत्रणाचे प्रशिक्षण देणे.

• जिल्हा मुख्यालयापासून १५-२० किमीचे अंतरामधील १-४ एकर जागा निश्चित करुन एसपीसीए यांना देणे. एसपीसीएने योजना तयार करणे. किमान २-३ तपासणी अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

• जिल्ह्याचा एक हेल्पलाइन नंबर तयार करुन कार्यान्वित करणे.

• **टेलिफोन :** ०२०२५६९०४८४

• **ईमेल :** cah.addcom-mh@gov.in

• **पत्ता :** महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ



# महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद

महाराष्ट्र राज्यामध्ये भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा दि.१.८.१९९७ पासून लागू करण्यात आला. भारतीय पशुवैद्यकीय परिषद कायदा, १९८४ अंतर्गत महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद ही राज्यस्तरीय स्वायत्त संस्था केंद्रीय कायद्यातंर्गत स्थापन करण्यात आलेली आहे. या परिषदेची कार्यवाही दि. २६.६.१९९८ पासून पुणे येथे सुरू झाली. दि. ३१.३.२००१ चे शासन निर्णयाप्रमाणे दि. ६.७.२००१ पासून नागपूर मुक्कामी परिषदेचे कार्यालय स्थलांतरीत झाले आहे. महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेची पहिली निवड समिती दि. २६.८.२००९ पासून मतदानाद्वारे अस्तित्वात आली.

**परिषदेचे ध्येय:**

१. भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा १९८४ स्टेटमेंटचे परिशिष्ट १ व २ अंतर्गत मान्याताप्राप्त अर्हताधारक पदवीधर पशुवैद्यकांची त्यांच्या विनंतीनुसार नोंदणी करणे.

२. प्रत्येक ५ वर्षांनी नोंदणीचे नुतनीकरण करणे.

३. पदव्युत्तर अर्हतेची नोंद करणे.

४. इतर राज्यामध्ये बदलून जाणाऱ्या नोंदणीकृत उमेदवारांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे तसेच इतर राज्यामधून बदलून येणाऱ्या नोंदणीकृत व्यक्तीची नोंदणी करणे.

५. पदवीपूर्व काळात प्रात्यक्षिक अभ्यासक्रमाकरिता तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देणे.

६. भारतीय पशूवैद्यक परिषद कायदा, १९८४ मधील विविध कलमातील तरतुदीची व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे व त्यांचे संनियंत्रण करणे.

७. "मिनीमम स्टँडर्ड ऑफ व्हेटरनरी एज्युकेशन रेग्युलेशन्स १९९३" बाबत कार्यवाही करणे.

८. १९९२ च्या नोंदणी संदर्भातील रेग्युलेशन्सचे संनियंत्रण.

९. पशुसंवर्धन खाते व शासनाला कायद्यातील तरतुदीच्या संदर्भात माहिती पुरविणे व मार्गदर्शन करणे.

१०. कायद्यातील तरतुदीनुसार पशुधन पर्यवेक्षक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन व आयुक्त पशुसंवर्धन या व इतर पदांच्या सेवाभरती नियमामधे सुधारणा करण्यास्तव शासनास मार्गदर्शन करुन पाठपुरावा करणे.



११. कायदेशीर अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालय / मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे.

**विभाग**

- तांत्रिक विभाग
- गोपनीय विभाग
- नोंदणी विभाग
- प्रशासन / आस्थापना विभाग
- लेखा विभाग
- सामान्य विभाग

**भूमिका / कार्यपद्धती / जबाबदारी**

भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ नुसार पशुवैद्यकीय व्यवसायाचे नियमन करणे, पशुवैद्यकीय व्यवसायाच्या नोंदवह्या ठेवणे व संबधीत बाबी यांचा उपबंध करणे.

**प्रशासकीय नियंत्रणाखालील संस्था**

भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ अनुसार पशुवैद्यकीय व्यवसायाचे नियमन करण्यासाठी शासकीय निमशासकीय व खाजगी संस्थाना भेटी देणे.

**टेलिफोन :** ०७१२२५५०८९६

**ईमेल :** rmsvcnagpur@yahoo.co.in

**पत्ता :** महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद

# गुण नियंत्रण प्रयोगशाळा

महाराष्ट्र शासनाने खात्याच्या १९८४ च्या पुनर्रचनेत पूर्वीची पशुपोषण संशोधन केंद्र व गुणनियंत्रण प्रयोगशाळा आरे, गोरेगांव (पुर्व) मुंबई ६५ या संस्थांचे जोड योजनेद्वारे एकत्रीकरण करून गुणनियंत्रण प्रयोग शाळा, आरे परिसर, गोरेगांव (पूर्व) मुंबई - ६५ ही संस्था कार्यान्वित केली आहे. उपआयुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा यांना या संस्थेचे कार्यालयप्रमुख म्हणून घोषित केले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. आस्था/२०७५/६५३५/ एडिएम/दि.१४.०४.१९७७ अन्वये देशाबाहेर निर्यात करण्यापुर्वी पशुजन्य पदार्थांच्या गुणवत्ता चाचणीसाठी परोपजीवी, सुक्ष्मजीवी व जैविक तपासणीचे काम गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगांव (पुर्व) मुंबई -६५ या ठिकाणी करण्यात येत आहे. निर्यात करण्यात येणाऱ्या पशुजन्य पदार्थांमध्ये म्हशीचे गोठित मांस, शेळी, मेंढीचे मांस, शवे, उबवणुकीची व खाण्याची अंडी तसेच इतर पशुजन्य खाद्यपदार्थांचे नमुने ह्या बाबींचा समावेश होतो. तसेच, केंद्र शासनाच्या धोरणानुसार डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स यांची अधिसुचना क्र. ३१.०३.१९९३ नुसार मांस व पशुजन्य पदार्थांच्या चाचण्या घेऊन दाखले देण्याबाबत धोरण निश्चित केले आहे. सदर दाखले देण्याचे कामदेखील या संस्थेमार्फत केले जाते.

शासन निर्णय संकीर्ण /१०/२००२/प्र. क्र.४१/ कृषी पदुम/मंत्रालय दि. २२.०१.२००३ अन्वये मानवी खाद्यासाठी उपयोगात न येणाऱ्या पशुजन्य व अखाद्य (नॉनइडिबल) उत्पादित पदार्थांच्या नमुना तपासणीचे कामदेखील गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगांव (पुर्व) मुंबई-६५ यांच्याकडे वर्ग करण्यात आले. हे काम पुर्वी मुंबई पशुवैद्यकिय महाविद्यालयाकडे होते. घातक रोग देशात येऊ नयेत म्हणून आयात केलेले पशु व पशुजन्य पदार्थांचे जिवाणू, विषाणु परीक्षण, जंत व कृमी परीक्षण इ. कामे करणे गरजेचे आहे. यासाठी राज्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळ व बंदरे या ठिकाणी आयात झालेल्या पशु व पशुजन्य पदार्थांचे नमुने संकलित करून त्याची तपासणी करण्याचे अधिकार शासन निर्णय क्र. डि. आय. एस १०/२००१/२१४१३/प्र.क्र.२१८/पदुम, मंत्रालय दि. ०९.०८.२००१ अन्वये गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगांव (पुर्व) मुंबई - ६५ या संस्थेस प्रदान करण्यात आले आहेत.




## कार्यपद्धती-

निर्यातदारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाप्रमाणे गोठीत मासाचे नमुने, संकीर्ण अखाद्य पदार्थ, अंडी असे वर्गीकरण करतात. तसेच कार्टन संख्या, कार्टनचे सरासरी वजन, माल कोणत्या देशात निर्यात होणार इत्यादी माहिती अर्जात आहे किंवा नाही, याबाबत खात्री केली जाते. गोठीत मांसाच्या नमुने संदर्भात अर्जासोबतची इतर कागदपत्रे तपासून परत केली जातात. अर्ज तपासणीनंतर उपआयुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगांव यांच्या आदेशानुसार पशुधन विकास अधिकारी हे निर्यातदाराच्या कंपनीस भेट देऊन प्रत्यक्ष भेटीत शीतगृहाचे तापमान पाहणे, प्रोसेसिंग प्लांटची स्वच्छता व प्रक्रीया पाहणे, कार्टन क्रमांक व पॅकींग, मालाचा साठा इत्यादी बाबीची पहाणी व मार्गदर्शन आदी कामे करतात. त्यानंतर रॅन्डम पध्दतीने कार्टनचे नमुने गोळा करुन परोपजीवी, सुक्ष्मजीवी व जैविक तपासणी करीता गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगांव येथे आणले जातात व त्यानंतर नमुन्यांची (१) परोपजीवी चाचणी (२) सुक्ष्मजीव तपासणी (३) जैवीक तपासणी केली जाते. तपासणीमध्ये प्रमाणकात दर्शविल्याप्रमाणे खात्री करुनच निर्यातक्षम मांस व पशुजन्य पदार्थ निर्यातीसाठी योग्य असल्याचा दाखला गुणनियंत्रण प्रयोगशाळा यांचेकडून दिला जातो.

# महाराष्ट्र गोसेवा आयोग




राज्यात महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम, २०२३ मंजूर झालेला असून दि. २७.०४.२०२३ रोजी तो शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

### गोसेवा आयोगाची प्रमुख उदिष्टे :-

१. राज्यामध्ये पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करणे.
२. पशुप्रजननाचे व स्थानिक जातीचे संवर्धन अनुवंशिक सुधारणा, वैरण विकास यामध्ये कार्यरत असलेल्या गोसदन, गोशाळा, पांजरापोळ, गोरक्षण संस्था आदी संस्थांना उत्तेजन देणे.
३. पशु आरोग्यसेवांचे प्रचलन, देशी पशुंचे संवर्धन व विकास, गोवंश प्रजनन धोरणाची अंमलबजावणी, वैरण विकास आदींच्या अनुषंगाने कार्य करणे.
४. प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटी कामकाजाचा आढावा घेणे.

### गोसेवा आयोगाची रचना:

१. सहआयुक्त पशुसंवर्धन दर्जाचा अधिकारी सदस्य सचिव
२. १४ पदसिध्द सदस्य: आयुक्त पशुसंवर्धन पदसिध्द सदस्य
३. आयोगावर ९ अशासकीय व्यक्ती नामनिर्देशनाने सदस्य
४. अशासकीय सदस्यांपैकी एक सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड.

- **टेलिफोन :** ०२०-२९९५२६६५
- **ईमेल :** cah.gosevaayog-mh.gmail.com
- **पत्ता :** महाराष्ट्र गोसेवा आयोग, पशुसंवर्धन आयुक्तालय, स्पायसर कॉलेजसमोर, औंध, पुणे- ४११०६७

# राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे




### संस्थेची स्थापना :-

शासन निर्णय क्र. पसं प्र-१००१/प्र.क्र.२९(भाग-४)/पदुम-१, मंत्रालय, मुंबई-३२, दि. २५ मे २००४ अन्वये सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम गोखलेनगर, पुणे-१६ या संस्थेचे पुनर्रचनेतंर्गत रूपांतरण करून राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे-१६ या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**उद्दिष्टे :-** राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगर, पुणे-१६ ही संस्था पशुसंवर्धन खात्यातील क्षेत्रीय तांत्रिक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी खात्याची एकमेव संस्था असून, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देणे हे या संस्थेचे मुख्य उद्दीष्ट आहे.

शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यव्साय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचा टीआरजी/२०१२/प्र.क्र. ५६/पदुम -४ दि. ०५ मार्च २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगर, पुणे-१६ या संस्थेत महाराष्ट्र राज्याच्या प्रशिक्षण धोरणानुसार पशुसंवर्धन खात्यातील तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तांत्रिक अधिकाऱ्यांची तांत्रिक कुशलता व कार्यक्षमता वाढावी तसेच अद्ययावत संशोधनाची माहिती त्यांना देऊन पशुपालकांना दिल्या जाणाऱ्या आधुनिक पशुवैद्यकीय सेवांमध्ये गुणात्मक रितीने वाढ व्हावी, या अनुषंगाने राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, गोखलेनगर, पुणे-१६ येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

# पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७ ही राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत पाळीव प्राणी व पक्षी यांच्यासाठी रोग प्रतिबंधात्मक लसीचे उत्पादन करणारी एकमेव राज्यस्तरीय संस्था आहे. ही संस्था सन १९६० पासून पुण्यातील औंध भागात कार्यरत आहे. संस्थेत पाळीव प्राणी व पक्षी यांना लागणाऱ्या जिवाणू व विषाणू लसी, अभिकारके व द्रावणे तयार केली जातात. या लसी राज्यभरातील सर्व पशुवैद्यकीय संस्थाना, शेतकऱ्यांच्या व पशुपालकांच्या पशुधनास लसीकरण करण्यासाठी मोफत तत्वावर पुरवठा करण्यात येतात. या संस्थेमध्ये निर्माण होणाऱ्या लसी सर्व राज्यस्तरीय आणि जिल्हा परिषद पशुवैद्यकीय संस्थाना विनामूल्य पुरविल्या जातात.




**या संस्थेचे नियमन खालील कायद्यानुसार केले जातात**

· औषधे व प्रसाधने कायदा, १९४० व १९४५ (सुधारित)
· कारखाना कायदा, १९४८
· बॉयलर, स्मोक अँड न्युसन्स ॲक्ट १९१२.
· पेट्रोलियम ॲक्ट, १९३४.
· बॉम्बे लेबर वेलफेअर फंड ॲक्ट, १९७७.
· केंद्रीय विक्रीकर ( नोंदणी व उलाढाल ) नियम, १९५७.
· एनव्हायरॉनमेंट प्रोटेक्शन ॲक्ट अंतर्गत बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट रुल्स, १९९८.

· सीसीएसईए (प्राण्यांवरील प्रयोगाच्या नियंत्रण आणि पर्यवेक्षणासाठी समिती, भारत सरकार): प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा-१९६०, प्राण्यांवर प्रजनन आणि प्रयोग (नियंत्रण आणि पर्यवेक्षण) नियम १९९८.

## जिवाणू लस उत्पादन विभाग

• जिवाणू लस उत्पादनासाठी सन २०१४ पासून फरमेन्टर तंत्रज्ञान अवलंबिले असून, आदर्श उत्पादन पद्धतीच्या मानकांनुसार लस उत्पादनाची कार्यवाही नियमितपणे सुरू केली आहे.

• फरमेन्टर तंत्रज्ञान पद्धतीने एका वेळी फक्त एक (मोहिमेचा आधार) जिवाणू लस उत्पादनाचे कार्य असे वर्षातून घटसर्प, फऱ्या, आंत्रविषार या लसींच्या उत्पादनासोबतच सालमोनेला कलर अँटीजन या अभिकारकाचे उत्पादनही सुरळीतपणे सुरू आहे.

• पूर्वी एका जिवाणू लसीच्या गटामध्ये ५०००० मात्रा तयार होत होत्या; परंतु फरमेंटर तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे एका लस गटामध्ये ७५०००० मात्रा तयार होत आहेत. सध्या या प्रकल्पाची जिवाणू लसींच्या उत्पादनाची क्षमता ही सरासरी १ कोटी मात्रा एवढी आहे असून, लस उत्पादन सुरळीत सुरू आहे.

• या तंत्रज्ञानामुळे लसीचा जनावरांमधील डोस हा पूर्वीच्या ५ मि.ली. वरुन २ मि.ली असा झालेला आहे.

# पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध (IVBP)

## कुक्कुट व विषाणू लस उत्पादन विभाग

- आदर्श उत्पादन पध्दतीच्या मानकांचा अवलंब न केल्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने या विभागाच्या लस उत्पादनास सन २००९ पासून स्थगिती दिली होती.
- त्यानंतर या लसींचे उत्पादन सुरळीत होण्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत रु.५०.४३ व रु.११.२५ असा एकूण रु. ६१.६८ कोटींच्या प्रकल्पाचे अद्यावत बांधकाम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पांतर्गत दोन वेगवेगळ्या इमारतींमध्ये कुक्कुट व विषाणू लस उत्पादनाचे कार्य सुरु करण्यात आलेले आहे.
- या प्रकल्पात संपूर्णत: आदर्श उत्पादन पध्दतीच्या मानकांचा अवलंब करण्यांत आलेला असून, फलित अंड्यांची निवड करण्यापासून ते अंतिम उत्पादनापर्यंत तंत्रशुध्द व अर्धस्वंयचलीत संयंत्रांचा वापर करण्यांत आलेला आहे.
- या प्रकल्पामुळे कुक्कुट व विषाणू लसींच्या उत्पादनामधील पूर्वीच्या तुलनेत ५ पटीने (म्हणजेच १२.५० कोटी लसमात्रा ) वाढ झाली आहे.

## लघुप्राणी विभाग

• लघुप्राणी विभागामधे प्रयोगशालेय प्राणी ( पांढरे उंदीर, ससे व गिनी पिग ) यांचे उत्पादन व संगोपन केले जाते.

• लघुप्राणी विभाग लस उत्पादन आणि चाचणी व गुणनियंत्रण प्रक्रियेत आवश्यक असणारे प्रयोगशालेय प्राणी तसेच मोठे प्रयोगशालेय प्राणी (रेडा, शेळ्या, मेंढ्या), कुक्कुट पक्षी व एसपीएफ़ अंडी इ. चा मागणीनुसार पुरवठा करतो. विभागाकडे सीसीएसईएचा लहान प्रयोगशालेय प्राणी यांचा विक्रीचा परवाना उपलब्ध आहे. त्यानुसार आयव्हीबीपी, डीआयएसच्या वापराव्यतिरिक्त अतिरिक्त प्राणी यांची सीसीएसईए नोंदणीकृत संस्थांना विक्री केली जाते.

• लघुप्राणी विभाग संस्थात्मक प्राणी नीतिशास्त्र समिती, सीसीएसईएच्या नियंत्रणाखाली कार्यरत असून, लस निर्मितीत आवश्यक असलेले प्रयोगशालेय प्राण्यांचे वापराकरिता प्रोटोकॉल हे सदरच्या समितीकडून मंजुर केले जातात.

• मोठी जनावरे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, यांचे प्रक्षेत्रावरुन प्राप्त करवून घेत प्रयोगाअंती सदर प्रक्षेत्रावर पुनर्वसन केले जाते.



**या संस्थेमध्ये खालीलप्रमाणे लसींचे उत्पादन केले जाते.**

| अ. क्र. | उत्पादीत लसीचे नाव |
|---|---|
| १ | घटसर्प |
| २ | फऱ्या |
| ३ | आंत्रविषार |
| ४ | लासोटा |
| ५ | कोंबड्यांची देवी |
| ६ | मरेक्स |
| ७ | पीपीआर |
| ८ | शीप पॉक्स |
| ९ | मानमोडी |
| १० | साल्मोनेल्ला कलर अँटीजन |
| ११ | कॅलिफोर्निया स्तनदाह चाचणी |



- **टेलिफोन:** ०२०-२५६९५६३२
- **ई-मेल:** jcivbp-mh@gov.in
- **पत्ता:** पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध

# महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर



विरासतां संरक्षण, भविष्यस्य पोषणम्
MAHARASHTRA LIVESTOCK DEVELOPMENT BOARD
Preserving the Legacy
Nurturing the Future



**स्थापना:** महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची स्थापना शासन निर्णय क्र. सीडीएस-१० / २००१ (पीके-५९) एडीएफ-४, मुंबई-३२ दि. ०२.०२.२००२ अन्वये करण्यात आली. मंडळाचे मुख्यालय सर्वप्रथम पुणे येथे स्थापन करण्यात आले व त्यानंतर शासन निर्णय क्रमांक सीडीएम-१० / २००१ (पीके-५९) पदुम-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०७.०६.२००३ अन्वये मंडळाचे मुख्यालय अकोला येथे दि.१२.०९.२००३ रोजी स्थलांतरीत करण्यात आले. त्यानंतर शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२० / प्र. क्र. १४५ / पदुम-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०५.०२.२०२१ अन्वये मंडळाचे मुख्यालय, नागपूर येथे स्थलांतरीत करण्यात आले.

## मंडळाच्या स्थापनेमागील उद्देश:

केंद्र शासनाने राष्ट्रीय गुरे व महिष पैदास प्रकल्प संपूर्ण राज्यामध्ये राबवून पशुपैदाशीची विशेष तज्ञतेची सेवा अधिक कार्यक्षमतेने पुरवून विशेषत: राज्याच्या मागासलेल्या भागात संकरीत पशुपैदासीच्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवत दुग्धोत्पादन व ग्रामिण रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ ही स्वायत्त संस्था स्थापन करण्यात आली. त्याचबरोबर राज्यातील देवणी, खिल्लार, गवळाऊ, लालकंधारी, डांगी या मान्यताप्राप्त देशी गोवंशीय जातीच्या तसेच पंढरपुरी व नागपूरी या म्हैसवर्गीय जनावरांचे त्यांच्या आढळस्थानात जतन व संवर्धन करणे हा मंडळाचा मुख्य उद्देश आहे.

कृत्रिम रेतनाच्या माध्यमातून संकरीत व सुधारीत देशी गोपैदास, तसेच सुधारीत महिष पैदास कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना गोठीत रेतमात्रांचा दर्जा व गुणवत्तेबरोबरच, कृत्रिम रेतनाव्दारे, संकरीत गोपैदास, सुधारीत देशी व सुधारीत महिष पैदास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी राज्यातील बेरोजगार पशुवैद्यकांची सेवा उपयोगात आणून त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे हा सुध्दा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचा उद्देश आहे.

## महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:

१. पशुपैदासीच्या सुनिश्चित केलेल्या धोरणानुसार कृत्रिम रेतनाव्दारे संकरीत/सुधारीत पशुपैदासीकरिता कार्यक्रम राबविणे तसेच कृत्रिम रेतनाचे जिल्हानिहाय लक्ष्य ठरविणे व त्यांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा व सनियंत्रण करणे.
२. राज्यात उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या कृत्रिम रेतनाच्या सेवा आणि गोठीत रेतमात्रांचा दर्जा उत्तम व विहीत मानकानुसार राहील यावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवणे.
३. क्षेत्रीय पैदास चाचणी कार्यक्रमातून सिध्द वळूंची निश्चिती करणे.
४. राज्यामध्ये केंद्र/राज्य पुरस्कृत राष्ट्रीय गुरे पैदास प्रकल्प, राष्ट्रीय गोकुळ मिशन, राष्ट्रिय पशुउत्पादकता अभियान, पंढरपुरी म्हैस वंशावळ सुधारणा कार्यक्रम, राष्ट्रिय पशुविमा योजना, राष्ट्रीय कृषि विकास योजना, अनुवांशिक सुधारणा कार्यक्रम राबविणे.
५. केंद्रपुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करताना कृषि, ग्रामविकास, जलसंधारण, राष्ट्रीय पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम व स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना यांचा समन्वय.
६. राष्ट्रीय गुरे पैदास प्रकल्प योजनेची अंमलबजावणी करताना दुग्धव्यवसाय विभाग, स्वयंसेवी संस्था, सहकारी दूध संघ, पशुपैदासकारांच्या संघटना व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेशी समन्वय व सक्रिय सहभाग मिळविणे.

## संचालक मंडळ

| अ. क्र. | पदनाम | सदस्य |
|---|---|---|
| १ | सचिव (पदुम) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | **अध्यक्ष** |
| २ | आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ३ | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ, गोरेगांव, मुंबई. | सदस्य |
| ४ | संचालक (संशोधन), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला | सदस्य |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा. | सदस्य |
| ७ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, नाशिक. | सदस्य |
| ८ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, सातारा | सदस्य |
| ९ | वरिष्ठ उपाध्यक्ष, भारतीय कृषि औद्योगिक प्रतिष्ठाण, ऊरळीकांचन पुणे (तज्ञ) | सदस्य |
| १० | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, कृषि मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली | सदस्य |
| ११ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला. | **सदस्य सचिव** |




### मंडळाअंतर्गत क्षेत्रीय स्तरावर कार्यरत संस्था

| संस्था | स्थळ व संख्या |
|---|---|
| गोठीत रेत प्रयोगशाळा | पुणे, औरंगाबाद, नागपूर (एकूण-३) |
| वळू संगोपन केंद्र | औरंगाबाद, नागपूर (एकूण-२) |
| वळू माता प्रक्षेत्र | जत, जुनोनी, ताथवडे, हिंगोली, कोपरगांव, पोहरा, वडसा (एकूण-७) |

- **टेलिफोन :** ०७१२-२९९९९३६
- **ईमेल :** ceomldbnagpur@gmail.com
- **पत्ता :** महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर





पुण्यश्लोक

सत्यमेव जयते

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि. गोखलेनगर, पुणे - १६



**स्थापना:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणी क्र. २०५६० / सीटीएनुसार दि. ८ ऑगस्ट, १९७८ रोजी करण्यात आली आहे.

**उद्दिष्टे:**



- विदेशी/ स्थानिक/ संकरित शेळ्या-मेंढ्यांची पैदास प्रक्षेत्रे स्थापन करणे व त्याचा विस्तार करणे.
- शेळ्या-मेंढ्यांच्या पैदाशीकरिता उपयुक्त ठरेल, अशा ठिकाणी केंद्रांची वाढ करणे.
- शेळ्या-मेंढ्या व त्यापासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंची आयात-निर्यात करणे
- शेळ्या-मेंढ्यांची पैदास आणि विक्री करणे.
- स्थानिक शेळ्या-मेंढ्यांची जात सुधारण्यासाठी संकरित पैदास कार्यक्रम हाती घेणे / अथवा अशा कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाला मदत करणे.
- शेळ्या-मेंढयांच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून पशुपालकांना प्रती शेळी-मेंढी मिळणाऱ्या उत्पादनात वाढ करणे व व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शासकीय मदतीने / मदतीशिवाय विस्तार केंद्रे स्थापणे.
- शेळी मेंढी पालनाला उत्तेजन देण्यासाठी सहकारी संस्था, व्यक्ति अथवा फर्म यांना मदत करणेकरिता वित्तीय पुरवठा करणे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि. गोखलेनगर, पुणे - १६

## प्रक्षेत्रे:

**सध्या महामंडळाची ११ प्रक्षेत्रे व १ लोकर उपयोगीता केंद्र आहेत.**

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, दहिवडी, ता. माण, जि. सातारा.
२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, तीर्थ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव.
३. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पडेगांव, ता.जि.छत्रपती संभाजीनगर.
४. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र,बिलाखेड ता.चाळीसगाव, जि.जळगाव.
५. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, अंबेजोगाई, जि. बीड.
६. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, मुखेड, जि.नांदेड.
७. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, रांजणी, ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली.
८. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, महूद, ता.सांगोला, जि.सोलापूर.
९. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पोहरा, ता. जि. अमरावती.
१०. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, बोंद्री ता.रामटेक, जि.नागपूर

## कार्ये:

महामंडळाच्या प्रक्षेत्रावर सुधारित जातीच्या शेळ्या-मेंढ्यांची पैदास करून त्यापासून उत्पादित होणारे सुधारित जातीचे नर मेंढे व बोकड मेंढपाळ / शेतकऱ्यांना पैदाशीसाठी वाटप करण्यात येतात.

१. महामंडळाच्या प्रक्षेत्रावर ३ दिवसाचे शेळी मेंढी पालनाचे प्रशिक्षण दरमहा आयोजित करून लाभधारकांना प्रशिक्षण देण्यात येते.
२. मेंढ्यांची यांत्रिक पद्धतीने लोकर कातरणी, तसेच डिजिटल गनचा वापर करून पशुसंवर्धन विभागाच्या दवाखान्यामार्फत शेळ्यांमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
३. माणदेशी फाउंडेशन, म्हसवड व महामंडळ यांचे संयुक्त विद्यमाने राज्यात शेळी विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
४. एमएसआरएलएम व महामंडळ यांचे संयुक्त विद्यमाने शेळ्यांमध्ये अनुवांशिक सुधारणा व आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम सुरु.
५. केंद्रीय भेड व उन अनुसंधान, राजस्थान यांचे मार्गदर्शनातून राज्यात लोकर प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यात येत आहे.
६. फिरते पशुचिकित्सालया मार्फत राज्यातील शेळ्या व मेढ्यांना आरोग्य सुविधा महामंडळामार्फत पुरविण्यात येत आहे.
७. यांत्रिक पद्धतीने मुरघास निर्मित्ती केंद्रे व स्थापन करणे पशुखाद्य निर्मिती केंद्रे महामंडळाच्या सर्व प्रक्षेत्रावर स्थापन करण्यात आलेले आहे.
८. मेंढपाळांची लोकर रास्त दरात खरेदी करणे, लोकर वस्तु निर्मिती आणि विक्री करणे.





# पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि. गोखलेनगर, पुणे - १६

## कार्ये

९. महामंडळाच्या रांजणी जि. सांगली या प्रक्षेत्रावर केंद्र पुरस्कृत नामशेष होत असलेल्या जातीचे संवर्धन या योजनेखाली माडग्याळ मेंढ्यांचे संवर्धन व विकास हा कार्यक्रम सन २००५-०६ पासून राबविण्यात येत आहे. या प्रक्षेत्रावर माडग्याळ जातीच्या मेंढ्यांची पैदास सुरू करून त्यापासून उत्पादित मेंढेनर स्थानिक शेतकरी / मेंढपाळांना पैदाशीसाठी पुरवठा करण्यात येत आहे. यामुळे या भागात माडग्याळ मेंढ्यांची पैदास मोठया प्रमाणावर सुरू झालेली आहे. या अंतर्गत राज्यामध्ये माडग्याळ शीप ब्रीडर असोसिएशन, स्थापन झाली आहे. या माध्यमातून सुद्धा माडग्याळ मेंढी विकासाचे कार्य सुरू आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावर या मेंढीची मानांकन नोंदणी होणेकरिता या मेंढ्यांचे सर्वेक्षण करून तसा अहवाल केंद्र शासनास (एनबीएजीआर, कर्नाल) सादर करण्यात आलेला आहे.

१०. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २०१४-१५ वर्षात महामंडळाच्या पडेगाव, जि. औरंगाबाद; बिलाखेड जि. जळगाव; अंबेजोगाई जि. बीड; दहिवडी जि. सातारा; रांजणी जि. सांगली; मुखेड, जि. नांदेड; पोहरा जि.अमरावती; महूद जि. सोलापूर; बोंद्री जि. नागपूर व तिर्थ जि. उस्मानाबाद या प्रक्षेत्रावरील एकुण ५१३.०० हेक्टर क्षेत्रावर एकदल व व्दिदल गवत वैरण प्रजातीची लागवड करण्यासाठी, सिंचनाच्या मुलभुत सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी रु. ३३४.९४ लाख निधी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेला होता. याअंतर्गत शेळ्या-मेंढ्यांकरिता उपयुक्त चारा पिकांचे ठोंबे व बियाणे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर वाटप करण्यात येत आहेत. तसेच यामुळे शेळ्या-मेंढ्यांकरिता चारा निर्मितीबाबत व्यापक जनजागृती झालेली आहे.

११. राज्यातील मेंढी पालनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेअंतर्गत राजे यशवंतराव होळकर महामेष योजना या नावाने ६ मुख्य घटकांसह नविन योजना सुरू करण्यास शासन निर्णय क्र. पविआ-२०१७ / प्र. क्र.६५ / पदुम-३ दि. ०२ जून २०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. ही योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. याअंतर्गत महामंडळास रु. ५३७८.०० लाख तरतूद वितरित करण्यात आलेली आहे. तसेच चालू वर्षामध्ये रु. २५००.०० लाख निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. वितरीत निधीमधून राज्यातील ५००० हजार मेंढपाळ कुटुंबाना या योजनेचा लाभ झालेला आहे.




१२. राज्यामध्ये समूह विकासामधून शेळीपालन व्यवसायास गती देणे, शेळीपालन संबंधीत नवीन उद्योजक निर्माण करणे, शेळीपालकांना प्रशिक्षण, अद्यावत तंत्रज्ञान, आरोग्य सुविधा, अनुवंशिक सुधारणा तसेच शेळ्यांकरिता विपणन व्यवस्था उपलब्ध करून देणे, शेळी व्यवसायाकरीता फॉरवर्ड लिंकेजेस निर्माण करून देणे, शेळ्यांच्या वजनावर विक्रीची व्यवस्था, कत्तलखाना निर्मिती, दूध प्रक्रिया उद्योग निर्माण करणे, शीतगृह, खाद्य कारखाना व निर्यात सुविधा उपलब्ध करून देणे, शेळीपालन व्यवसायाकरिता लागणारे साहित्य व इतर आवश्यक बाबी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे याकरिता राज्यामध्ये प्रत्येक विभागात शेळी समूह योजना राबविण्यात येत आहे.

१३. राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील मेंढपाळ कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यांसाठी चराई अनुदान देणे व राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेअंतर्गत भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्धबंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता जागा खरेदीसाठी अनुदान स्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देणे, या योजना महामंडळाकडून राबविण्यास शासनाची मंजुरी मिळाली आहे.

# भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी पश्चिम विभागीय संदर्भिय पशुरोग निदान प्रयोगशाळा रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७

पशुआरोग्य हा पशुपालन व्यवसायाचा मुख्य कणा आहे. पशुआरोग्य अबाधित राखणे, रोगनिदान करणे, क्षेत्रिय अधिकाऱ्यांना रोग प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी औषधोपचार, नियंत्रण व निवारणात्मक उपाययोजनांकरिता मार्गदर्शन करणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पशुधनातील रोग प्रादुर्भावामुळे मरतूक आणि त्यामुळे उत्पादनात घट झाल्याने पशुपालक व्यावसायिक संस्था व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. राष्ट्रीय कृषि आयोगानेही पशुधन क्षेत्राच्या वाढीसाठी प्रामुख्याने गुरांच्या सांसर्गिक रोगांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

## पशुरोग अन्वेषण विभागाची उद्दिष्टे

- रोगग्रस्त व रोगाने मृत गुरांच्या उती नमुन्यांचे संकलन.
- नमुन्यांचे अन्वेषण करुन रोगाचे पक्के निदान करणे.
- रोग प्रादुर्भावाची निश्चिती करणे.
- पशुवैद्यकांना रोगप्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी औषधोपचार, नियंत्रण व उपाययोजनांचे मार्गदर्शन.
- पशुधनातील व कुक्कुट पक्ष्यातील विषबाधा निदानासाठी चाचण्या करुन मरतूक आटोक्यात आणण्यासाठी औषधोपचार, नियंत्रण व निवारणात्मक उपाययोजना सुचविणे.
- राज्यातील ज्ञात व अज्ञात रोगांचे अन्वेषण करणे.
- क्षय, जोन्स, लैंगिक सांसर्गिक रोग व गर्भपात तसेच कुक्कुट पक्ष्यातील साल्मोनेल्लोसीस या मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान करणाऱ्या रोगांच्या नियंत्रणासाठी चाचण्या करणे.
- राज्य व राज्याबाहेरील पशुरोगनिदान प्रयोगशाळांमधील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करणे.
- राज्यातील आयबीआर, पीपीआर, लैंगिक सांसर्गिक रोग व गर्भपात व इतर रोगांचे सर्वेक्षण करणे.
- रोग प्रादुर्भावासंबंधीचे अन्वेषण व झालेल्या आर्थिक नुकसानीसंदर्भातील सर्वेक्षणाची माहिती घेणे.

## ॲस्कॅड

**अ) बर्ड फ्लू रोगाचे सर्वेक्षण**

**ब) सर्वेक्षण, संनियंत्रण व पूर्वअंदाज बांधणे**

- **ॲडमास योजना:** जनावरांच्या रोग प्रादुर्भावावर संनिरिक्षण करणे व रोगसंसर्ग शास्त्रीय माहितीचे विश्लेषण करणे.
- भारतीय कृषि अनुसंधान परिषद समन्वित लाळ-खुरकूत रोग संशोधन प्रकल्प

### पश्चिम विभागीय संदर्भ प्रयोगशाळा स्थापना

भारत सरकार, नवी दिल्ली यांनी रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-७ या संस्थेस पश्चिम विभागीय संपर्क प्रयोगशाळेचा दर्जा (डब्लु.आर.डी.डी.एल.) प्रदान केला आहे. या दर्जानुसार या संस्थेच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र, गोवा, दीव-दमन, दादरा-नगर- हवेली, मध्यप्रदेश, गुजरात व छत्तीसगड या राज्यांचा समावेश होतो. यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. या प्रयोगशाळांसाठी २८ अधिकारी / कर्मचारी काम करतात.

## प्रयोगशाळा उद्दिष्टे

- रोग प्रादुर्भावामधून नमुन्यांचे सर्वेक्षण करणे.
- देशाच्या पश्चिम विभागातील राज्यांसाठी जिवाणू, विषाणू, परोपजिवी व इतर आर्थिक नुक०सान करणाऱ्या महत्त्वाच्या रोगांसाठी संदर्भीय प्रयोगशाळा म्हणून कार्य करणे.
- पश्चिमी राज्यांमधील रोगांबाबतची माहिती इतर राज्यांना पुरविणे.
- वर्गीकृत जिवाणू, विषाणू व परोपजिवी जंतुंची जपणूक व आवश्यकतेप्रमाणे राष्ट्रीय जिवाणू / विषाणू / जंतू जपणूक प्रयोगशाळेस पाठविणे.
- रोग निदानासाठी चाचण्या प्रमाणित करणे व त्याचबरोबर इतर राज्यांतील प्रयोगशाळांना माहिती देणे.
- इतर राज्यातील प्रयोगशालेय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
- पशुधनातील क्षय, जोन्स व सांसर्गिक गर्भपात आयबीआर व कुक्कुट पक्ष्यातील साल्मोनेल्लासीस या आर्थिक नुकसान करणाऱ्या महत्वाच्या रोगांच्या नियंत्रणासाठी चाचण्या करणे.
- भारत सरकार, कृषी खाते, पशुसंवर्धन विभाग, यांनी ठरवून दिलेल्या उदा. बीएसई/स्क्रेपी इत्यादी रोगांचे सर्वेक्षण करणे.







## उद्योजकता विकास परिषद, २०२५

केंद्र शासनाच्या मत्स्यपालन, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग तसेच पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत दि. १३ जानेवारी २०२५ रोजी पुण्यातील ग.दि. माडगूळकर सभागृहात उद्योजकता विकास परिषद, २०२५ आयोजित करण्यात आली होती. उद्योजकतेला सक्षम करणे आणि पशुधन अर्थव्यवस्थेत बदल करणे हे या परिषदेचे उद्दीष्ट होते. या कार्यक्रमाला भारत सरकारचे केंद्रीय मत्स्यपालन, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री मा.श्री. राजीव रंजन सिंह, मा.प्रा.एस.पी. सिंह बघेल, राज्यमंत्री मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, भारत सरकार, मा. श्री. जॉर्ज कुरियन, राज्यमंत्री मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, भारत सरकार, मा.श्रीमती पंकजा मुंडे, पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री. शेखर मुंदडा, अध्यक्ष, माराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे इ. मान्यवर उपस्थित होते. तसेच, केंद्रीय सचिव श्रीमती अलका उपाध्याय, अतिरिक्त सचिव श्रीमती वर्षा जोशी, केंद्रीय आयुक्त श्री. अभिजित मित्रा, राज्याचे पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे व इतर राज्यांतील अधिकारी वर्गही उपस्थित होता.






# शेतकरी-पशुपालक बांधवांना प्रोत्साहन द्या

## राष्ट्रीय उद्योजकता विकास परिषदेवेळी केंद्रीय मंत्री मा. राजीव रंजन सिंह यांचे आवाहन

'सरकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी बँक, सहकारी सोसायटीची भूमिका महत्त्वाची आहे. या प्रक्रियेत शेतकऱ्यांना कागदांच्या जाळ्यात अडकवू नका. शेतकरी प्रामाणिकपणे व्यवसाय करीत असून, ते प्रामाणिकपणे कर्ज फेडतील. त्यांना सहकार्य करून कर्जप्रक्रिया सुलभ करावी,' अशी आग्रही भूमिका मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाचे केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी मांडली. 'अल्प उत्पन्न गटातील शेतकरी, महिला यांना प्राधान्य द्या, योजनांबाबतची माहिती देणारे जनजागृतीपर उपक्रम राबवा, शेतकऱ्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन द्या,' अशा सूचनाही त्यांनी बँकांना केल्या.

राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सोमवारी निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात दि. १३ जानेवारी २०२५ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय उद्योजकता विकास परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी केंद्रीय राज्यमंत्री मा. एस. पी. सिंह बघेल, मा. जॉर्ज कुरियन, राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री मा. ना. पंकजा मुंडे, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. शेखर मुंदडा, खासदार मा. मेधा कुलकर्णी, आमदार मा. उमा खापरे, पशुसंवर्धन विभागाच्या केंद्रीय सचिव मा. अलका उपाध्याय, अतिरिक्त सचिव मा. वर्षा जोशी, आयुक्त मा. अभिजित मित्रा, राज्याचे सचिव मा. डॉ. एन. रामास्वामी, आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे आदींसह पशुपालक व बँक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्राच्या 'राष्ट्रीय पशुधन अभियान' (एनएलएम) आणि 'पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी' (एएफआयडीएफ) या योजनांतर्गत ४० प्रकल्पांचा शुभारंभ याप्रसंगी करण्यात आला. अभियानाच्या डॅशबोर्डचेही यावेळी उद्घाटन झाले. या योजनांमध्ये अग्रेसर असणाऱ्या राज्यांचा सत्कार करण्यात आला. १४ जानेवारी ते १३ फेब्रुवारी हा कालावधी 'पशुसंवर्धन आणि पशुकल्याण जागरूकता' महिन्याची घोषणाही या वेळी करण्यात आली. 'पशुसंवर्धन विभागांतर्गत वृद्धिंगत होणाऱ्या उद्योजकतेचे २०४७ मधील विकासित भारतामध्ये महत्त्वपूर्ण योगदान असेल,' असा विश्वास मा. जॉर्ज कुरियन यांनी व्यक्त केला. शेती आणि दळणवळणाशी संबंधित कामे कमी झाल्याने गो-वंश नामशेष होत असून, याचे संवर्धन होणे महत्त्वाचे आहे,' असे मा. श्री. बघेल म्हणाले. पशुगणना गांभीर्याने करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

> विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यात ग्रामीण अर्थव्यवस्थेचे योगदान महत्त्वाचे आहे. यासाठी पशुसंवर्धन विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. या विभागाद्वारे आत्मनिर्भर भारताचे ध्येय गाठण्यासाठी शेतकरी, उद्योजक, बँक, सरकारी यंत्रणांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. केंद्राच्या 'एनएलएम' आणि 'एएचआयडीएफ'मुळे शेतकरी, उद्योजकांना प्रोत्साहन मिळणार आहे. उत्पादन वाढ, चारा आणि बियाणे व्यवस्थापन, रोजगारनिर्मितीसह यामध्ये संशोधनालाही प्रोत्साहन मिळेल.
>
> – **राजीव रंजन सिंह, मा. केंद्रीय मंत्री, भारत सरकार**

### 'पशुधनही तारण समजावे'

'शेतीच्या उत्पन्नाला उद्योजकतेची जोड मिळणे गरजेचे आहे. पशुसंवर्धनाच्या व्यवसायांतून शेतकरी आणि तरुणांमध्ये उद्योगशीलता रुजविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत,' असे मा.मंत्री ना. पंकजा मुंडे म्हणाल्या. 'शेतकऱ्यांनी कर्ज मागताच तारण म्हणून बँकांकडून 'एनए' जमीन मागितली जाते. मात्र, शेतकऱ्याकडे 'एनए' जमीन असल्यास ते बिल्डर झाले असते. बँकांनी शेतकऱ्यांचे पशुधनही तारण म्हणून स्वीकारावे,' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.





मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांनी दिनांक २७.०३.२०२५ रोजी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई या कार्यालयास भेट दिली. मा. सचिव महोदयांनी आपल्या भेटीदरम्यान महाविद्यालय इमारत बांधकाम व परिसराची पाहणी केली. तसेच प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन या कार्यालयाची पाहणी करत कार्यालयाच्या स्थानांतरणाबाबत चर्चा केली. मा. सचिव महोदय तसेच डॉ. कांबळे (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन) यांचे हस्ते कार्यालय आवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. इंगोले तसेच सर्व विभागातील प्राध्यापक व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीमती दिघावर आदींसह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




उद्योजकता विकास परिषद २०२५ दरम्यान, पशुसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय विकासात योगदान दिल्याबद्दल देशातील पहिल्या ६ राज्यांचा सन्मान करण्यात आला, ज्यामध्ये NLM-EDP आणि AHIDF अंतर्गत प्रत्येकी ३ राज्ये समाविष्ट आहेत. या राज्यांनी उल्लेखनीय नवोन्मेष आणि उद्योजकीय विकासासाठी उत्कृष्ट कार्य केले आहे, ज्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वृद्धी व विकासासाठी नवीन बेंचमार्क स्थापित झाले आहेत. दरम्यान, AHIDF योजनेत महाराष्ट्र राज्याला अव्वल राज्य म्हणून सन्मानित करण्यात आले आहे.



# राज्यातील ५६० गोशाळांना देशी गोवंश परिपोषण योजनेचा लाभ

गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेर्गत दि. २७ मार्च २०२५ रोजी राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६,५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरीत करण्यात आले. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व मा.ना. पंकजाताई मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देत देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी राज्य सरकार कटीबद्ध असल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा यांनी दिली.

सद्यस्थितीत देशी गायींची उत्पादनक्षमता कमी असल्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड / अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नसल्याने अशी जनावरे गोशाळेत ठेवण्यात येतात. त्यामुळे गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची आवश्यकता विचारात घेऊन सन २०२४§२५ महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळेत ठेवण्यात येणाऱ्या गायींना रु. ५०/- प्रती दिन प्रती देशी गोवंश अनुदान देण्यासाठी शासनाने गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील हजारो गोशाळांना आधारभूत ठरली असून, आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा यांनी सांगितले.

ना. पंकजाताई मुंडे यांनी राज्यभरात गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसापात्र असून, देशी गोवंश संरक्षण व संवर्धनाचा प्रश्न गोसेवा आयोगाच्या प्रभावी कामकाजामुळे निकाली निघत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच या कार्यासाठी अविरत प्रयत्न करणारे गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखरजी मुंदडा, आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी, संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सनतकुमार गुप्ता, मनीष वर्मा, परेश शाह, दीपक भगत, सदस्य सचिव डॉ. मंजुषा पुंडलिक व सर्व अधिकारी- कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विकासाचे गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी सतत कार्यमग्न असल्याची माहिती मा. श्री. शेखर मुंदडा यांनी दिली.






मा. सचिव (पदु) डॉ. रामास्वामी एन. यांनी दि. ३१ मार्च २०२५ रोजी पुणे येथील भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन (BAIF) या संस्थेस भेट दिली. याप्रसंगी मा. सचिव महोदयांनी पशुसंवर्धनविषयक सेवा व संधींची वृद्धी घडवून आणण्यासाठी BAIF आणि पशुसंवर्धन विभाग यांच्यात सहयोगात्मक प्रयत्न कसे करता येतील, याबाबत चर्चा केली. तसेच या क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्यांवर मार्गदर्शनही केले. मा. सचिव महोदयांनी चारा विकास, ET IVF, बायोगॅस, सेक्स सॉर्टेड सिमेन तंत्रज्ञान आदी विषयांवर मार्गदर्शन केले. याप्रसंगी पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त मा. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), डॉ. शितलकुमार मुकणे (अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन), डॉ. समीर बोरकर (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे) तसेच BAIF चे अधिकारी उपस्थित होते.

पूर्णत्वाकडे वाटचाल करीत असलेल्या प्रस्तावित पुणे सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय हॉस्पिटल, औंध या संस्थेस मा. सचिव (पदु) डॉ. रामास्वामी एन. यांनी भेट प्रागतिक माहिती घेतली. यावेळी मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे, डॉ. अंकुश परिहार (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त), डॉ. बालासाहेब गायकवाड (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन जि.प.स.चि.औंध) आदी उपस्थित होते. पशुरुग्णांच्या सेवेसाठी आवश्यक सर्व प्रकारच्या सुविधा या हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत गतिमान कार्यवाही करण्यात येत आहे.



# १९६२ महापशुधन संजीवनी हेल्पलाईन

मा. पंकजा गोपीनाथ मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण, महाराष्ट्र शासन, या पुणे दौऱ्यावर असताना पशुसंवर्धन विभागामार्फत शेतकऱ्यांना घरपोच सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या "१९६२ महापशुधन संजीवनी" या हेल्पलाईन सेंटरचे उद्घाटन केले. या हेल्पलाईनमुळे शेतकरी बांधवांना आपल्या पशुधनासाठी घरपोच पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यावेळी मंत्री महोदयांनी कॉल सेंटरमधून एका पशुपालकाशी संवाद साधला. तसेच पूर्णत्वाकडे वाटचाल करीत असलेल्या प्रस्तावित पुणे सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय हॉस्पिटल आणि पशुरोग नियंत्रण BIO Security Level ३ लॅबला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.





कमी खर्चामध्ये पाळीव प्राण्यांवर उच्च दर्जाचे उपचार व्हावेत, यासाठी औंध येथे जिल्हास्तरावर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे निर्माण करण्यात आले आहे. या हॉस्पिटलमध्ये स्वागत कक्ष, चिकित्साकक्ष, शल्यचिकित्सा कक्ष (लहान जनावरे व मोठी जनावरे स्वतंत्र विभाग), क्ष-किरण सुविधा कक्ष, औषधे पुरवठा कक्ष, सभागृह, आंतररुग्ण कक्ष आदी विभाग स्थापित करण्यात येणार आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड या मनपा क्षेत्रासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पशुरुग्णांना या सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचा मोठा लाभ होणार आहे.




# 'प्राणी संरक्षण व संवर्धन संहिता किंवा कायदा' ची मागणी
# अधिवक्ता कार्यशाळेत ७० अधिवक्त्यांसह ५५ अधिकाऱ्यांचा सहभाग

**महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे-६७**

प्राणी संरक्षण, संवर्धनासाठी व वाहतूकीसाठी वेगवेगळे कायदे व नियम अस्तित्वात आहेत. तसेच पशुपक्षी, पाळीव प्राणी, जंगली प्राणी इत्यादी विषयी वेगवेगळे कायदे व नियम अस्तित्वात आहेत. त्यामुळे सदर कायद्याची अंमलबजावणी करत असताना कायद्यामधील वेगवेगळे कलमे व नियम असल्याने, ते लागू करण्यासाठी पोलीस दलाला आणि संबंधीत शासकिय यंत्रणांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे वरील सर्व कायदे, नियम व वेळोवेळी केलेल्या सुधारणा यांचा एकत्रित विचार करून एकच स्वतंत्र "प्राणी संरक्षण व संवर्धन संहिता किंवा कायदा॰" तयार केल्यास महाराष्ट्र पोलीस दलाला आणि इतर शासकिय यंत्रणांना सदर कायद्याची अंमलबजावणी करणे सोपे जाईल व गोवंश संरक्षण व संवर्धन करण्यास मदत होईल, अशी मागणी महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अधिवक्ता कार्यशाळेत एकमुखी करण्यात आली.

महाराष्ट्रातील गोवंश रक्षणार्थ काम करणाऱ्या अभिवक्तांना आमंत्रित करुन त्यांची कार्यशाळा महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत महाराष्ट्रातून जवळपास ७० अभिवक्त्यांसह विविध विभागाच्या ५५ अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेच्या प्रारंभी गोमातेची पूजा व दिपप्रज्वलन करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. गोवंश रक्षणार्थ राज्यात अस्तित्वात असलेले कायदे, केंद्रीय कायदे, पशुपरिवहन कायदे, गोमांस विक्री, निर्यात,कत्तलखाना आदी विविध बाबींसंबंधी कायदे या विषयावर एकूण चार सत्रांमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेस मा. ना. पंकजा मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यशाळेस गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), मा. न्यायाधीश श्री. अंबादासजी जोशी, लोकायुक्त (गोवा), वरिष्ठ अधिवक्ता एड. मोतिसिंह मेहता, महाराष्ट्र गोवा बार काउंसिलचे अध्यक्ष पारिजात पांडे, अधिवक्ता म्हणून एड. श्रुती मेहता, रमाकांत भोपळे, मिलींद बिलोलीकर, कमलेश शाह, राजू गुप्ता, परिवहन अधिकारी श्री. ढोके, निलेश अंबिलवडे, सिद्ध विद्या, श्री. भाऊसाहेब कुदळे, अतिश कटारीया, डीसीपी सागर पाटील, हेमंत गुरव, अशोक जैन, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अशासकीय सदस्य श्री. सनतकुमार गुप्ता, डॉ. नितीन मार्कंडेय, सुनील सुर्यवंशी, संजय भोसले, मनिष वर्मा, उद्धव नेरकर, दीपक नेरकर आदींसह आयोगाच्या सदस्य सचिव तथा सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. मंजुषा पुंडलिक आदी उपस्थित होते.

## अधिवक्ता कार्यशाळेत करण्यात आलेल्या मागण्या:

- प्राणी संरक्षण कायद्यात शिक्षेच्या तरतुदीत सुधारणा करून गंभीर शिक्षेची तरतूद करावी. सर्व तरतुदी दखलपात्र गुन्हा म्हणून जाहीर कराव्यात.
- नवीन गोशाळा चालू करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन व सदर गोशाळांना सुविधा पुरविण्यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे. गुन्ह्यात पकडलेल्या गोवंशाचे पालन पोषण, वाहतूक व वैद्यकीय तपासणीसाठी किमान ५०० रुपये प्रती दिन प्रती पशु एवढी वाढ करावी म्हणजेच गोवंश संवर्धनासाठी अडचणी येणार नाहीत.
- गोवंशाच्या खरेदी विक्रिसाठी संगणीकृत प्रणाली विकसित करण्यात यावी आणि त्याद्वारेच गोवंशाची खरेदी विक्रि करणे बंधनकारक असावे.
- गोवंशाची तस्करी, वाहतूक, हत्या व मांस विक्री करणाऱ्या संघटित गुन्हेगाराविरुद्ध मोक्का कायदा लागू करणे.
- "गोवंश संरक्षणासाठी विशेष सरकारी वकील" या नावाने वकिलांची नेमणूक करावी.




- गोवंश संरक्षण व संवर्धनासाठी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करणे.
- गोवंश संरक्षण व संवर्धनासाठी काम करणाऱ्या गोरक्षकांना कायदेशीर संरक्षण देणे व त्यांच्या वरील खोटे गुन्हे तात्काळ रद्द करणे.
- कत्तलखान्याविषयी प्रचलित नियमावलींचे तंतोतंत पालन व बेकायदेशीर कत्तलखाने बंद करणे. देशपातळीवर गोमांसाची निर्यातीस बंदी घालणे आवश्यक.
- राज्यामध्ये प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर गोवंश संरक्षण व संवर्धन समिती स्थापन करणे.
- महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हयात १० गावांमध्ये कायमस्वरूपी चारा-छावणी सुरू करणे.
- गोवंशाची निर्दयपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांची नोंदणी रद्द करणे तसेच सदर वाहन जप्त करुन नष्ट करण्याबाबत कार्यवाही होणेबाबत कायद्यात बदल होणे गरजेचे आहे.
- गोवंश संरक्षणनासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र पोलीस सेल तयार करणे व पोलीस अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करणे.
- सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व प्राणी संरक्षण, संवर्धन व वाहतूक इत्यादी कायद्यातील तरतुदी एकत्रित करून स्वतंत्र "प्राणी संरक्षण कायदा / संहिता" तयार करणे व सदर कायद्यात गंभीर शिक्षेची तरतूद करणे गरजेचे आहे.



# पशुसंवर्धनाच्या माध्यमातून उद्योजक बना : मा. पंकजा मुंडे

## बीड: एकदिवसीय कार्यशाळेला शेतकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद

**बीड, (परळी):** शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालन व वैरण उत्पादकता विकास यासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पशुधन अभियानामुळे (NLM- National Livestock Mission) ग्रामीण उद्यमशीलतेला चालना मिळत आहे. या योजनेतून नवतरूणांसाठी एक मोठी व्यावसायिक संधी निर्माण झाली आहे. देशभरात सर्वाधिक पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. या योजनेचा लाभ देण्यासाठी पशुसंवर्धन विभाग पशुपालक-शेतकरी बांधवांना सर्वतोपरी मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी कटीबद्ध आहे. त्यामुळे राज्यातील तरूणांनी उपलब्ध वेळेचा सदुपयोग 'एनएमएल' योजनेच्या माध्यमातून उद्योजक बनण्यासाठी केल्यास राज्याच्या ग्रामीण व शहरी विकासाला मोठा हातभार लागेल, असे प्रतिपादन मा. ना. पंकजाताई मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य यांनी केले.

परळी (जि. बीड) येथे दि. ०२ मे २०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले होते.

व्यासपीठावर पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), बीड जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. आदित्य जीवने (भा.प्र.से.) डॉ. शितलकुमार मुकणे ( अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन) श्री. गणेश देशपांडे (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन छत्रपती संभाजीनगर विभाग), पशुसंवर्धन आयुक्तालयातील डॉ. प्रशांत भड (उपआयुक्त पशुसंवर्धन तथा राज्य नोडल अधिकारी NLM), डॉ. शैलेश केंडे (उपआयुक्त पशुसंवर्धन (नियोजन व अंदाज)), डॉ. आर. डी. कदम (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, बीड), श्री. अरविंद लाटकर (उपविभागीय अधिकारी), डॉ. विजय देशमुख (जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, बीड), श्री. व्यंकटेश मुंडे (तहसीलदार, परळी), श्री. संजय केंद्रे (गटविकास अधिकारी, परळी), डॉ. शशिकांत सांबारे (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन) आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व गोमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक श्री. गणेश देशपांडे (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन) यांनी केले.




यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा लाभ पशुपालकांना सहजतेने घेता यावा, यासाठी MAHABMS या जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय योजना पोर्टलचे उद्घाटन मा. पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM) या योजनेतंर्गत बीड जिल्ह्यात सात पशुपालकांनी सर्व ऑनलाईन प्रक्रिया तर काही पशुपालकांनी पार पाडून जिल्ह्यातील युवकांसमोर राष्ट्रीय पशुधन अभियानातंर्गत उद्योजकता विकास कार्यक्रमातून उद्योजक बनण्यासाठी आदर्श निर्माण केला आहे. या पशुपालकांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांचा सन्मान मा. मंत्री ना. पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच एनएलएम योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना सकारात्मक दृष्टीकोन ठेवून उद्योजकता विकासात वित्तरुपी भक्कम पाठबळ देणाऱ्या श्री. विजेंद्रु झा (व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, बीड), श्री. भूपेंद्र नवीनचंद्र लारोकर (व्यवस्थापक, एसबीआय, उमापूर) यांनाही यावेळी स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यशाळेस उपस्थित लाभार्थ्यांशी मा. ना. पंकजा मुंडे, मंत्री पशुसंवर्धन यांनी संवाद साधत त्यांचे व्यावसायिक अनुभव ऐकून घेतले. यावेळी 'लखपती पशुपालक जोडपे' ही संकल्पना राबविण्याचाही मानस मंत्री, मा. पंकजा मुंडे यांनी व्यक्त करत बीड जिल्ह्यातील पशुपालकांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.



## या पशुपालकांचा झाला सन्मान

१) **श्री. हरिश बबन पवार**, रा. बोरीपिंपळगाव, ता.गेवराई, जि. बीड (प्रकल्प: उस्मानाबादी शेळीपालन)

२) **श्री. किशोर राठोड**, रा. लमानवाडा, ता.शिरूर (का), (प्रकल्प: उस्मानाबादी शेळीपालन)

३) **श्री. गोविंद गित्ते,** रा. तळणी, ता. अंबाजोगाई (प्रकल्प: उस्मानाबादी शेळीपालन)

४) **श्री.विकास नवनाथ गर्जे,** रा. चिंचोलीनाथ, ता. पाटोदा (प्रकल्प: वैरण विकास, (सायलेज मुरघास))

५) **श्री. संजय साळुंखे,** रा. जूजगव्हाण, ता. जि. बीड (प्रकल्प: उस्मानाबादी शेळीपालन)

६) **श्री. नानासाहेब भराटे,** रा. वैजाळा, ता. पाटोदा, जि. बीड (प्रकल्प: कुक्कुटपालन)

७) **श्री. तुकाराम आघाव,** रा. नंदनज, ता. परळी (प्रकल्प: उस्मानाबादी शेळीपालन)

### 'पशुपालकांच्या मदतीसाठी पशुसंवर्धन विभाग कटीबद्ध'

पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजना राज्यभरात राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराचे स्वप्न पूर्ण करण्याची महत्वपूर्ण संधी पात्र लाभार्थ्यांना मिळणार आहे. एनएलएम ही केंद्र सरकारची एक महत्वाकांक्षी योजना असून, या योजनेच्या माध्यमातून उद्योजकता विकास व रोजगार संधींची निर्मिती करुन ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र आणखी गतिमान करण्याचा विभागाचा मानस आहे. त्यासाठी लाभार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याकरिता पशुसंवर्धन विभागाने आपली कटीबद्धता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येत असल्यास तात्काळ पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी केले.

यावेळी डॉ. समीर बोरकर (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग) लिखित 'शेळी-मेंढीपालन: आरोग्य व व्यवस्थापन' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. शास्त्रोक्त पद्धतीने मेंढी व शेळीपालन करु इच्छिणाऱ्या युवक-युवतींना सदर पुस्तिका मार्गदर्शक ठरेल, तसेच प्रत्येक शेळी-मेंढीपालकाने या पुस्तिकेनुसार आधुनिक व्यवस्थापनाच्या आधारावर भरघोस व्यावसायिक उत्पन्न मिळवावे, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी केले.

कार्यशाळेस उपस्थित पशुपालक-शेतकरी बांधवांना डॉ. प्रशांत भड (उपआयुक्त पशुसंवर्धन (पशुधन व कुक्कुट) तथा नोडल अधिकारी NLM) यांनी संबोधित केले. तसेच पशुपालक-शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेत त्यांचे निराकरण केले. आभार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विजय देशमुख यांनी मानले.














# १०० दिवसांचा नियोजन आराखडा

## क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी ७ कलमी कृति आराखडा

### १. संकेतस्थळ (Website)-

- विभागाच्या http://dahd.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरील माहिती दररोज आवश्यकेनुसार अद्ययावत केली जाते.
- यामध्ये विविध योजनांच्या मार्गदर्शक सूचना दरपत्रके / निविदा सूचना, पशुपालकांसाठी महत्त्वाच्या सूचना (जसे पशुगणना), छायाचित्रणे, व्हीडिओ हे नियमितपणे अद्ययावत करण्यात येतात.
- संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सर्व माहितीचे प्रकटीकरण करण्यात आलेले आहे.
- संकेतस्थळाच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने खात्याचे स्वतंत्र एकात्मिक पोर्टल तयार करण्यासाठी SMART अंतर्गत दि. २७-०३-२०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करणेत आली आहे.
- सदर संकेतस्थळ NIC, मुंबई यांनी तयार केलेले असून, त्यांच्याच S3WASS या क्लाऊड वर होस्ट केलेले असल्याने Cyber security ची दक्षता NIC मार्फत घेण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळ NIC, मुंबई यांनीच तयार केलेले असल्याने GIGW च्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे अद्ययावत आहे.
- लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार विभागाच्या सेवांबाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

## २. सुकर जीवनमान (Ease of Living)

- पशुसंवर्धन विभागामार्फत पशुपालकांचे जीवन सुकर करण्याकरीता पशुपैदास सुधारणा (Breeding), पशुधनाचे आरोग्य (Animal Health), वैरण विकास (Fodder), पशुखाद्य (Feed), पशुधनाचे व्यवस्थापन (Management) या पंचसुत्रीचा अवलंब केला जातो. त्यासाठी,
  - o उच्च अनुवंशीक क्षमतेच्या वंशावळीद्वारे पैदाशीसाठी सेक्स सॉरटेड वीर्यमात्रा उपलब्ध करुन देउन ९० टक्के कालवडी/पारड्यांची निर्मीती करणे. तसेच भ्रृण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा अवलंब. देशी गोवंशाचे जतन व संवर्धन
  - o राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत लाळखुरकुत व आर्थिकदृष्टया महत्वाच्या रोगाचे १०० टक्के लसीकरण करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबवून लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे.
  - o वैरण विकास/ पशुखाद्य कार्यक्रमा अंतर्गत निधी अर्थसंकल्पीत करणेत आला असून, त्यामधून लाभार्थींना लाभ देण्यात आला असल्याने यावर्षी राज्यात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाही.
  - o पशुधनाचे व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत शेतकरी व पशुपालकांसाठी विविध प्रशिक्षण राबविणेत येत असून, त्यामध्ये शेतकरी व पशुपालकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये पशुसंवर्धन विभागाच्या **१८ सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध** करुन देणेकरीता शासनास प्रस्ताव सादर करणेत आला आहे.
- सदर सेवा सुलभ पध्दतीने उपलब्ध करण्यात येत आहेत.
- नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता वरील सर्व नामनिर्देशीत सेवा १००दिवसांचे आत नागरीकांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

## ३. स्वच्छता (Cleanliness)

- प्रचलित नियम, कार्यपद्धतीप्रमाणे शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया प्राधान्याने व निरंतरपणे (continuing) राबविण्यात येत असुन याअंतर्गत-
- कार्यालयांमध्ये व कार्यालयांच्या आवारात असणारे अभिलेख निंदणीकरण करुन अंतिम करणेत आले आहेत. तपासाअंती आवश्यक नसल्यास नष्ट करण्यात आली आहेत.
- तसेच, सर्व अभिलेखांचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.९/१८(र.-व-का.), दिनांक १५.०२.२०१८ अनुसार वर्गीकरण करण्यात आले आहेत.
- कार्यालयांमधील जुन्या व निरुपयोगी जडवस्तूंची (उदा. संगणक, टेबल, खुर्चा, कपाटे, इत्यादी) विहित कार्यपद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.
- कार्यालयांच्या आवारात जुनी व कोणत्याही वापरात नसलेली वाहने निर्लेखीत करणेत आली आहेत.

## ४. जनतेच्या तक्रारीचे निवारण (Greivance Readressal)

- नागरिकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे ("आपले सरकार", "P.G. Portal", यांसह) त्वरेने निराकरण करण्यात येत आहे.
- कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या भेटीसाठी आठवड्यातील दैनंदिन वेळ राखून ठेवणेत आली असुन तसे फलक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात आले आहेत. दौऱ्यावर असल्यास अभ्यागतांना भेट देण्यासाठी अन्य अधिकाऱ्यांची नेमणूक करणेत आली आहे.
- तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर "लोकशाही दिनाची" अंमलबजावणी जिल्हा परिषदस्तरावर निवारण करणेत येत आहेत.

## ५. कार्यालयातील सोयी सुविधा (Amenities at Work Places)

पुढील पृष्ठावर...

## ५. कार्यालयातील सोयी सुविधा (Amenities at Work Places)

- कार्यालयांमधील कर्मचारी वर्ग तसेच येणारे अभ्यागत यांचेकरीता पिण्याच्या पाण्याची योग्य व कायमस्वरुपी व्यवस्था करणेत आली आहे.
- कर्मचारी आणि अभ्यागत यांचेसाठी कार्यालय व कार्यालयाच्या आवारातील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवण्यात आली आहेत. त्याबाबत क्षेत्रीयस्तरावरील पशुवैद्यकीय संस्थांना सूचना देण्यात आल्या असून, १०० दिवसांत सर्व कार्यालयांत सुविधा पुर्ण करणेत येणार आहेत.
- कार्यालयांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतीक्षालय व ग्रंथालय उपलब्ध आहे.
- कार्यालयांमध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावलेले आहेत.
- कार्यालयांमधील वातावरण प्रसन्न व आल्हाददायक राहील याकरीता विशेष प्रयत्न करून कार्यालयाचे व परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे.

## ६. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field Visit)


- जा. क्र. प्र-१ / २१ / दौरा दैनंदिनी परिपत्रक /१९७५-२०४९/२०२५, पसं १३ पुणे दिनांक ११/०२/२०२५ अन्वये परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
- यामध्ये विभागातील सर्व अधिकारी यांनी अधिनस्त संस्थांना निश्चित केलेल्या कार्यपध्दती नुसार दौरे करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- तसेच त्यानुसार दरमहा अहवाल सादर करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- अभ्यांगतांकरीता नोंदवही उपलब्ध आहे.

## ई- ऑफीस प्रणाली

- प्रशासकीय कामकाजाकरीता ई-ऑफीस प्रणालीचा अवलंब करण्याची कार्यवाही चालू.
- कर्मचारी अधिकाऱ्यांचे शासकीय ई-मेल तयार केले.
- सर्व कर्मचारी व अधिकारी यांची मास्टर डाटाबेस तयार करण्यात आलेला आहे.
- कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी संगणक उपलब्ध आहे.
- स्पीड स्कॅनर उपलब्ध करणेत आले आहेत.
- ई- ऑफीस प्रणाली कार्यरत करणे येत आहे.

## ७. गुंतवणुक प्रसार (Investment Promotion)

- **राष्ट्रीय पशुधन अभियान :**
  - o प्रत्येक पशुवैद्यकीय संस्थेमार्फत किमान एक प्रस्ताव मंजूर करण्याचा लक्ष्यांक.
  - o एकुण **१६५० परिपूर्ण अर्ज बँक कर्ज मंजुरीस्तव सादर** त्यापैकी **४७२ अर्जदारांना कर्ज मंजुर असून रु.१९.०७ कोटी** इतका अनुदान वितरीत व **रु.१९७.३५ कोटींची** गुंतवणूक.
  - o अर्जदारांना मार्गदर्शन व अडीअडचणी दूर करणेसाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना.
- **पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) :**
  - o कर्जाच्या व्याजात केंद्र शासनाकडून ३ टक्के सवलत देण्यात येते.
  - o महाराष्ट्रातून सर्वाधिक १२०९ प्रकल्प पैकी ३३ मंजुर व रू. १९८३.४ कोटी इतकी गुंतवणूक
  - o महाराष्ट्र राज्य **प्रथम क्रमांकावर** आहे.
- **स्मार्ट प्रकल्प**: स्मार्ट प्रकल्प अंतर्गत **५१ उपप्रकल्पांना** प्राथमिक मंजुरी प्राप्त असून २९ उपप्रकल्प मंजूर व त्याचे मूल्य **रु.४७.३६ कोटी**ची गुंतवणुक




## अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर

- राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, पुणे अंतर्गत ७९६ विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले .
- पशुसखी तसेच केंद्र पुरस्कृत अस्कॅड योजनांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम व भेटींचे आयोजन करण्यात येते. त्याअंतर्गत पशुसखींना प्रशिक्षण दिले .
- कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून पशुधनास होणारे आजारचे निदान, विविध योजनांचे नियोजन / अंमलबजावणी इ. बाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करणेत येईल.

## बीएसएल-२ व बीएसएल-३ प्रयोगशाळेच्या नविन इमारतीमध्ये कार्यान्वयन

### उदिष्टे

- बर्ड फ्ल्यु, लाळ-खुरकुत, विषाणु व जिवाणुजन्य रोग निदानासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळेचीउभारणे
- रोग प्रार्दुभाव नियंत्रण करणे
- पशु व कुक्कुट पक्षांची मरतुकीवर नियंत्रण
- शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे



### प्रमुख उपक्रम

- प्रणाली आणि उपकरणे स्थापित करणे
- स्थापित उपकरणांचे कॅलिब्रेशन आणि प्रमाणीकरण.
- ३० उपकरणांची खरेदी

### सद्यस्थिती

❖ केंद्रीय जैवतंत्रज्ञान विभागाकडून संस्थेच्या प्रमाणीकरणासाठी अंतर्गत समितीस मान्यता प्राप्त

❖ External members of IBSC (Institutional Biosafety committee) च्या भेटीनंतर प्रस्ताव केंद्रास सादर करण्यात येईल.

❖ ४१६ पैकी ३६० उपकरणे प्राप्त, ५६ पैकी २९ उपकरणांचा पुरवठा आदेश देण्यात आला असून, उर्वरीत २७ उपकरणांचा पुरवठा आदेश देण्याचे प्रस्तावित आहे.

❖ प्राप्त उपकरणांची उभारणी सुरु आहे. प्राप्त रु. २०.०० कोटी निधी प्राप्त निधी पैकी रु.१८.३३ कोटीचा खर्च नोंदविला आहे.

## शेळ्यांमधील देवी/ लंपी चर्म रोग प्रतिबंधक लस निर्मिती

### प्रमुख उपक्रम

- लसीच्या उत्पादनासाठी चाचणी परवाना प्राप्त
- भारतीय पशुचिकित्सा अनुसंधान संस्थान, इज्जतनगर यांच्याकडून चाचणी उत्पादनास मान्यता
- व्यावसायिक परवान्यासाठी सीडीएससीओकडे अर्ज सादर.
- सीडीएससीओ व एफडीए यांची संयुक्त तपासणी प्रलंबित.
- व्यावसायिक परवाना प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष लस उत्पादन

### पुढील १०० दिवसांचे नियोजन

- व्यावसायिक परवाना प्राप्त करुन घेणे
- प्रत्यक्ष लस उत्पादन
- पावसाळ्यापुर्वी क्षेत्रीय यंत्रणेस लस उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करणे

### सद्यस्थिती

- सीडीएससीओ, नवी दिल्ली यांनी दि.२० व २१.०३.२०२५ रोजी संयुक्त तपासणी केली असून अहवालाची प्रतीक्षा.
- अहवाल प्राप्तीनंतर अनुपालनपूर्ती अहवाल केंद्रास सादर केला जाईल.
- अनुपालन अहवालाच्या मान्यतेस अधीन राहून लस उत्पादन परवाना FDA कडून प्राप्त करून प्रत्यक्ष लस निर्मिती करणे.



## रोगप्रतिबंधक लसीकरण

- पीपीआर लसीकरण ९४.१५ टक्के झालेले आहे.
- एफएमडी (६ वी फेरी) ८४.९२ टक्के लसीकरण झालेले आहे.
- **लसीकरणानंतरचे नमुने:** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार २८ दिवसांनंतर नमुने घेण्यात आले आहेत.
- लसीकरणापुर्वीचे नमुने संकलीत करणेत आले आहेत.

## पुणे येथे c-GMP मानकांनुसार राष्ट्रीय संदर्भ लस चाचणी प्रयोगशाळेची स्थापना




- HVAC आणि BMS प्रणालीची स्थापना
- उपकरणांची खरेदी, उभारणी व कार्यान्वयन
- प्रमाणीकरणानंतर प्रकल्प हस्तांतरीत करणे
- c-GMP मानकांनुसार उत्पादित लसींचे गुणांकन करणे
- पशुधन व कुक्कुटसाठी दर्जेदार लस उत्पादनाची खात्री करणे
- एचव्हीएसी व बीएमएस प्रणाली संस्थापित करणेत आली.
- प्राप्त उपकरणांची प्रायोगिक चाचणी -प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
- BSL-II मधून BSL- III मध्ये उन्नतीकरण प्रक्रिया पूर्ण.

## खनिज मिश्रण निर्मिती केंद्र, नागपूरचे कार्यान्वयन

- संतुलित पोषणाद्वारे पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता वाढविणे
- प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित करुन खनिज मिश्रण उत्पादीत करणे.
- शेतकऱ्यांना खनिज मिश्रणाची पहिली बॅच वितरित करणे
- सद्यस्थितीत प्रक्षेत्रानुसार खनिज मिश्रणाची मागणी निश्चित करण्यात आलेली आहे.
- जिल्हा स्तरावरील मागणी संकलनाचे कार्य प्रगतीपथावर आहे. Area Specific Mineral mixture याचे दर NDDB, MAFSU व MLDB यांनी अभ्यास करून शासनास मान्यतेसाठी सादर केलेले आहे.




## २१ वी पशुगणना

- ❖ पशुधन क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी भविष्यकालीन उपाययोजनांची आखणी, योग्य नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख करणे यासाठी वस्तुनिष्ठ पशुधन संख्या (पाळीव प्राणी आणि कुक्कुट पक्षी) तसेच त्यांची जात, लिंग, वय यांचा तपशील संकलीत करण्यासाठी पशुगणना केली जाते.
- ❖ केंद्र सरकारकडून दर ५ वर्षांनी पशुगणना केली जाते. पशुगणनेचा कालावधी २५ नोव्हेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ असा होता. पशुगणनेसाठी ७४७७ प्रगणक व १४२४ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली.

# विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प

विदर्भ व मराठवाडा विभागातील दुग्ध विकासाला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने विदर्भ व मराठवाडयातील ११ जिल्ह्यात दुग्ध विकास प्रकल्प टप्पा - १ राबविला होता. या काळात,

**दैनिक दूधसंकलन वाढ** - ५५००० लिटरवरुन ३ लाख लिटर
**दूध दरातील वाढ** - रु. १८ लिटरवरुन रु. ३०-३५ प्रती लिटर
**रोजगार निर्मिती** - १० हजार

पहिल्या टप्प्यातील वरील अनुभव विचारात घेऊन विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा- २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे.



- **दुसऱ्या टप्प्याचे स्वरुप व व्याप्ती :-**
  - विदर्भ व मराठवाडयातील सर्व गावे
  - कालावधी - ३ वर्षे
  - प्रकल्प किंमत - रु १४९.२७ कोटी


## प्रमुख उपक्रम

- दुधाळ जनावरांचे वाटप,
- चाफ कटरचा पुरवठा
- शेतकरी प्रशिक्षण
- दर्जेदार चारा व सायलेजचा पुरवठा
- वंध्यत्व निवारण शिबिरे
- उच्च जनुकीय गुणवत्तेच्या गाभण गायींचा पुरवठा
- सन २०२५-२६ मध्ये योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पुर्वतयारी करणे.
- प्रकल्पासाठी स्वतंत्र "प्रकल्प संचालक" यांची नियुक्ती करणे.
- विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम सुरू करणे.
- सदरचा प्रकल्प राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्यायविभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान यांच्या अभिसरणाने (Convergence) अंमलबजावणी
- प्रकल्पांतर्गत विविध घटकांसाठी लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया सुरू करणे.



**विभागनिहाय सरासरी दूध संकलन**
**प्रती दिन लाख लिटर**

| अ.क्र | विभाग | सहकार | खाजगी | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | ०.६४ | ०.३४ | ०.९८ |
| २ | पुणे | ३०.६१ | ६५.२९ | ९५.९० |
| ३ | नाशिक | ८.७७ | ४०.९१ | ४९.६८ |
| ४ | औरंगाबाद | १.९२ | १४.२७ | १६.१९ |
| ५ | अमरावती | ०.०४ | २.४८ | २.५२ |
| ६ | नागपूर | ०.५२ | ५.३९ | ५.९१ |
| | एकुण | ४२.५० | १२८.६८ | १७१.१८ |



## वैयक्तिक लाभाच्या योजना

- मेंढपाळ समाजाला आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थैर्य प्रदान करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना
- मेंढीपालनासाठी चराई अनुदान देणे
- शेळी व मेंढीपालनासाठी जमीन खरेदीसाठी आर्थिक सहाय्य देणे
- राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेंतर्गत २०+१ मेंढी गट वाटप
- कुक्कुटपालन व्यवसायासाठी पक्षी खरेदी व संगोपनासाठी अनुदान
- राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेंतर्गत २० लाभार्थ्यांकडून प्रस्ताव प्राप्त व अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
- मेंढीपालनासाठी चराई अनुदान योजनेंतर्गत २४२० पैकी ४३४ लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
- शेळी व मेंढीपालनासाठी जमीन खरेदीसाठी DBT व्दारे निधी वितरण करण्यापुर्वी लीज रेंट, बॅक तपशील तपासणी सुरु
- कुक्कुटपालन व्यवसायाकरीता कुक्कुट पक्षी खरेदी व संगोपनासाठी १२२३ लाभार्थी निवड व लाभार्थ्यांना DBT व्दारे अनुदान वितरण करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.



## गोसेवा आयोग

- दि.०१/०३/२०२५ अखेर जिल्हास्तरावरील जिल्हा पडताळणी समितीमार्फत सुधारीत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेंतर्गत ६० टक्के अनुदान वितरीत करण्यात आलेल्या २५ गोशाळांची पडताळणी पूर्ण झालेली आहे.
- परिपोषण योजनेसाठी ६११ प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावरून प्राप्त झालेले आहेत. त्यामधून एकूण ५६८३१ पशुधनास परिपोषण योजनेंतर्गत (माहे जानेवारी २५ ते मार्च २५) योजनेंतर्गत रु. २५.५७ कोटी निधी वितरण प्रस्तावित असून त्यापैकी ५५९ गोशाळांना रु.२५.४९ कोटी प्रत्यक्ष अनुदान वितरीत.
- क्षेत्रिय स्तरावरील गोशाळांना प्रत्यक्ष भेटी देवून भृणप्रत्यारोपणासाठी सरोगेट मदर म्हणून पात्र असलेल्या गाईंची संख्या निश्चित करणेसाठी तांत्रिक निकषाप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. अहिल्या गोशाळा, येवला जि. नाशिक येथील गायीमध्ये भृणप्रत्यारोपणाची दि.२६.०३.२०२५ रोजी कार्यवाही सुरु करण्यात आली.
- प्रत्येक गोशाळेत गोबर गॅस प्लांट, तसेच इतर पशुजन्य उत्पादने तयार करून गोशाळा स्वयंपुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनास दि.२१.०३.२०२५ रोजी आराखडा सादर करण्यात आला आहे.


छायाचित्रे स्रोत: इंटरनेट




संकल्पना व व्याप्ती

# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम २०२३



**डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा. प्र.से.),** आयुक्त पशुसंवर्धन तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

शेती व शेतीपूरक उद्योग हे राज्याच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे क्षेत्र आहे. राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या उपजीविकेसाठी या क्षेत्रावर अवलंबून आहे. ग्रामीण उपजीविकेचा कणा असलेल्या कृषी व्यवसायासोबत पशुसंवर्धनसुद्धा वेगाने प्रगती करत आहे. ग्रामीण अर्थचक्राला गतिमान करणारा व्यवसाय म्हणजेच पशुसंवर्धनाचा व्यवसाय होय. महाराष्ट्राला नेहमीच प्रगतीपथावर ठेवण्यात इथल्या पशुधनाचा वाटा मोठा राहिला आहे. जनावरांमधील दूध उत्पादकता हे पशुसंवर्धन विभागासमोरील आव्हान आहे. कृत्रिम रेतन त्यावर प्रभावी माध्यम आहे. राज्यामध्ये सन २०१९ च्या २० व्या पशुगणनेनुसार ३.३१ कोटी पशुधन आहे. त्यापैकी १ कोटी ३९ लाख गोवंश व ५६ लक्ष म्हैसवर्गीय पशुधन आहे. राज्यामध्ये सन २०२४-२५ मध्ये गायींमध्ये १६ लाख ४२ हजार व म्हशीमध्ये ६ लाख ८५ हजार इतके कृत्रिम रेतन करण्यात आलेले आहे.

राज्यामध्ये कृत्रिम रेतन हे गोठीत रेतमात्राच्या माध्यमातून करण्यात येते. सदर गोठीत रेतमात्रा या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यास शासकीय गोठीत रेत प्रयोगशाळा यांच्यामार्फत पुरवठा करण्यात येतात. तसेच राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बाएफ व इतर संस्था यांच्यामार्फत सुद्धा गोठीत रेतमात्रांचा पुरवठा व वापर होत असतो. राज्यामध्ये १९४० च्या दशकाच्या आधीपासून, कृत्रिम रेतनाकरिता गोजातीय द्रवरूप रेताचा वापर करून गुरांचे व म्हशींचे प्रजनन करण्यात येत आहे. त्यानंतर तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणेमुळे,१९८०च्या दशकाच्या आधीपासून गोठवलेल्या रेताचा वापर केला जात आहे आणि आजही तीच पद्धत आजही प्रचलित आहे. पशुपैदाशीच्या जनन क्षमतेत सुधारणा करण्यासाठी, दूध उत्पादनात वाढ करण्यासाठी आणि वातावरणातील बदलांसाठी सहनक्षमता व अनुकूलन क्षमता वाढवण्यासह रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी प्रजनन सुधारणा करणे तसेच संकरण करणे हे, गुरांच्या व म्हशींच्या कृत्रिम प्रजननाचे ध्येय आहे. राज्याने स्वीकारलेल्या धोरणानुसार, पशुपैदाशीमधील दूध उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी १९७० च्या दशकाच्या आधीपासून महाराष्ट्र राज्यामध्ये, बिगर-जातीवंत गायींचे व दर्जावाढ केलेल्या....

बिगर-जातीवंत म्हशींचे संकरण (मिश्र पैदास) पद्धतशीरपणे करण्यात येत आहे. तथापि, कृत्रिम रेतनाद्वारे प्रजननासाठी वापरल्या जाणाऱ्या गोजातीय रेताच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यामध्ये पुरेसे विनियम नाहीत.

इतर राज्यांमधून महाराष्ट्र राज्यात केली जाणारी निम्न दर्जाच्या रेताची वाहतूक व वापर, कृत्रिम रेतन तंत्रज्ञांकडून रेत नलिकांचा अव्यवस्थित व तारतम्यरहित वापर हे प्रजननाचा खालावलेला दर्जा आणि तसेच अशा प्रजननातून निर्माण होणारी पशूपैदास या संबंधातील अतिशय चिंतेचे विषय आहेत. म्हणून, रेताचा दर्जा, रेत उत्पादनासाठी वापरलेल्या वळूचा रोगमुक्त दर्जा, इत्यादींची काटेकोर तपासणी करणे ही, काळाची गरज आहे आणि योग्य विधिविधानाद्वारेच केवळ ते प्रत्यक्षात आणले जाऊ शकते. म्हणून, राज्यामधील गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करण्यासाठी कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे. त्यानुसार राज्यामध्ये रेत उत्पादनासाठी प्रजननक्षम वळूंचा वापर, गोजातीय रेत संस्करण, साठवण, विक्री व वितरण, गोजातीमध्ये सहयोगी जनन तंत्रज्ञानसह कृत्रिम रेतन करणे यासारख्या गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करून त्याद्वारे गोजातीमध्ये सुधारणा करण्यासाठी “महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३” हा कायदा राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर कायदयाची अंबलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून करण्यात येत आहे.

**या कायदयाची ठळक वैशिष्ट्ये:**

(क) गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करणे;

(ख) रेत केंद्र, भ्रूण प्रत्यारोपण, प्रयोगनलिका (in-vitro) फलन प्रयोगशाळा, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था, सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवा यांची प्राधिकरणाकडे नोंदणी करणे तसेच रेत बँक, कृत्रिम रेतन सेवा पुरवठाकार, कृत्रिम रेतन तंत्रज्ञ यांची जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्ताकडे नोंदणी करणे;

(घ) वळूचे प्रमाणन करणे:



(ङ) महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना ;

(च) प्राधिकरणाद्वारे निरीक्षण, झडती व जप्ती करण्याचा अधिकार;

(छ) या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

राज्यामध्ये गोजातीय रेत, बीजांडे किंवा स्त्रीबीजपेशी यांचे उत्पादन संस्करण, साठवण, विक्री व वितरण व वापर याचे विनियमन करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १२ अन्वये “महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण” पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-०७ येथे कार्यान्वित करण्यात आलेला असून, सध्या आयुक्त पशुसंवर्धन हे प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत.

राज्यामध्ये अधिनियमाच्या कलम ३ अन्वये कोणत्याही व्यक्तीकडे अथवा संस्थेकडे नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय गोजातीय रेत, बीजांडे किंवा स्त्रीबीजपेशी यांचे उत्पादन संस्करण, साठवण, विक्री व वितरण व वापर करू शकणार नाही. राज्यातील व्यक्ती अथवा संस्थेकडे कलम ४ नुसार प्राधिकरणाचे नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय रेत केंद्र, इटी किंवा आयविएफ प्रयोगशाळा (ET-IVF), कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था, सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवापुरवठादार व सहयोगी जनन तंत्रज्ञान तज्ञ तसेच कलम ५ अन्वये जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांचे नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय रेत बँक, कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार व कृत्रिम रेतन तज्ञ म्हणून सेवा देता येणार नाही.

अधिनियम अधिसूचित केल्यापासून सहा महिन्यात प्राधिकरणकडे अथवा जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. अधिनियमा अंतर्गत विहित केलेल्या सेवेकरीता नोंदणी शुल्कासह अर्ज प्राधिकरणाकडे अथवा जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे करू शकतात. नोंदणी करिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर कायद्यांतर्गत नमूद विहित मानकांचे पालन करण्याबाबत प्राधिकरणाची अथवा जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांची खात्री झाल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

अधिनियमातंर्गत विहित केलेले शुल्क हे "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण" Maharastra Bovine Breeding Regulatory Authority यांच्या नावाने देय Demand Draft च्या माध्यामातून स्वीकारण्यात येणार आहे. उपरोक्तप्रमाणे कायद्याअंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक असून, अधिनियमा अंतर्गत विहित केलेल्या सेवाकरीता नोंदणी न करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना अधिनियमाचे उल्लंघन केल्यामुळे प्राधिकरणामार्फत शास्ती करण्याबाबत अधिनियमामध्ये तरतुदी उपलब्ध आहेत.

**कायद्यापुढील आव्हाने :-**अधिनियमाची अंमलबजावणी दुर्गम भागात खूप कठीण होऊ शकते. शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना योग्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे, प्रजनन केंद्रांचे प्रमाणपत्र आणि व्यवस्थापन प्रणाली स्थापित करणे. काही शेतकरी नव्या प्रणालीशी जुळवून घेताना संकोच करू शकतात.

**कायद्याची ठळक कलमे :-**

**कलम ३-** कोणत्याही व्यक्तीकडे अथवा संस्थेकडे नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय गोजातीय रेत, बीजांडे किंवा स्त्रीबीजपेशी यांचे उत्पादन संस्करण, साठवण, विक्री, वितरण व वापर करू शकणार नाही.

**कलम ४-** रेत केंद्र, इटी किंवा आयविएफ प्रयोगशाळा (ET-IVF), कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था, सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवापुरवठादार व सहयोगी जनन तंत्रज्ञान तज्ञ यांनी



प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक.

**कलम ५-** रेत बँक,कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार व कृत्रिम रेतन तज्ञ यांनी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे नोंदणी करणे बंधनकारक.

**कलम ६-** नोंदणी प्रक्रिया व प्रमाणपत्र वैधता

**कलम ७-**नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण

**कलम ८**-वळूचे प्रमाणीकरण

**कलम १२-** कलम १२ अन्वये "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण"ची स्थापना.

**कलम १५ व कलम १६**-प्राधिकरणाची कार्य व अधिकार

**कलम १९-** गोजातीय प्रजनन क्रियांशी राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या गोजातीय प्रजनन क्रियांशी संबंधित असणाऱ्या विहित मानकांचे पालन करण्यात कसूर करील अथवा अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन करील अथवा त्याच्या विपर्यास करील त्या व्यक्तीस दोष सिद्ध झाल्यावर शास्ती करण्याचा अधिकार.

वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रभावी अंमलबजावणी, प्रशिक्षण व जनजागृती, माहिती संकलन व विश्लेषण तसेच शेतकरी, पशुपालक व इतर भागधारक यांचा सक्रिय सहभाग यावर या अधिनियमाची भविष्यातील वाटचाल अवलंबून आहे. अनियंत्रित आणि अप्रमाणित प्रजनन नियंत्रित करण्यासाठी **"महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३"** हा कायदा नक्कीच फलदायी ठरणार आहे.

# राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत उद्योजकता विकास योजना

## National Livestock Mission



**डॉ. प्रशांत भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन (पशुधन व कुक्कुट)
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७



शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाकडे पाहिले जाते. आपले हे पशुधन म्हणजे शेतकऱ्यांचे कुटुंबच असते. याच पशुधनाचे जतन करणे अधिक सुलभ आणि सोपे व्हावे, यासाठी महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग हा नेहमी अग्रेसर असतो. यासाठी पशुसंवर्धन विभाग वेळोवेळी नाविन्यपूर्ण योजनांची अंमलबजावणी करत असतो. पशुसंवर्धनामार्फत राज्यात उद्योजक निर्माण व्हावे, यासाठी अशीच एक आगळी वेगळी योजना. आहे ती म्हणजे "केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधनअभियान योजना" अर्थात National Livestock Mission (एन.एल.एम.) होय

पशुसंवर्धनाशी निगडीत जवळपास सर्वच व्यवसाय हे ग्रामीण भागात शाश्वत उत्पन्न व रोजगाराच्या निर्मितीचे एक प्रभावी साधन आहे. पशुसंवर्धनाशी निगडीत दुग्धव्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालन या तीन व्यवसायांमुळे ग्रामीण भागातील अर्थचक्र गतिमान होत आहे. उपलब्ध नैसर्गिक संसाधनामुळे ग्रामीण भागात पशुसंवर्धनाशी निगडीत व्यवसाय करणे सहज शक्य होत असल्यामुळे राज्याच्या विकासात पशुजन्य उत्पादनांचा वाटा दिवसेंदिवस वाढत आहे.

सातत्याने वाढणारी लोकसंख्या व पशुजन्य उत्पादनांना बाजारपेठेत असलेली मागणी यामुळे पुढील काळात पशुसंवर्धनाशी निगडीत व्यवसायांचे महत्व खूप वाढणार आहे. बेरोजगारांना हक्काचा रोजगार देऊन त्यांना मालक बनविण्याची क्षमता पशुसंवर्धनाच्या व्यवसायात आहे. एवढेच नाही तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेळीपालनाचा तर ज्यांना स्वतःची शेतजमीन नाही अशा नागरिकांना परसातील कुक्कुटपालनाच्या माध्यमातून भरीव अर्थाजन करण्याची संधी पशुसंवर्धनाचा व्यवसाय देतो. शेळी व कुक्कुटपालनाचा व्यवसाय तर जेव्हा पशुपालक / शेतकरी बांधवाला आर्थिक गरज असेल, त्या-त्या वेळी सहज पैसा उपलब्ध करुन देतो. त्यामुळेच या व्यवसायांना शेतकरी / पशुपालक बांधवांचे 'एटीएम' असेही अलिकडच्या काळात संबोधले जात आहे.

पशुजन्य उत्पादनांना दिवसेंदिवस वाढत जाणारी मागणी आणि त्या तुलनेत मर्यादीत पुरवठा लक्षात घेता राज्यामध्ये पशुपालनाच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने राज्यशासनाच्या विविध योजनांबरोबरच केंद्र शासनाच्या काही महत्वपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. व्यावसायिक संधीची निर्मिती करत आधुनिक पशुपालनाच्या माध्यमातून राज्याच्या ग्रामीण विकासाला गती देणे व शेतकरी / पशुपालक बांधवांचे उत्पन्न दुप्पट करणे, तसेच पशुपालनाशी निगडीत

उद्योजक निर्माण करणे यासाठी राज्य तसेच केंद्रीय पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे. केंद्रशासनाच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागामार्फत सन २०२१-२२ पासून राज्यात राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे रोजगार निर्मिती करणे, उद्योजकता विकास करणे आणि पशुंची उत्पादकता वाढवणे, याबरोबरच या कार्यक्रमांतर्गत एका छताखाली मांस, बकरीचे दूध, लोकर, अंडी यांचे उत्पादन वाढवणे, वैरणीची उपलब्धता वाढवणे, पशुधनाच्या वंशावळीत सुधारणा करणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमास प्रोत्साहन देणे. असंघटित क्षेत्रातील उत्पादनांच्या विक्रीकरता आणि त्यांना चांगल्या दर्जाचा कच्चामाल उपलब्ध होण्याकरिता संघटित क्षेत्रांना जोडून उद्योजकता विकास साधणे, ही यामागची मुख्य संकल्पना आहे.

या योजनेची अंमलबजावणी करण्याचे काम पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य हे करत आहे. या योजनेची सविस्तर माहिती www.nlm.udyamimitra.in या ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध आहे. सदर सूचनांचे पालन करून योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराला ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करता येतो. अर्जदार हा खालील विविध उपयोजनांसाठी अर्ज सादर करू शकतो.

१) **कुक्कुटपालनाद्वारे उद्योजकता विकास:** यासाठी अर्ज सादर करताना अर्जदाराने 'कमीत कमी १००० अंड्यावरील देशी कुक्कुट पक्ष्यांचे संगोपन, अंड्यांसाठी अंडी उबवणी केंद्र उभारणे आणि एक दिवसीय पिल्ल वाढविण्यासाठी मदर युनीट उभारणे' या प्रकल्पासाठी अर्ज सादर करावा. यासाठी केंद्रशासनाचे ५० टक्के अधिकतम अनुदान रुपये २५ लक्ष देय आहे.

२) **शेळी-मेंढीपालनाद्वारे उद्योजकता विकास:** या योजनेमध्ये शेळी-मेंढीचे युनिट (१०० मादी + ५ नर ते ५०० मादी + २५ नर) यासाठी अर्ज सादर करावा. याकरिता, केंद्र शासनाचे अधिकतम ५० टक्के अनुदान अनुक्रमे रु. १० लक्ष व ५० लक्ष या प्रमाणात देय आहे.

३) **वराहपालनाद्वारे उद्योजकता विकास:** या योजनेसाठी अर्जदाराने अर्ज सादर करताना अर्जदारास ५० युनिट मादी + ५ नर ते १०० मादी + १० नर यासाठी अर्ज सादर करायचा आहे. यासाठी केंद्रशासनाचे ५० टक्के अनुदान अनुक्रमे कमाल मर्यादा रुपये १५ लाख ते ३० लाख देय आहे.

४) **पशुखाद्य व वैरण उद्योजकता विकास:** या योजनेद्वारे अर्जदारास मुरघास बेलर, वैरणच्या विटा आणि टोटल मिक्स रेशन निर्मितीकरता केंद्र शासनाचे ५० टक्के अनुदान अधिकतम मर्यादा रु. ५० लक्ष देय आहे.

५) **अश्वपालन:** या योजनेद्वारे अश्वपालन करु इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना अश्वपालनासाठी (१० मादी + २ नर, प्रकल्प किंमत रु. १०० लक्ष) ५० लाख रुपये अनुदान देय आहे.

**पात्रता :**

- या योजनांचा कोणतीही व्यक्ती, उद्योजक, शेतकरी उत्पादक संस्था (FPO), बचत गट, शेतकरी सहकारी संघटना (FPC), संयुक्त दायित्व गट, कलम ८ अंतर्गत नोंदणी असलेल्या कंपन्या लाभ घेवू शकतात. अर्जदाराने योजनेसाठी संबंधित योजनेचा सविस्तर प्रकल्प प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.
- या योजनेसाठी अर्ज सादर करताना अर्जदाराने स्वतः किंवा त्यांच्याकडील तज्ञ व्यक्तीने प्रकल्पाशी संबंधित प्रशिक्षण तसेच अनुभव घेतलेला असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराने योजनेसाठी संबंधित योजनेचा सविस्तर प्रकल्प प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.
- या योजनेसाठी अर्ज सादर करताना अर्जदाराने स्वतः किंवा त्यांच्याकडील तज्ञ व्यक्तीने प्रकल्पाशी संबंधित प्रशिक्षण तसेच अनुभव घेतलेला असणे आवश्यक आहे.

**❖ अर्ज सादर करताना लागणारी आवश्यक कागदपत्रे-**

१. सविस्तर प्रकल्प प्रस्ताव
२. प्रशिक्षण प्रमाणपत्र
३. अनुभव प्रमाणपत्र
४. जमिनीचे कागदपत्र स्वतःची / भाडेकरार व सातबारा

५) प्रस्तावित प्रकल्प जागेचे जिओ टॅग छायाचित्र
६) स्वतःचे भांडवल बँक /वित्तीय संस्थांचे कर्जाबाबत पुरावा
७) पॅन कार्ड
८) वास्तव्य पुरावा (मतदान ओळखपत्र, बँकेचे पासबुक, विज देयक, दूरध्वनी देयक, पाणी पट्टी, भाडेकरार)
९) मागील सहा महिन्यांचे बँक स्टेटमेंट
१०) कॅन्सल बँक चेक
११) आधार कार्ड
१२) अर्जदाराचा फोटो
१३) जात प्रमाणपत्र
१४) शैक्षणिक प्रमाणपत्र
१५) भागीदारी करार
१६) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र लागू असल्यास
१७) नोंदणी प्रमाणपत्र (FPO/FCO/Sec.८ कंपनी साठी)
१८) नाव, आधार नंबर, भ्रमणध्वनी क्रमांक व पत्ता मागील
१९) तीन वर्षाचा ऑडिट रिपोर्ट लागू असल्यास
२०) मागील तीन वर्षाचा आयकर विवरणपत्र लागू असल्यास

- ❑ या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे एक व्यक्ती एका पेक्षा जास्त प्रकल्पासाठी अर्ज करू शकतो. कुठल्याही प्रवर्गाचा व्यक्ती अर्ज करू शकतो. सर्वांना अनुदान सारख्याच प्रमाणात मिळते. या योजनेला अंतिम तारीख नाही.
- ❑ प्रत्येक पात्रताधारकाला योजनेचा लाभ घेता येवू शकतो.
- ❑ केंद्र शासनाच्या या योजनांचा राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थीनी लाभ घेतल्यास राज्यात जास्तीत जास्त उद्योजक निर्माण होतील व त्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होईल. तसेच, या उद्योगाशी संलग्न असलेल्या जास्तीत जास्त पशुपालकांना नवीन स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होवून राज्याला प्रगतीच्या दिशेने अग्रेसर करण्यास हातभार लागू शकेल.
- ❑ अधिक माहितीसाठी खालील ठिकाणी संपर्क साधावा
- ❖ नजीकचा शासकीय पशुवैद्यकीय दवाखाना,
- ❖ जिल्ह्याचा किंवा तालुक्याचा पशुसंवर्धन विभाग
- ❖ पशुसंवर्धन विभाग टोल फ्री क्र. १८०० २३३ ०४१८ अथवा www.nlm.udyamimitra.in / dahd.maharashtra.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

**NLM हेल्प डेस्क संपर्क**

**सोमवार ते शुक्रवार**

**कार्यालयीन वेळ स. ०९.४५ ते सायं. ०६.१५**

८२७५१६९९७२; ८२७५०८७२०८; ८२७५३७५४९३;
(७५८८९०१८५९ वैरण प्रकल्प)
०२०-२५६९०४८०; ०२०-२५६९०४८१; ०२०-२५६९०४८५


छायाचित्र स्रोत: इंटरनेट



छायाचित्र स्रोत: इंटरनेट



# पशु-पक्षांमध्ये प्रतिजैविकांचा वापर, वाढता प्रतिरोध व मानवी आरोग्य

## (अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स - AMR)



**डॉ. सुनिल लहाने,**
उपआयुक्त पशुसंवर्धन
रोग अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

सन १९२८ मध्ये अलेक्झांडर फ्लेमिंग या शास्त्रज्ञाने सर्वात प्रथम पेनिसिलीन ह्या पहिल्या प्रतिजैविकाचा (Antibiotics) शोध लावला. त्यामुळे, मानव आणि पशु-पक्षांना जीवाणूंमुळे होणाऱ्या बऱ्याचशा रोगांपासून बरे होण्यास मदत मिळाली. जादू झाल्यासारखे जिवाणूंमुळे होणारे रोग बरे होऊ लागले. पुढे अनेक प्रतिजैविकांच्या उपलब्धतेमुळे सगळ्या प्रकारचे संसर्गजन्य रोग सहज नियंत्रणात येऊ लागले. परंतु, नंतरच्या काळात याचा एक परिणाम असाही झाला की, प्रतिजैविकांचा अनिर्बंध वापर सुरु झाला. छोट्या-छोट्या आजारांकरिता मानवास व पशु-पक्ष्यांना सर्रास प्रतिजैविके देण्यास सुरुवात झाली. प्रतिजैविकांच्या अती तसेच अनावश्यक वापरामुळे प्रतिजैविकांच्या विरोधात सूक्ष्मजंतूंमध्ये प्रतिकारकशक्ती कमी होत गेली आणि प्रतिजैविकांची परिणामकारकता ढासळू लागली. यालाच **"ड्रग रेझिस्टन्स"** म्हणतात. बरेच जीवाणू प्रतिजैविकांना दाद देईनासे झाल्याचे दिसून येऊ लागले. असा वारंवार अनुभव येऊ लागला की, आजारी पडल्यानंतर पशु-पक्षी एका प्रतिजैविकाला दाद देत नाहीत. मग दुसरे प्रतिजैविक वापरुन पाहिले जाऊ लागले, ते पण लागू पडत नाही व आजार बळावतो असेही दिसून येऊ लागले.

हल्ली असा अनुभव वारंवार येऊ लागला आहे की, प्रक्षेत्रावरील पशु एखाद्या संसर्गजन्य रोगाने आजारी पडतो. एकाही प्रतिजैविकाला त्याचा आजार दाद देत नाही. त्यामुळे दुसरे प्रतिजैविक वापरुनही ते लागू पडत नसल्याचे दिसून येते. पुढे सदर आजार बळावतो. काहीवेळा नशिबाने तिसरे प्रतिजैविक लागू पडते. पण, तोपर्यंत जनावराची शारीरिक शक्ती संपलेली असते. त्यामुळे आजार बरा झाला तरी खाली बसलेली जनावरे पुन्हा उठून बसू शकत नाहीत व नंतर मृत्युमुखी पडतात. परंतु, कुठलेच प्रतिजैविक जर लागू पडले नाही तर मग मात्र कठीण प्रसंग येतो. आपण सगळे जर वेळीच जागरूक झालो नाही, तर असे अनुभव यापुढे वारंवार येऊ लागतील. अशाच प्रकारचे अनुभव मानवांमध्येही दिसून येत असल्याचे अनेक वैद्यकीय व्यावसायिक सांगत आहेत.

अशातच काही पशु-पक्षी या आजारांना बळी पडू लागले. यालाच "मल्टी ड्रग रेझिस्टन्स" (MDR) असे म्हणतात.

जी औषधे जिवाणूजन्य आजाराचा प्रादुर्भाव झाल्यावर आजार बरा करण्यासाठी वापरली जातात, त्यांना **"अँटिबायोटिक्स"** (प्रतिजैविके) म्हणतात. तर, जी औषधे जिवाणू, विषाणू, बुरशी, परजीविजन्य आजाराचा प्रादुर्भाव झाल्यावर आजार बरा करण्यासाठी वापरली जातात, त्यांना **"अँटिमायक्रोबियल्स"** म्हणतात. दोन्ही प्रकारची औषधे ही वैद्यकीय सल्ल्यातून घेतली जाणे अपेक्षित आहे. परंतु, तसे न केल्याने प्रतिजैविकांची परिणामकारकता कमी होऊन बरेच जीवाणू प्रतिजैविकांना दाद देईनासे झाले आहेत. यालाच **"अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स" (AMR)** असे म्हटले जाते.

प्रतिजैविकांच्या अनियंत्रित वापरामुळे "अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स" (AMR) ही समस्या निर्माण झाली आहे. हे असे का झाले हे समजून घेण्यासाठी प्रतिजैविके कशी काम करतात, जिवाणूंवर त्यांचा काय परिणाम होतो, प्रतिजैविके निकामी न होता आपल्याला नेहमीच उपयोगी यावीत यासाठी आपण काय करू शकतो, हे समजून घेणं नितांत गरजेचे झाले आहे.

आज जगभरात अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स ही एक अत्यंत महत्त्वाची समस्या मानली जात असून या समस्येवर तातडीने आणि गंभीरपणे उपाय योजने आवश्यक असल्याचे व त्यावर वेळीच नियंत्रण आणणे आवश्यक असल्याचे मत जगभरातील शास्त्रज्ञे नोंदवित आहेत.

**अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स वाढण्याची कारणे:**

- पशु वैद्यकीय सल्ल्याविना उपचार करणे.
- पशु-पक्ष्यांमध्ये अँटिमायक्रोबियल्सचा सर्रास वापर करणे.
- पशू-पक्ष्यांना अँटिबायोटिक्स आवश्यक मात्रेप्रमाणे न देता कमी अथवा जास्त प्रमाणात देणे.
- कारण नसताना जास्त काळासाठी अँटिबायोटिक्सचा उपयोग करणे.
- मुदतबाह्य किंवा उरलेल्या अँटिबायोटिक्सची योग्य विल्हेवाट न लावता फेकून देणे.
- पशु-पक्ष्यांमध्ये वाढ होण्यासाठी वाढीस प्रेरक (ग्रोथ प्रोमोटर) म्हणून अँटिबायोटिक्सचा वापर करणे.
- रोगनिदान न करता तसेच आवश्यक नसताना अँटिबायोटिक्स देणे.
- आजाराचे योग्य निदान न करता एकाच उपचार पद्धतीचा अवलंब करणे.
- पशुखाद्य घटकांच्या साठवणीकरिता अँटिबायोटिक्सचा होत असलेला वापर.
- प्रतिरोध व दुष्परिणामाबद्दल अत्यल्प जनजागृती.


छायाचित्रे स्रोत: इंटरनेट

**क्षेत्रीय स्तरावर / पशू-पक्षी प्रक्षेत्रावर (फार्मवर) अँटिमायक्रोबियल प्रतिरोध कमी करण्यासाठी उपाययोजना :**

- अँटिबायोटिक्स पशुवैद्यकाच्या सल्लयानेच वापरावेत.
- पशुवैद्यकाने दिलेली औषधे ठरवून दिलेल्या मात्राप्रमाणेच द्यावी.
- उरलेल्या / खराब झालेल्या औषधांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावावी.
- जनावरांच्या मलमूत्राची योग्यरित्या विल्हेवाट लावावी जेणेकरून पिण्याच्या पाण्याचे स्रोत प्रतिरोधी जिवाणूंपासून दूषित होणार नाहीत.
- प्रक्षेत्रावर स्वच्छतेनंतर निर्जंतुकीकरण करावे.
- जनावरांच्या खाद्यात अँटिबायोटिक्सचा वापर वाढीस प्रेरक (ग्रोथ प्रोमोटर) म्हणून करू नये.
- दुभत्या जनावरावर अँटिबायोटिक्सचा उपचार सुरु असेल, तर औषध दिल्यानंतर कमीत कमी ७२ तास दुधाची विक्री / वापर करू नये.

**अँटिमायक्रोबियल प्रतिरोध कमी करण्यासाठी जागरूकता व इतर उपाय :**

- अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्सबद्दल विविध माध्यमांद्वारे समज आणि जागरूकता वाढविणे.
- याकरिता जनसंपर्क मोहिमांचे आयोजन करणे.
- संशोधनाच्या माध्यमातून जागरूकता वाढविणे.
- प्रक्षेत्रावर वैयक्तिक स्वच्छता ठेवावी जेणेकरून आजाराचा संसर्ग होणार नाही.
- अँटिमायक्रोबियल्सचा नियंत्रित वापर करणे.
- नवीन औषधांवर संशोधन, आजारांचे निदान आणि लसीकरण यावर भर देणे.
- आरोग्य विभाग व पशुसंवर्धन विभागाने समन्वयाने काम करणे.

पुढील पृष्ठावर...

**मानवी आरोग्यावर होणारे परिणाम :** अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स (AMR) हा पशु-पक्षांमधून मानवामध्ये पसरू शकतो असे जगभरातील संशोधनातून सिद्ध झालेले आहे. पशुजन्य खाद्य पदार्थांमधून पसरत असलेला अँटिबायोटिक्सचा अंश हे यासाठीचे प्रमुख कारण असू शकते. अँटिबायोटिक्सचा उपचार सुरू असलेल्या आजारी जनावरांचे दूध/मांस अँटिबायोटिक्स औषध दिल्यानंतर कमीत कमी ७२ तास सेवनासाठी वापरू नये असा सर्वसाधारण मानक असला तरीही तसे होत नसल्याने अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स मानवामध्ये पसरू शकतो.

जनावरांमध्ये आणि मानवीय आजारांमध्ये वापरण्यात येणारे बहुतांश अँटिबायोटिक्स आणि अँटिमायक्रोबियल्स हे सारखे असून ते रुग्णांच्या वजनानुसार वापरले जात असल्याने फक्त वापरण्याचे प्रमाण भिन्न आहे. आणि म्हणूनच जनावरांवर केले जाणारे उपचार अत्यंत बारकाईने आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून करणे गरजेचे आहे. औषध दुकानदारांनी सुद्धा डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय प्रतिजैविके विकू नयेत. केवळ याद्वारेच या समस्येवर खात्रीशीर उपाय होऊ शकतो.

जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक प्राणी आरोग्य संघटना (OIE/WOAH) आणि जागतिक खाद्य आणि कृषी संघटना (FAO) या तिनही आंतरराष्ट्रीय संघटनांनी प्रतिजैविकांचा उपयोग आणि त्यांच्या वाढत्या प्रतिरोधाबद्दल एकत्रितपणे काम करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. वन हेल्थ या संकल्पनेत सुद्धा या बाबतीत ठोस पावले उचलण्यात येत आहेत. या करीता या तिनही संघटनांनी मिळून एक 'त्रिपक्षीय करार' केला आहे.




जागतिक आरोग्य संघटनेने असेही अनुमान केले आहे की, जर प्रतिजैविकांच्या (अँटिबायोटिक्स) अयोग्य वापरावर वेळीच निर्बंध घातले नाहीत तर पुढील काही वर्षात जिवाणूंच्या संसर्गाने झालेल्या रोगांनी मरणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड वाढू शकते. कारण जीवाणू प्रतिजैविकांना दाद देईनासे होत आहेत. प्रतिजैविके निष्प्रभ झाल्यामुळे आपण पुन्हा प्रतिजैविके उपलब्ध नसलेल्या काळात फेकले जाऊ. त्यामुळे, प्रतिजैविकांच्या (अँटिबायोटिक्स) वापराबाबत कायम जागरूकता ठेवणे, हेच मानव जातीकरिता शहाणपणाचे ठरेल असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

# पशुधनाचे रोग निदान



**डॉ. वैभव पाटील,**
पशुधन विकास अधिकारी,
सघन कुक्कुट विकास गट,
जिल्हा: धाराशिव



छायाचित्रे स्त्रोत: इंटरनेट

जनावरांचे उत्तम आरोग्य हा पशुसंवर्धनाच्या व्यवसायाचा मुख्य कणा आहे. पशुसंगोपनामध्ये पशुआरोग्याला अनन्यसाधारण महत्व आहे. जनावरांना निरनिराळे आजार होत असतात. आजारामुळे पशुधनाची उत्पादकता कमी होते व पशुपालकांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे या आजारांचे नेमके निदान करणे आवश्यक असते. जनावरांच्या शारीरिक बदलावरून आजारी जनावर कळते. परंतु, आपण जर प्रयोगशाळेत तपासणी केली तर रोगाचे निश्चितीकरण करून तो लवकर बरा करता येतो. याचबरोबर साथीच्या आजारामध्ये सुद्धा रोगनिश्चिती ही रोग नियंत्रणासाठी उपयुक्त ठरते. रोगनिदानात प्रयोगशाळेत विविध चाचण्या केल्या जातात. शरीरातील विशेष द्रव जसे रक्तजल, दूध, रक्त, मूत्र, शेण, सायनोव्हिअल द्रव, सेरेब्रोस्पायनल द्रव इ. बाबी तसेच प्रत्यक्ष शरीराची आधुनिक उपकरणाद्वारे रोगनिश्चिती करून त्वरित उपचार करणे पशुवैद्यकांना शक्य होते.

## प्रयोगशाळेतील रोगनिदान:

**शारीरिक चाचणी:** यामध्ये एक्स रे, अल्ट्रासोनोग्राफी यासारख्या आधुनिक तंत्राद्वारे हाड मोडणे, शरीरातील अंतर्गत भागाच्या चाचण्या, श्वासनलिका, पोट यामधील अनावश्यक बाबींची तपासणी करून शस्त्रक्रियेद्वारे उपचार करता येतात.

**रक्त व रक्तजल तपासणी:** संसर्गाने होणारे बरेचसे रोग या तपासणीद्वारे तपासता येतात. रक्तातील घटक जसे लोह (Hb), पीसीव्ही (PCV), एमसीव्ही (MCV), एलएफटी (LFT), केएफटी (KFT) या चाचण्या शरीरक्रियामधील दोष ओळखण्यास उपयुक्त ठरतात.

**रक्ताची काचपट्टीवरील तपासणीः** याद्वारे रक्तातील जिवाणू, आदिजीव यांचा संसर्ग काचपट्टी घेऊन सूक्ष्मदर्शकाद्वारे पाहता येतो. तसेच रक्तातील पेशींची संख्यासुद्धा तपासात येते, जेणेकरून योग्य ती उपाययोजना करता येते.

**रक्ताची जिवाणूंसाठी तपासणी:** सूक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळेत रक्ताचे कृत्रिम अन्नघटकांवर निर्जंतुक पद्धतीने संवर्धन केले असता रोगास कारणीभूत ठरणारे जिवाणू वेगळे करून उपचारासाठी योग्य प्रतिजैविके निवडता येतात.

**रक्तजल तपासणी:** पेशीपुंजके बनविणे, साका बनविणे, पेशीआवरण फाडून पेशीतील हिमोग्लोबिनचे रक्तद्रवात विद्रावण करणे या तीन प्रकारच्या क्रियांवर रक्तजलशास्त्र विभागात होणारी बहुतेक सर्व परीक्षणे आधारलेली असतात. संसर्गित रोगांचे निदान रक्तजल तपासणीद्वारे जसे एलायजा चाचणी, एजिपीटी चाचणी, पीसीआर (PCR) इत्यादी करून पशुवैद्यकांना आजार प्रतिबंधक उपाय करणे शक्य होते.

**रोझ बंगाल प्लेट टेस्ट:** ब्रुसेलोसिससाठी रोझ बंगाल प्लेट टेस्ट ही एक सोपी आणि सामान्य चाचणी आहे. ही चाचणी रक्ताच्या नमुन्यापासून वेगळे केलेल्या सीरममधील ब्रूसेला जिवाणूविरुद्ध प्रतिपिंड शोधते. ही एक जलद परंतु प्राथमिक चाचणी आहे. पुढील पुष्टीकरणासाठी, एलायजा (ELISA) सारख्या चाचण्या उपलब्ध आहेत, ज्याद्वारे विशिष्ट संसर्गजन्य रोगांविरूद्ध प्रतिपिंड / विशिष्ट रोगांचे प्रतिजन प्राण्यांच्या रक्तामध्ये शोधले जाऊ शकतात.

**त्वचेची तपासणी:** जनावरांच्या त्वचेवर बाह्य किटाणूंपासून (गोचीड, उवा, पिसवा) तसेच इतर परोपजीवींचा मारा होतो. त्यांच्या माध्यमातून इतर काही महत्त्वाच्या रोगाचा प्रसार होत असतो. खरूज विशेषतः तोंडावर, कानावर तसेच शेपटीच्या भागावर आढळते. अशा आजारांच्या परीक्षणासाठी कातडीचा बाधित भाग खरडून त्याचे नमुने निर्जंतुक बाटलीमध्ये गोळा करावेत. त्वचेचे हे गोळा केलेले नमुने प्रयोगशाळेमध्ये परीक्षणासाठी पाठवावेत. बुरशीजन्य आजारासाठी त्वचेच्या वरच्या थराची तपासणी लॅक्टोफेनॉल कॉटन ब्लू या द्रवाने रंगवून सूक्ष्मदर्शकाद्वारे करतात.

**शेणाची तपासणी:** जनावराच्या शरीरातील पचनसंस्था, इतर अवयवातील परोपजीवी जंत, जंतांची अंडी यांचे परीक्षण करण्यासाठी शेणाची परीक्षा करणे गरजेचे असते. शेणाचे नमुने प्रयोगशाळा परीक्षेसाठी गोळा करताना शक्यतो खाली पडलेले शेण घेण्याऐवजी गुदद्वारात हात घालून साधारण ५ ग्रॅम शेण काचेच्या बाटलीत घ्यावे. शेणाचे तपासणीद्वारे गोलकृमी आणि चपटेकृमी तसेच पट्टकृमी यांची ओळख करून त्यावर योग्य ते उपचार करू शकतो.



छायाचित्र स्रोत: इंटरनेट

**योग्य प्रतिजैवीसाठी तपासणी:** विविध जिवाणूमुळे होणाऱ्या आजारांचे निदान करून योग्य ते प्रतिजैविक निवडणे शक्य होते. या तपासणीमध्ये कृत्रिम माध्यमांवर शरीरद्रव, पू, रक्त, लघवी, दूध इत्यादी योग्य ते नमुने प्रयोगशाळेत कृत्रिम वातावरणात शरीराबाहेर वाढवून प्रतिजैविकांसोबत जिवाणूंचा प्रतिसाद पाहता येतो. तसेच सदर प्रतिजैविक निश्चित उपचार म्हणून वापरता येते. केंद्रसरकारच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रयोगशाळा आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रात पशुसंवर्धन विभागातर्फे पुणे व विभागीय प्रयोगशाळा ठिकठिकाणी उपलब्ध आहेत. तसेच पशू महाविद्यालय, संशोधन केंद्रामध्येही रोगनिदानाच्या सोयी उपलब्ध आहेत.

**दूध नमुने तपासणी:** दूध उत्पादन व्यवसायामध्ये कासदाह (Mastitis) या आजारामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. ते टाळण्यासाठी दरमहा जनावरांच्या दुधाचे नमुने घेऊन कॅलिफोर्निया मस्टायटीस चाचणीद्वारे (CMT) गोठ्यातच तपासणी करता येते. दुधाचे नमुने गोळा करण्यासाठी प्लास्टिकचे चौपाळे वापरावे. प्रत्येक कप्प्यामध्ये पुढील दोन व मागील दोन सडातील दुधाचे नमुने घ्यावेत. त्यामध्ये कॅलिफोर्निया मस्टायटीस द्रव एक किंवा दोन थेंब मिसळावे म्हणजे त्वरित निदान करता येते.

**रासायनिक तपासणी:** रासायनिक पदार्थ किंवा काही कीटकनाशकांमुळे जनावरांमध्ये विषबाधा झालेली असल्यास प्रयोगशाळेमध्ये बाधित अवयव पाठवून परीक्षण करण्यात येते. साथीच्या आजारात गाई-म्हशी, बैल इत्यादी मृत्युमुखी पडल्यास त्यांचे शवविच्छेदन करून शरीरातील विशिष्ट अवयवांचे नमुने प्रयोगशाळेमध्ये परीक्षणासाठी पाठवावेत. त्यामुळे पशुवैद्यकांना परिणामकारक औषधोपचार तसेच त्वरित रोगनियंत्रण करणे सहज शक्य होते. न्यायवैद्यक प्रकरणामध्ये तसेच विमा दावा प्रकरणामध्ये शवविच्छेदन करून शवविच्छेदन तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक असते.

## विभागीय पशुरोग निदान प्रयोगशाळा

राज्यातील पशुधनाची वाढती संख्या लक्षात घेता क्षेत्रीय स्तरावर पशुरोग निदानाची कार्यवाही वेळेत होणेसाठी सध्या नागपूर, अकोला, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, चिपळूण व लातूर अशा आठ विभागीय पशुरोग निदान प्रयोगशाळा (RDIL) आहेत. प्रादेशिक प्रयोगशाळांनी आपापल्या विभागात जलद रोग निदान करणे, अचूक निदानासाठी विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मदत करणे, आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या जिवाणूजन्य व विषाणूजन्य आजाराबाबत संदर्भ प्रयोग शाळेशी समन्वय साधून त्याचा विदा (डाटा) विभागवार गोळा करून रोगाचा अंदाज वर्तवून त्याप्रमाणे पशुपालकांना व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सल्ला देणे, वारंवार होणाऱ्या विषाणू व जिवाणूच्या उत्परिवर्तनामुळे (Mutation) ज्या अडचणी निर्माण होतात त्या दूर करण्यासाठी त्यांचे सर्व नमुने जतन करून ठेवणे, विभागातील कुक्कुट, वराह यांच्या रोगाबाबत तपासण्या करून संबंधितांना प्रमाणपत्र देणे आदी कामे या प्रयोगशाळांद्वारे करण्यात येतात.



छायाचित्र स्रोत: इंटरनेट

**मूत्र तपासणी:** मुत्रामधील बाह्य गुणधर्म (रंग, वास, पीएच. इ) व मूत्रामधील विविध रासायनिक घटकाचे प्रमाण मोजून मूत्र तपासणी करण्यात येते. मूत्र तपासणीसाठी प्रथमतः जनावराचे सुरवातीचे थोडे मूत्र गोळा करू नये. थोडेसे मूत्र वाहून गेल्यानंतरचे मूत्र टोल्युन किंवा थायमॉल असणाऱ्या निर्जंतुक काचेच्या बाटलीत गोळा करावे. बाटतील गोळा केलेले मूत्र लगेच रोगनिदान करण्यासाठी प्रयोगशाळेत पाठवावे. मूत्र परीक्षणामुळे मूत्रपिंड तसेच त्या संस्थेशी निगडित विविध आजारांचे निराकरण करणे शक्य होते. या व्यतिरिक्त विविध चयापचयाच्या आजाराचेही मूत्र तपासणीद्वारे निदान करता येते. लघवीचा नमुना प्रयोगशाळेत दिल्यास रॅपिड यूरीन टेस्ट या पद्धतीने जे घटक आढळून येतात त्याच्या प्रमाणात कमी जास्त होणारा प्रादुर्भाव जनावरांमध्ये रोखता येतो. सामू हा ॲसिडीटी ओळखण्यासाठी महत्त्वाचा ठरतो, प्रोटीन, ग्लुकोज, नायट्राइट, केटोन बॉडीस, बिलीरुबीन, युरोबिलीनोजेन, लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी हे सर्व घटक लघवीत सहसा नसतात. पण यातील प्रत्येक घटक लघवीत वेगवेगळ्या आजारांसाठी कारणीभूत आहेत. लघवीचा रंग, पातळपणा, रासायनिक रचना व सूक्ष्मयंत्राद्वारे पेशी व जिवाणू ओळखून वेगवेगळे निदान करता येते. मूत्रमार्गातील संक्रमण, रक्तस्राव, यकृत, मूत्रपिंडातील रोग, मधुमेह, रक्तातील आजार, मूत्रखडे, जिवाणू, बुरशी ओळखून त्वरित उपचार सुरू करावेत.

# गाई-म्हशीतील वंध्यत्व: कारणे व उपाययोजना



**डॉ. गणेश निटूरे**
पशुधन विकास अधिकारी
तालुका लघु पशुवैद्यकीय
सर्वचिकित्सालय, रेणापूर, जि. लातूर



दुग्धव्यवसायाचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत ५ टक्के योगदान असून, महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार देशपातळीवर राज्याचा १३७ लक्ष मेट्रिक टन दूध उत्पादनसह सहावा क्रमांक लागतो. देशातील दूध उत्पादनात अग्रेसर असलेल्या इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील दुधाळ गाई- म्हशींची दूध उत्पादनक्षमता कमी आहे. याची विविध कारणे असून, दुधाळ जनावरे भाकड राहण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांच्यामध्ये असलेले वंध्यत्व होय.

**वंध्यत्व:** गाई-म्हशींमध्ये पुनरुत्पादनासाठी तात्पुरती असमर्थता निर्माण होणे, यास वंध्यत्व असे म्हणतात. सन २०१९ च्या २० व्या पशुगणनेनुसार राज्यामध्ये एकूण १,९५.९५,९९६ गायी-म्हशी असून, त्यापैकी ५६,२२,५२७ गाई व ३२,८१,६५७ म्हशी पैदासक्षम आहेत. राज्यात नोव्हेंबर- २०२३ महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या 'राज्यव्यापी वंध्यत्व निवारण अभियान' मध्ये तपासणी करण्यात आलेल्या ५ लाख पशुधनापैकी ३० टक्के म्हणजेच १.५ लाख गायी-म्हशींमध्ये वंध्यत्वाची समस्या आढळून आली आहे. ही बाब दुग्धव्यवसायाच्या यशस्वीतेसाठी बाधक असून, तज्ञ पशुवैद्यकांच्या सल्ल्याने शाश्वत उपचार करुन या समस्येचे उच्चाटन करणे आवश्यक आहे.

**वंध्यत्वाचे प्रकार:**

वंध्यत्वाचे प्रामुख्याने कायमचा आणि तात्पुरता असे दोन प्रकार आहेत. या दोन्ही प्रकारांपैकी तात्पुरत्या वंध्यत्वामध्ये उपचार करुन पशुधन पुन्हा उत्पादनक्षम करणे शक्य होते. मात्र, कायमच्या वंध्यत्व प्रकारात उपचार करुनही अपेक्षित साध्य होत नाही.

**कायमचे वंध्यत्व:** अनुवांशिक कारणामुळे निर्माण होणारे जन्मजात जनेंद्रियातील रचनेतील दोष यास कारणीभूत आहेत. याचे प्रमाण २.५ टक्क्यांपर्यंत असू शकते.

**कारणे:** स्त्रीबीजांड नसणे, स्त्रीबीजांडाची अपूर्ण वाढ, स्त्रीबीजवाहक नलिका नसणे, गर्भाशयाची अपूर्ण वाढ, गर्भाशयाला एक शिंग किंवा दोन्ही शिंग (Horne) नसणे, दोन कमळमूख असणे, **फ्री मार्टिन**-ज्यावेळी गाईला दोन जुळे वासरे जन्माला येतात आणि त्यापैकी एक गोरा व एक कालवड असल्यास अशा कालवडीपैकी ९० टक्के कालवडी प्रजननक्षम नसतात.

**उपाय:** कायमच्या वंध्यत्वावर उपचार नाही.

**तात्पुरते वंध्यत्व:** हे उपचाराने दुरुस्त होवू शकतात. विविध अधिग्रहीत होणारे दोष यासाठी करणीभूत आहेत, जसे

**१ स्त्रीबीजांडाचे दोष:** स्त्रीबीजांडाचे दाह, स्त्रीबीजांडावर कर्करोगाच्या गाठी येणे.

**२ गर्भाशयाचे दोष:** गर्भाशयावरील कर्करोगाच्या गाठी, गर्भाशयातील उतकांचे थर- एंडोमेट्रियम, मायोमट्रियम, पेरीमेट्रियम विशेषतः गर्भाशयाच्या आतील एंडोमेट्रियम थराचा दाह- एंडोमेट्रायटीस, पायोमेट्रा, म्युकोमेट्रा, हायड्रोमेट्रा इ.

**३ कमळमुखाचे दाह:** सर्विसायटीस

**उपाय:** तज्ञ पशुवैद्यक यांच्याकडून याबाबत निदान तसेच प्रतिजैवक संवेदनशील चाचणीनंतर योग्य प्रतिजैवके निवड करून यावर उपचार करता येतो.

**माजावर न येणे (Anesturs):** क्षेत्रीय स्तरावरील पशुपालकांना ही एक मोठी समस्या आहे.

**कारणे:** संप्रेरकाच्या असंतुलनामुळे येणारे वंध्यत्व:गाई-म्हशीतील माजचक्र हा २१ दिवसांचे असून, प्रजननाची संपूर्ण क्रिया शरीरातील निरनिराळ्या संप्रेरकावर अवलंबून असते. यापैकी कोणत्याही संप्रेरकाचे असंतुलन झाल्यास गाई-म्हशीच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो. असमतोल आहार, निष्क्रिय स्त्रीबीजांड, स्त्रीबीजांडावर असणारे पितपिंड (कॉरपस ल्युटीयम ) गर्भधारणा न होता सुद्धा ते नाहीसे होत नाही. त्यामुळे गाई-म्हशी पुन्हा माजावर येत नाही. अपेक्षित शारीरिक वजनवाढ नसणे हे सुद्धा जनावरे माजावर न येण्याचे प्रमुख कारण आहे. पशुप्रजननाचा आणि माजावर येण्याचा थेट संबंध असून, अपेक्षित शारीरिक वजनवाढ असणाऱ्या पशुधनामध्ये उच्च प्रजननक्षमता दिसून येते. सर्वसाधारणपणे कालवडी २५० कि.ग्रॅ. तर पारड्या २७५ कि. ग्रॅ. शारीरिक वजन गाठल्यानंतर पहिला माज दर्शवितात.

**उपाय :**

गर्भाशयाची नियमित तपासणी करणे, आहारामध्ये खनिज मिश्रणाचा वापर, बाजारात उपलब्ध असलेल्या माजावर येण्यासाठीच्या आयुर्वेदिक औषधीचा वापर,जिवनसत्व अ, ड, इ यांचे इंजेक्शन, लुगोल्स आयोडीनचा वापर पशुवैद्यक करतात. तसेच तज्ञ पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली ओवोस्यंक व इतर संप्रेरकाचा प्रोटोकॉल वापरुन गाई-म्हशी माजावर आणता येतात. गाई-म्हशींमध्ये शेण तपासणीनंतर जंत प्रादुर्भाव दिसून आल्यास जंत निर्मुलन तसेच, रक्त तपासणीनंतर त्यामध्ये काही घटकांची कमतरता दिसून आल्यास पशुवैद्यकांच्या सल्ल्याने योग्य त्या औषधोपचाराचा अवलंब करण्यात यावा.

**सर्व पशुपालकांनी पशूंचे शारीरिक वजनवाढीची साप्ताहिक नोंद त्यांच्याकडे ठेवणे गरजेचे आहे. वजन काढण्यासाठी खालील सूत्र वापरावे.**



छातीचा घेर      लांबी

$$\text{शरीर वजन (कि.ग्रॅ)} = \frac{(\text{छातीचा घेर इंचात})^2 \times \text{लांबी इंचात}}{६६०}$$

**जनावरांचे वजन मोजणे**



**मुका माज दाखवणे (Silent Heat):** गाई-म्हशी माजावर असूनही त्याची बाह्य लक्षणे दाखवत नाहीत. यामुळे पशुपालक त्यांना भरवत नाहीत. तापमान वाढीमुळे विशेषतः उन्हाळ्यामध्ये म्हशीमध्ये ही फार मोठी समस्या निर्माण होत आहे. शारीरीक तापमान नियंत्रण राखण्यासाठी म्हशी तुलनेने अकार्यक्षम असतात.

**उपाययोजना**

उन्हाळ्यामध्ये गोठा थंड ठेवण्यासाठी छताला चुना लावणे, त्यावर पाचट/तनस टाकणे, उन्हाळ्यामध्ये गोठ्यातील तापमान नियंत्रणासाठी फॉगर्स तसेच फॅनचा वापर करणे, जास्तीत जास्त पशुपालकांनी मुक्त संचार गोठा पद्धत अवलंबणे, गाई-म्हशीतील माजाच्या लक्षणाची विशेषतः पहाटे आणि रात्रीच्या वेळी निरीक्षण करणे, ऋतुचक्राच्या नोंदी ठेवणे, तज्ञ पशुवैद्यकांकडून संप्रेरकांचा वापर करून गोठ्यातील सर्व गाई-म्हशींना माज एकत्रीकरण प्रक्रियेद्वारे (Oestrus Synchronization) एकाच दिवशी माजावर आणणे आणि भरवणे सुद्धा शक्य आहे.

**उलट्णारा माज (Repeat Breeding):** गाई-म्हशी सलग तीनपेक्षा अधिक वेळा रेतन केल्यानंतरही गर्भधारणा न होता पुन्हा माजावर येतात, असा हा उलटणारा माज असतो. संकरीत गाईमध्ये याचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत असू शकते.

**<u>कारणे:</u>** सदोष स्त्रीबीज, लवकर स्त्रीबीज सुटणे, स्त्रीबीज सुटू न शकणे, अयशस्वी फलन, सदोष प्रजनन संस्था, पोषण घटकांची कमतरता, गर्भाशयाचा दाह, रेतनातील चुका, अयोग्य वेळी अथवा अयोग्य ठिकाणी केलेले रेतन. रेतपेशींचे दोष, भ्रूण लवकर मृत होणे- जसे कंपायलो बक्टर, ट्रायकोमोनस, लेपटोस्पयरा या रोगाचा संसर्ग होणे.

**उपाययोजना:** सुप्त गर्भाशयदाह निदान चाचणी करून आवश्यकतेनुसार गर्भाशयात औषधी सोडणे, तज्ञ पशुवैद्यकांच्या सल्ल्याने संप्रेरकांचा वापर, समतोल आहार, खनिज मिश्रणे, जिवनसत्वे यांचा वापर, कृत्रिम रेतन करणाऱ्यांनीसुद्धा गाई-म्हशी भरवण्यापूर्वी ... माजाची योग्य स्थिती असल्याची खात्री करणे, द्रवनत्र पात्रामधील नत्राची पातळी योग्य असणे, प्रमाणित रेतमात्रांचा वापर, रेतमात्रा योग्य तापमानास वितळवने आदी बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. गाई म्हशींची प्रसूती स्वच्छ निर्जंतुक वातावरणात व्हावी. प्रसूतीवेळी काही पशुपालक वासरांचे पाय हाताला माती- राख लावून दोरीने ओढतात, अप्रशिक्षित व्यक्तीकडून अशावेळी गर्भाशय हाताळले जाण्यामुळे संसर्गाची शक्यता वाढते.

**व्यवस्थापनाच्या चुकामुळे येणारे वंध्यत्व :**

**<u>कारणे:</u>** माजाची स्थिती न ओळखणे, योग्य वेळी कृत्रिम रेतन न होणे.

**उपाय-**

**<u>माजाची लक्षणे ओळखणे:</u>**

माजावरील गाई शेपटी उंचावतात, चारा पाण्याकडे दुर्लक्ष, अस्थिर असतात, वारंवार लघवी करणे, दीर्घकाळ ओरडणे, योनी लालसर व निरण सुजलेले दिसते, योनीमार्गे चिकट स्राव- बळस/ सोट येतो, दुसऱ्या जनावरांवर उडतात.

**<u>माजाच्या नोंदी ठेवणे:</u>**

माजावर आल्याची तारीख, माज किती दिवस टिकला, माजानांतर भरवलेली वेळ, उलटलेले असल्यास अगोदरची तारीख आदी नोंदी आवश्यक असतात.

**<u>कृत्रिम रेतनाची योग्य वेळ:</u>**

- गावठी गाई-म्हशीमध्ये माज दिसून आल्यास लगेच कृत्रिम रेतन करावे.
- देशी शुद्ध वंशाच्या गाई म्हशींमध्ये माज दिसून आल्यानंतर १२ तासांनी कृत्रिम रेतन करावे.
- संकरित गाई मध्ये माज दिसून आल्यानंतर २४ तासांनी कृत्रिम रेतन करावे.
- विदेशी गायींमध्ये माज दिसून आल्यानंतर ३६ तासांनी कृत्रिम रेतन करावे.
- व्यायल्यानंतर प्रथम दोन माजानंतर गर्भाशय तपासणी करूनच भरवणे अधिक संयुक्तिक ठरत असते. यासाठी पशुवैद्यकाच्या संपर्कात राहणे मार्गदर्शक ठरते.

## ईलाज करता पशुतज्ञ॥ वांझपणाचा सुटला प्रश्न॥

### सारांश



❖ गाईला वर्षाला एक वासरू आणि म्हशीला दीड वर्षाला एक वासरू जन्मावे याप्रमाणे नियोजन केल्यास दूध व्यवसायात प्रगती साधता येते.

❖ वयात आलेल्या व माज न दर्शविणाऱ्या सर्व कालवडी व पारड्यांची गर्भाशय तपासणी करुन त्यांच्या जननेंद्रीयाची पूर्ण वाढ झाली असल्याची खात्री पशुवैद्यकाकडून करणे.

❖ कालवडी, वगारीमध्ये प्रथमच येणारे दोन माज हे गर्भाशय तपासणीचे व तिसरा नियमित माज हा कृत्रिम रेतनाचा असावा.




❖ जंत, गोचिड व गोमाशाच्या प्रादुर्भावामुळे गाई-म्हशींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होवून वंध्यत्व येण्याची शक्यता असते. त्यामुळे गोठा व सभोवतालचा परिसर स्वच्छ व कोरडा ठेवावा, नियमितपणे बाह्यपरोपजीवी यांचे नियंत्रण आणि गाई-म्हशींमध्ये आवश्यकतेनुसार जंतनाशक औषधी पाजवणे तसेच जनावरांचे सर्व प्रकारचे लसीकरण नियमित करावे.

❖ गायी-म्हशींमध्ये माजाचे चक्र नियमितपणे दिसून येण्यासाठी पशुंना समतोल आहार व आरोग्य यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.





❖ पशुपालकांनी मोबाईलमध्ये गूगल प्ले स्टोअर मधून **ई-गोपाल** हे ॲप डाउनलोड केल्यास त्यामधील विविध भाग जसे पशुपोषण, स्वच्छ दूध उत्पादन, प्रजनन विषयक समस्यासाठी प्रत्यक्ष व्हिडिओद्वारे आयुर्वेदिक उपचार पद्धती आणि ती बनविण्याचे प्रत्यक्ष कृतीतून शिकता येते.

❖ **१९६२ भारत पशुधन** या ॲपमध्ये 'माझे पशू' या भागात ज्या पशुधनाला पशुआधार क्रमांकाचा बिल्ला मारलेला आहे त्याची माहिती, पशू बाजार या भागात खरेदीसाठी उपलब्ध जनावरे आणि प्रजनन विषयक बाबी जसे विर्यमात्राची माहिती, विविध शासकीय योजनांची माहिती पशुपालकांना पाहता येते.

# उन्हाळ्यातील दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन



**डॉ. प्रणिता गंगाधर मंमोड**
पशुधन विकास अधिकारी,
पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१
जामखेड,ता. अंबड जि. जालना




उन्हाळ्यातील वाढलेले तापमान, आर्द्रता आणि हिरव्या चाऱ्याची निर्माण झालेली कमतरता, यामुळे पशुधनाला उन्हाळ्यात उष्णतेचा त्रास जास्त प्रमाणात होत असतो. जसेजसे तापमान वाढत जाते, तसतशी प्राण्यांची शरीरातील उष्णता बाष्पीभवनाने बाहेर काढण्याची क्षमता कमी होते. परिणामी जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते, चारा खाण्याचे प्रमाण कमी होते तसेच पाणी पिण्याचे प्रमाण वाढते. याचा परिणाम जनावरांच्या दूध उत्पादनासह प्रजनन क्षमतेवर दिसून येतो व दूध उत्पादनात घट दिसते. याव्यतिरिक्त पशुधनाचे आजारी पडण्याचे प्रमाणही वाढते. याचा परिणाम पशुपालकाच्या आर्थिक उत्पन्नावर होतो. यामुळे उन्हाळ्यात दुधाळ पशुधनाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करुन पशुधनाची उत्पादनक्षमता टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## उन्हाळ्यात दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन कसे करावे?

❖ उन्हाळ्यात दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन करताना त्यांचे आहाराचे व्यवस्थापन, गोठा व्यवस्थापन व पाण्याचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असते.

❖ आहाराचे व्यवस्थापन करत असताना जनावराला देण्यात येणाऱ्या आहाराची वेळ बदलून त्यांना सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा आहार देण्यात यावा. जनावराला ऊर्जा मिळावी म्हणून कमीत कमी आहारातून जास्तीत जास्त पोषण तत्त्वे देणारा आहार पुरविण्याचा प्रयत्न करावा.

❖ हिरवा व सुका चारा देताना त्याची व्यवस्थित कुट्टी करून त्यात इतर पशुखाद्य मिसळून व्यवस्थित मिश्रण तयार करावे. त्यावर गुळाचे पाणी शिंपडावे, म्हणजे जनावरे आवडीने चारा खातात.


❖ उन्हामुळे कमी झालेली भूक व वाढलेली ऊर्जेची आवश्यकता यासाठी खाद्यामध्ये बायपास फॅट व पोटॅशियमयुक्त खनिज मिश्रणाचा वापर करावा

❖ उन्हामुळे अशक्त झालेल्या जनावरांना आजारांची लागण होऊ नये म्हणून वेळीच पशु तज्ञांकडून किंवा पशुवैद्यकाकडून जनावरांचे लसीकरण करून घ्यावे तसेच परजीवी जंतांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतनाशक पाजावे.

❖ गोठ्याचे बांधकाम शास्त्रोक्त पद्धतीने करावे. हवा खेळती राहावी यासाठी पंख्यांची व्यवस्था करावी. ज्या ठिकाणी तापमान कोरडे उष्ण आहे तिथे तापमान थंड व्हावे म्हणून गोठ्यात स्वयंचलित पाण्याच्या फवाऱ्याचा (फॉगर्स) वापर करावा.

❖ गोठ्यात जनावरांची गर्दी टाळून त्यांना थोडे अंतर ठेवून बांधावे. गोठ्याच्या आसपास दाट सावली देणाऱ्या झाडांची लागवड करावी, जेणेकरून जनावरे उन्हाच्या वेळी त्या झाडाच्या सावलीचा उपयोग करू शकतील. गोठ्याचे छप्पर एस्बेस्टोस या पत्र्याचे बनलेले असेल तर त्यावर चुना मारून घ्यावे किंवा गवत व सुका चारा टाकून त्याच्यावर पाणी शिंपडावे; जेणेकरून गोठ्याचे तापमान नियंत्रित राहील.

❖ दूध उत्पादनासाठी, रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत चालू ठेवण्यासाठी तसेच शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यासाठी जनावरांना पाण्याची आवश्यकता असते. म्हणून उन्हाळ्यात आहार व गोठा व्यवस्थापना बरोबरच पाण्याचे व्यवस्थापन करणे हे ही तितकेच महत्त्वाचे असते. जनावराच्या वयोमानानुसार व शारीरिक अवस्थेनुसार पाण्याची गरज बदलते. ही गरज भागवण्यासाठी त्यांना २४ तास स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक असते. तसेच जनावरांचे शारीरिक तापमान कमी व्हावे म्हणून त्यांना कमीत कमी तीन वेळा आंघोळ घालावी.





आहार पाणी आणि निवारा असेल सुयोग्य ।
तिथेच नांदेल जनावरांचे आरोग्य ॥

# प्रभावी जैवसुरक्षा उपाय योजना

## बर्ड फ्लू प्रसार रोखण्या करीता महत्वाचे साधन





**डॉ. भगतसिंग कदम**
सहाय्यक आयुक्त,रोगनियंत्रण, पसं-१२,
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

महाराष्ट्र राज्यात जानेवारी २०२५ पासून ११ जिल्ह्यातील १५ ठिकाणी बर्ड फ्लू (एविएन इन्फ्लूएंझा) रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. या उद्रेकापैकी ३ उद्रेक वन्यप्राणी पक्षांमध्ये व इतर १२ उद्रेक परसातील कुक्कुटपालन तसेच व्यावसायिक कुक्कुटपालनामध्ये आढळून आले. पशुसंवर्धन विभागाने केंद्र शासनाच्या बर्ड फ्लू करिताच्या सन २०२१ च्या सुधारीत कृती आराखड्यानुसार कार्यवाही करून परिसराचे निर्जंतुकीकरण, अंडी, पक्षी व खाद्य यांचे हालचालीवर निर्बंध आणून रोगाचा प्रसार इतर भागात होणार नाही, याची दक्षता घेतली आहे. नष्ट केलेले पक्षी, अंडी खाद्य इत्यादी बाबींसाठी शासकीय नियमानुसार सानुग्रह अनुदान वितरीत केले आहे.

बर्ड फ्लू हा पक्ष्यांमधील अतिघातक असा विषाणूजन्य आजार आहे. सदरचा विषाणू एंफ्लूएंझा विषाणू “अ” प्रकारातील असून त्याचे १६ एच व ९ एन असे उपप्रकार आहेत. विषाणूचे त्याच्या रोग निर्माण करण्याच्या क्षमतेनुसार कमी तीव्रतेचा व अति तीव्रतेचा असे दोन प्रकार करता येतात. यातील एच ५ या उपजातीतील विषाणू तीव्र स्वरुपाचा आजार निर्माण करतात.

### विषाणूची वैशिष्ट्ये :

कोरडे हवामान, उच्च तापमान, अतिनील किरणे विषाणूला निष्क्रिय करतात. ब्लिचिंग पावडर, फॉर्मलीन, आयोडीन आदी रसायनांमुळे विषाणू नष्ट होतो. थंड व ओलसर हवामानात विषाणू काही महिने टिकून राहू शकतो. कोंबडी खतांमध्ये विषाणू सहा दिवस टिकून राहू शकतो.




**रोगाचा प्रसार:** एविएन इन्फ्लूएंझा हा विषाणू स्थलांतर करणारे पक्षी, समुद्रातील पक्षी, वन्य पक्षी यामध्ये नैसर्गिकरित्या आढळून येतो. हे पक्षी रोगाचे वाहक म्हणून कार्य करतात. एविएन इन्फ्लूएंझा विषाणू अशा पक्ष्यांच्या आतड्यात नैसर्गिकपणे त्या पक्ष्यांना कुठलीही रोग लक्षणे न दाखवता वाढत असतात व त्यांच्या विष्ठेद्वारे विषाणूचा प्रसार होत असतो. बाधित विष्ठेद्वारे पाळीव पक्षी, बदके, कुक्कुटपक्षी, टर्की, लावा, बटेर व अन्य सस्तन प्राण्यांना हा आजार होऊ शकतो. हा आजार कोंबड्याद्वारे, वन्य पक्षाद्वारे मानवास होण्याची शक्यता अत्यंत कमी असली तरी सदर आजार एक पशूजन्य मानवी आजार असलेने सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने सतर्क राहणे गरजेचे आहे.

विषाणूचा प्रसार आजारी पक्षांच्या विविध स्त्रावांद्वारे, मृतपक्षी, दूषित भांडी, वाहने ,कर्मचारी व भेट देणारे लोक यांचे कपडे चप्पल बूट, इतर प्राणी जसे की पाळीव प्राणी, वन्यपक्षी, वन्यप्राणी, कीटक, उंदीर तसेच हवेवाटे धुलीकरणाद्वारे होतो. त्यामुळे हे टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची मात्रा योजणे आवश्यक ठरते.

## रोगाची लक्षणे

बर्ड फ्लू झाल्यावर पक्ष्यांमध्ये अशक्तपणा येतो, अंडी उत्पादन कमी होते, काहीवेळा विना कवचाची अंडी दिली जातात. पक्ष्यांच्या डोळे, मान व तोंडावर सूज येते. पक्ष्यांना श्वास घ्यायला त्रास होतो, सर्दी खोकला असू शकतो. तुऱ्यांवर लालसर पट्टे दिसून येतात. पक्ष्यांची हालचाल अनियमित होते, पक्षी थरथर कापतात, त्यांची विष्ठा पातळ होते, काही वेळेला त्याचा रंग पांढरा किंवा हिरवा असतो. काही पक्षी लक्षणे न दाखवता मृत होतात. पक्षांच्या मानमोडी, आयएलटी, फॉउल कॉलरा या आजारातही अशीच लक्षणे दिसत असल्याने पशुवैद्यकांना याबाबतची कल्पना देऊन प्रयोगशाळेद्वारे या रोगाचे निदान करणे गरजेचे आहे.

बर्ड फ्लू या रोगाविरुद्धची लस देशात उपलब्ध नसल्याने, प्रभावी सुरक्षा उपयोजनांचे पालन करून या रोगाचा प्रसार थांबविणे क्रमप्राप्त आहे.

## व्यावसायिक पोल्ट्री फार्म धारकांनी घ्यावयाची काळजी:

निर्जंतुकीकरण -गादी पद्धतीवर ठेवलेल्या पक्षांची विक्री होतात संपूर्ण गादीवर ५% फॉर्मलीन फवारावे. जमा केलेल्या पक्ष्यांचे लिटर फार्मवर जास्त वेळ ठेवू नये. शेड स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावे. शेडमधील कोपरे, फटी, भेगा, पिंजरे जाळून घ्यावेत म्हणजे यात असलेले सर्व जीवजंतु नष्ट होतील. एक किलो कॉस्टिक सोडा प्रती ५०० ते १००० चौरस फूट जागेस पसरावा व त्यावर पाणी शिंपडून ते एक दिवस ठेवावे. दुसऱ्या दिवशी संपूर्ण शेड पाण्याच्या फवाऱ्याने स्वच्छ धुऊन घ्यावे. पाच टक्के फॉर्मलीनचे द्रावण करून पुन्हा छतापासून ते जमिनीपर्यंतचा सर्व भाग स्वच्छ धुऊन घ्यावा. शक्य असल्यास शेड गरम पाण्याने पुन्हा धुवून काढावे. भांडी, पडदे, पाण्याने धुऊन जंतुनाशकाच्या द्रावणात एक दोन तास भिजत ठेवावे.

२. शेडच्या परिसरात वाढलेले गवत ,झुडपे,अनावश्यक झाडे काढून टाकावीत.

३.झिंक फॉस्फेटसारख्या औषधांचा वापर करून उंदीर घुशींचा नायनाट करावा.

४.आजूबाजूची जमीन नांगरट करावी व त्यावर पाच ते दहा टक्के फॉर्मलीन फवारणी करावी .

५. स्वच्छतेचे काम संपल्यानंतर रंगकाम करावे. चार किलो पांढरा चुना दहा लिटर पाण्यामध्ये मिसळून शक्य असल्यास त्यात जंतुनाशकाचे द्रावण योग्य प्रमाणात टाकून रंगकाम करावे शेडला बाहेरूनही रंग द्यावा .

६. **फ्युमीगेशन अथवा धूर करणे-** १००० घनफुटासाठी २०० ग्रॅम पोटॅशियम परमँग्नेट व ४०० मिली फॉर्मलीन मिसळावे व शेड २४ तास बंद ठेवावे. सध्या बाजारात काही नवीन उत्पादने उपलब्ध आहेत ज्यांच्यामुळे तयार होणाऱ्या वायूमुळे निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत असते

७. मृतपक्षांची त्वरित शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी, आजारी पक्षांना ओळखून तात्काळ पशुवैद्यकांचा सल्ला घ्यावा.

८. फार्मला भेट देणाऱ्या व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना प्रवेश निर्बंध लावावेत. प्रवेशद्वाराजवळ जंतुनाशक द्रावणाचे फुट बाथ ठेवावे व त्यामधूनच प्रवेश द्यावा.

९. शेडमध्ये नवीन पक्षी भरताना एक महिन्याचे अंतर ठेवावे . एक दिवशीय पक्षी ते विक्रीसाठी तयार होणारे पक्षी एकाचवेळी शेडमध्ये प्रवेश करतील व बाहेर जातील असे नियोजन करावे.

१०. शेडमध्ये येणाऱ्या खाद्य, पाणी व अंडी वाहून नेणाऱ्या वाहनांचे तसेच अंडी ट्रे, भांडी यांचे निर्जंतूक करण करावे.

११. फार्मवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन वारंवार हात स्वच्छ धुण्याची सवय लावावी.

१२. रोगप्रादुर्भाव कमी करण्यासाठी पशुवैद्यकाचा नियमित सल्ला घ्यावा, तसेच पशुसंवर्धन विभागाला वेळोवेळी रोग प्रादुर्भावाबद्दल माहिती उपलब्ध करुन द्यावी.



कुक्कुट पक्ष्यांमध्ये बर्ड फ्लू रोगाची लक्षणे दिसताच याबाबत नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधत आवश्यक माहिती पशुसंवर्धन विभागाला कळविणे, या रोगाच्या नियंत्रण व निर्मुलनासाठी आवश्यक आहे.



## परसातील कुक्कुटपालन / पाळीव पक्षी पाळणाऱ्यांनी अवलंब करायची जैवसुरक्षा व्यवस्था:

१. वन्यप्राणी तसेच उंदीर घुशीसारखे प्राणी अनेक विषाणू-जिवाणूंचे व परजीवीचे वाहक असू शकतात याकरीता कुक्कुट पक्षी व त्यांचे खाद्य व पाणी हे वन्यप्राणी, पक्षी खायला येणार नाहीत अशा ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे.

२. पक्ष्यांचे खाद्य जलरोधक भांड्यात हवाबंद परिस्थितीत ठेवावे जेणेकरून ते वन्यपक्षी व इतर प्राण्यापासून दूषित होणार नाही.

३. पक्षीगृहास जाळी लावून ते बंदिस्त करावे. पक्षी गृहाच्या छतावर पत्रा असावा; जेणेकरून वन्य पक्षांची विष्ठा शेडमध्ये पडणार नाही.

४. बर्ड फ्लूचे विषाणू माती व पक्षीगृहात असलेले तूस, भुसा, पेंडा यामध्ये अनेक दिवस जिवंत राहू शकतात, याकरिता खाद्य व पाण्याची भांडी, अंड्याचे ट्रे, अवजारे, पिंजरे, नियमितपणे स्वच्छ करावेत.

५. मृतपक्षी, खराब अंडी यांची ताबडतोब खोल खड्ड्यात पांढरा चुना टाकून विल्हेवाट लावावी. मृत पक्षी व अंडी चुकूनही उघड्यावर ,नदी पात्रात ,वाहत्या पाण्यात टाकू नये. मृत पक्षी व अंडी यांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावली तरच रोगप्रसारास आळा बसू शकतो.

६. आजारी पक्षी तात्काळ ओळखणे गरजेचे आहे.

७. अभ्यागतांचे चप्पल, बूट यांच्यामार्फत विषाणू आपल्या पिंजरा /खुराडे अथवा शेडमध्ये प्रवेश करू शकतो त्यामुळे इतर लोकांच्या भेटी बंद कराव्यात.

८. नवीन खरेदी केलेले पक्षी किमान ३० दिवस वेगळ्या ठिकाणी ठेवून स्वतंत्र व्यक्तीद्वारे त्याचे संगोपन करावे. विक्री न झालेले व बाजारातून परत आणलेले पक्षी किमान १५ दिवस वेगळे ठेवावेत.

९. पक्ष्यांमध्ये अनैसर्गिक मरतूक आढळल्यास तात्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात माहिती द्यावी किंवा १९६२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

## पशुसंवर्धनाची धरली कास

## परसातील कुक्कुटपालनाने झाला गावाचा विकास

माझे नाव अनिता बाबुराव गायकवाड असून, मी गोळेगाव येथील साक्षरता महिला स्वयंसहाय्यता समूह या गटाची सदस्य आहे. आमच्या गावामध्ये उमेद अंतर्गत १० ते १२ विविध बचत गट कार्यरत आहेत. तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औंढानागनाथ येथील डॉ. धर्माधिकारी यांनी आम्हा महिलांना पशुसंवर्धनविषयक विविध विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले. त्या अंतर्गत आम्हा महिलांना शेळीपालन, परसातील कुक्कुटपालन व दुग्ध व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित केले.



तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय व आय. व्ही. आर. आय. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. धर्माधिकारी व डॉ. बहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली परसातील कुक्कुटपालनाचा पायलट प्रोजेक्ट तयार करण्यात आला. सदरील प्रोजेक्टमध्ये गोळेगाव गावातील महिला बचत गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अनुसूचित जाती संवर्गातील महिला लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थितीचे अवलोकन करुन निवड करण्यात आली. याकरिता डॉ. धर्माधिकारी व डॉ. बहिरे यांनी परिसरातील विविध बचत गटातील इच्छुक सर्व महिलाचे प्रशिक्षण आयोजित करुन उपलब्ध जागेत कुक्कुटपालन करण्याकरिता मार्गदर्शन केले.

दि. १२ जानेवारी २०२१ रोजी आय.व्ही.आर.आय. पुणे व तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औंढानागनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने एस.सी.एस.पी. या योजनेअंतर्गत १३ महिलांना ४७ दिवसांचे कावेरी जातीचे प्रत्येकी ४० पक्षी वाटप करण्यात आले. या पक्ष्यांसोबत त्यांना खाऊ घालण्यासाठी १०० किलो खाद्य, दोन पाण्याची भांडी, दोन खाद्याची भांडी, एक शेडनेट जाळी इत्यादी कुक्कुट पालनाकरिता आवश्यक साहित्य मोफत वाटप करण्यात आले. या पक्ष्यांचे व्यवस्थापन व संनियंत्रण करण्यासाठी तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औंढानागनाथ या दवाखान्यामार्फत नियमित पाठपुरावा करण्यात आला.

साडेतीन महिन्यानंतर पक्षी अंड्यावर आल्यानंतर आम्हाला त्या पक्षांपासून उत्पादन सुरू झाले. दिलेल्या ४० पक्ष्यांपैकी जास्तीचे नर पक्षी विकून त्यापासून आम्हाला आर्थिक फायदा झाला व अंडी उत्पादनातील काही अंडी खुड कोंबडीखाली ठेवून त्यापासून पक्षी तयार केले. जास्तीची अंडी १५ रुपयाला एक याप्रमाणे विक्री करून दररोज ३०० ते ४०० रुपये याप्रमाणे आम्हाला आर्थिक फायदा होऊ लागला. यामुळे आम्हाला आमच्या कुटुंबासाठी लागणारा किराणा व भाजीपाला स्वबळावर घेता येऊ लागला व आमची आर्थिक उन्नती झाली, तसेच काही अंडी आम्ही आमच्या घरात खाण्यासाठी वापरली त्यामुळे आम्हाला उच्च प्रतीचे प्रथिनयुक्त अन्न भेटल्याने आमचे आरोग्य सुधारून रोगप्रतिकार क्षमता वाढली.





संकल्पित छायाचित्र

परसातील कुक्कुटपालनामुळे आम्हाला खर्चासाठी महिन्याकाठी ६ ते ७ हजार रुपये व वार्षिक ७० ते ८० हजार रुपये उत्पन्न प्राप्त झाल्यामुळे आमचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत झाली आहे. पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे परसातील कुकुटपालनाद्वारे गावामध्ये महिलांची आर्थिक उन्नती होत असल्याचे पाहून याची प्रेरणा घेऊन गावातील इतर महिलांनी परसातील कुक्कुटपालन व्यवसाय चालू केले आहेत. पशुसंवर्धनाच्या सहकार्याने गावातील गोरगरिबांचे आर्थिक उन्नती होत असल्याने आम्ही खूप समाधानी व शासनाचे आभारी आहोत.

**- अनिता बाबुराव गायकवाड**

# परसातील कुक्कुटपालन
## शाश्वत अर्थार्जनाचा एक उत्तम स्त्रोत

मी **गणेश दशरथ भोने**, बीड जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील शेतकरी असून, अनिश्चित बाजारभाव व निसर्गाच्या लहरीपणामुळे मला शेतीतून शाश्वत उत्पन्न प्राप्त होत नव्हते. त्यामुळे पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मी गेल्या चार वर्षापासून परसातील कुक्कुटपालन हा छोटासा शेतीपूरक व्यवसाय करत आहे. ज्यातून मला आता शाश्वत आर्थिक उत्पन्न मिळू लागले असून, हाच स्वयंरोजगार भविष्यात मोठा उद्योग म्हणून करण्यासाठी मी सध्या नियोजन करीत आहे.



परसातील कुक्कुटपालन सुरु करताना प्रारंभी बऱ्याच अडचणी आल्या. मात्र, कालपरत्वे, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे सर्व समस्यांचे निराकरण होत गेले. अगोदर आम्ही गावरान कोंबड्या मुक्तसंचार पद्धतीने खुल्या जागेवर पालन केल्या, परंतु तो प्रकार फार वर्षापासून चालू होता आणि त्यातून पुरेसे उत्पन्न होत नव्हते. शिवाय, अडचणीही भरपूर होत्या. खुल्या जागेवर पक्षीपालन करणे म्हणजे जोखीम पत्करणे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही, कारण की खुल्या जागेवर मोकाट कुत्रा, रानमांजर, मुंगूस, घार आदींच्या मार्फत कुक्कुट पक्ष्यांची शिकार करण्यात येत असते. अशा स्वरुपाच्या अनेक समस्या होत्या, म्हणून काहीतरी वेगळे करावे असे वाटत होते.

मी ऑगस्ट २०१९ मध्ये गावरान कोंबडीपालन परसातील कुक्कुटपालनाच्या माध्यमातून करण्यास सुरुवात केली. जवळपास तीन गुंठे जागेमध्ये बाजूने कंपाउंड केले, त्यामध्ये झाडे लावली. मधोमध एक झोपडी तयार केली व त्या झोपडीमध्ये लाकडाचे 'आटोळा' तयार केला. आटोळा म्हणजे पक्षांना बसण्यासाठी लाकडाची जाळी. गावरान पक्षी हा खाली जमिनीवर न बसता उंच ठिकाणी किंवा झाडावर बसण्यास अधिक पसंत करत असतो. साईड कंपाउंड हे लोखंडी जाळी, अँगल, आणि पॉलिहाऊसचे नेट यापासून तयार केले व त्यावर बाहेरील बाजूंनी मासोळीची जाळी लावली. मासोळीची जाळी याकरिता की त्यावरून रानमांजर व मुंगूस आत मध्ये येता कामा नये.

सुरुवातीला मी पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने व डॉ. दिपक धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाने २०० सुधारित देशी गावरान कोंबड्यांची पिल्ले आणली. यामध्ये तीन ते चार महिन्यात गावरान कोंबड्या विक्रीस उपलब्ध होतात तसेच चार ते पाच महिन्यात ते अंडी देण्यास सुरुवात करतात. तसेच गावरान कोंबड्या खाद्यामध्ये शेतीतील कोणतेही धान्यास पसंती देत असतात. त्यामध्ये गहू, तांदूळ, मका, ज्वारी इत्यादी त्यांचे प्रमुख आवडीचे खाद्य आहेत तसेच त्यांना हिरवे गवत भाजीपालाही खूप आवडतो. आमच्या इथे भाजीपाल्यांची शेती केली जाते, त्यातून जो खराब व शिळा झालेला भाजीपाला असतो तो बारीक करून आम्ही कोंबड्यांना टाकतो. कोंबड्या असे खाद्य आवडीने खातात.



बाजारपेठेत गावरान कोंबड्यांना चांगली मागणी असते. पक्षांची विक्री ही जागेवरूनच होते, शिवाय पक्षांसाठी केलेले नियोजन पाहून ग्राहक आकर्षित होतात व विश्वासाने गावरान पक्षी भेटला याची त्यांना खात्री होते. गावरान कोंबडीबरोबरच तिच्यापासून उत्पादीत गावरान अंड्यांनही चांगली मागणी असते. ग्राहक फोन करतात आणि १०, २०, ३० अशा संख्येने अंड्यांची ऑर्डर घेतल्या जाते व ग्राहकापर्यंत घरपोच दिली जाते. ग्राहकांना माझी ही मार्केटिंग आवडील व मागणीसुद्धा वाढली. बऱ्याचदा अंड्यांचा पुरवठा कमी असल्यास काही ग्राहकांना दोन-तीन दिवस वेटिंगवर ठेवावे लागते. परसातील कुक्कुटपालनातून आम्हाला चांगले उत्पन्न मिळते आहे. २०० पिल्लांचा हिशोब लावला तर महिन्याला खर्च वजा जाता १५००० रुपये नफा मिळतो. सुरुवातीला तीन महिने काही उत्पन्न मिळत नाही, कारण की पिल्ले लहान असतात. तीन महिन्यानंतर पुढचे आठ ते नऊ महिने चांगला व्यवसाय चालतो. वर्षाला एक बॅच आम्ही नियमित घेतो. अशाप्रकारे परसातील कुक्कुटपालन शेतीसाठी एक छोटासा जोड धंदा म्हणून फायदेशीर ठरतो.

- **श्री. गणेश दशरथ भोने,** शिक्षण- एम.ए.-बी.एड, मोबाइल नं:- ९१५८४७९४४२





# जनावरांची काळजी घेणार पशुसखी, केंद्र सरकारची योजना अनोखी!



**डॉ. सुनील देशपांडे**
पविअ (वर्ग-१), पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१
कुडाळ, ता. जावळी, जि.सातारा.
मो.क्र.९४२३८६५४५८




**अक्कासाहेब:** रखमा ए रखमा, कुठं निघालीस गडबडीत ?

**रखमा :** अहो , चाललेय गुरांच्या दवाखान्यात. आमची चंद्रा म्हस औंदाच्या माजाला गाभ धरली नाही तर भाकड पोसावी लागंल, म्हून डॉक्टरसाहेबास्नी गळ घालायचीया! आता तरी येळ काढा म्हणून!

**अक्कासाहेब:** खरंय! डॉक्टर तरी काय करणार! त्यांच्या मागे शंभर व्याप! त्यात कार्यक्षेत्रात पाच-पंधरा गावं, नुसती गावं नाही, प्रत्येक गावाच्या वाड्या तीन-चार! आणि दवाखान्यात येणाऱ्या जनावरांवर करावाच लागतो उपचार! त्यात लिखापढी, मिटिंगा, रजिस्टरं यांचाही व्याप फार!

**रखमा:** होय, तर अक्कासाहेब! कधी, कधी वाटतंय; मलाच यातलं माहिती असतं थोडफार, तर ब्येस झालं असतं काम!

**अक्कासाहेब:** रखमा, तुझ्यासारख्या धडपड्या, उत्साही, बचत गटांच्या महिलांसाठी चालून आलीय सुवर्णसंधी!

**रखमा:** कसली हो अक्कासाहेब , सांगा बरं आधी?

**अक्कासाहेब:** केंद्र सरकारची योजना आलीय अनोखी ! गावातल्या जनावरांची काळजी घेणार पशुसखी!

**रखमा:** अक्कासाहेब, सगळं कसं बायजवार सांगा, पशुसखी म्हंजी काय? कोण? आमची जित्राबं, आमची लक्ष्मी आमचं धन. त्यांच्यासाठी आम्ही काय पण करू!

**अक्कासाहेब:** जनावरांच्या दवाखान्याचं प्राथमिक काम करेल पशुसखी! ड्युटी तिची असेल आशा वर्करसारखी !

**रखमा:** म्हंजी जिथं डाक्टर कमी, तिथं आम्ही! असच नव्हं?

**अक्कासाहेब:** होय! अगं, राज्यभर प्रत्येक दवाखान्यासाठी किमान एक पशुसखी असणार; डॉक्टरांच्या सल्ल्याने दवाखान्याची अनेक कामं ती करणार!

**रखमा:** म्हणजे जरा ईस्कटून सांगा की! काय काय करंल ही पशुसखी?

**अक्कासाहेब:** प्रशिक्षण घेऊन करेल ती जनावरांवर प्रथमोपचार! खुपलं, नडलं गुरांना, तर तीच गावाचा पहिला आधार!

**रखमा:** बरं, आस्सं व्हय? हे मग भारीच हाय!

**अक्कासाहेब:** ह्रमम! जंतनाशक, खनिज मिश्रण, टॉनिक ठेवून सोबत अख्खी गावकऱ्यांना वाटून, दुवा गुरांची घेईल पशुसखी! सांगेल पशुसंवर्धनच्या योजना, लाभ होईल गावा! पशुडॉक्टर आणि पशुपालकांमधला होईल ती ग दुवा!




**रखमा:** व्वा! व्वा!

**अक्कासाहेब:** वंचित, दुर्लक्षित लोकांपर्यत पशुधन योजना पोचवण्याची करेल ती निश्चिती! विमा अन् एन डी एल एम नोंदणी यांची गावकऱ्यांना पटवेल महती! सांगून "आधार" सारखी याची कॉम्प्युटर नोंद होती! घेईल पशु शिबिरे आणि अन् करेल जनजागृती! वेळोवेळी गावातील जनावरांच्या लसीकरणाची करेल खात्री! वाचवून , वाढवून त्यांना, पशुधनाशी करेल मैत्री!

**रखमा:** वेळेवर गुरे गाभण नाहीत, त्याचं काय करायचं? डाक्टरास्नी नस्तिया कधी कधी सवड, त्याचं वो काय करायचं?

**अक्कासाहेब:** ट्रेनिंग घेऊन पशुसखीने कृत्रिम रेतन शिकायचं! डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार स्वयंपूर्ण व्हायचं!

**रखमा:** आणि अक्कासाहेब, तिच्या कामाचं टायमिंग किती? तिनं सोत्ताचं घर, गुरं, रान बघायचं कधी?

**अक्कासाहेब:** अगं, पशुसखीने द्यायचे आठवड्यातील चार दिवस, त्यातले फक्त दोन तीन तास!

**रखमा:** हम्म, अक्कासाहेब, समजा बनलो पशुसखी, तर नुसतंच व्हय राबायचं? केलेल्या कामाचं पैकं कुणी वो द्यायचं?

**अक्कासाहेब:** रखमा , हे पद तसं मानाचं असणार! शासन जे काही मानधन नियमात असेल ते नक्की देणार!

**रखमा:** पण, कोणीबी होतंय का पशुसखी? काही नियम, अटी असतील तर सांगा की!

**अक्कासाहेब:** सांगते हां रखमा. ऐक. पशुसखी महिला किमान आठवी पास असावी. केंद्र शासनाच्या बचत गटाची सदस्य ती असावी. बोलण्यात हुशार आणि नेतृत्वात तयार असावी. घराबरोबर समाजासाठी काहीतरी करण्याची तिची इच्छा असावी!


**रखमा:** ब्येस दिलीत माहिती, आता बिगिबिगी गुरांच्या दवाखान्यात जाते! डॉक्टरांशी चर्चा करून आमच्या गावाची पशुसखी मी होते!

महाराष्ट्र शासन

# पशुसंवर्धन विभाग

# उन्हाळ्यात पशुधनाची काळजी घेण्यासाठीच्या उपाययोजना

Government of Maharashtra




१. भरपूर पाणी पिण्याकडे कल
२. कोरडा चार न खाणे
३. हालचाली मंदावणे
४. सावलीकडे स्थिरावणे
५. शरीराचे तापमानात वाढ

६. जोरात श्वास घेणे
७. भरपूर घाम येणे
८. उत्पादनात कमी येणे
९. प्रजनन क्षमता कमी होणे
१०. रोगप्रतिकार शक्ती कमी

अधिक माहितीसाठी खालील ठिकाणी संपर्क साधावा
नजीकचा शासकीय पशु वैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभागाचा टोल फ्री क्र. १८०० २३३ ०४१८ अथवा
मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेचा टोल फ्री क्र. १९६२

## काय करावे

- जनावरांना शक्यतो सकाळी व संध्याकाळी ऊन कमी असताना चरण्यास सोडावे.
- हवामानपूरक सुधारित गोठे बांधावेत. गोठ्याची उंची जास्त असावी, जेणेकरून गोठ्यात हवा खेळती राहील.
- छप्पराला शक्यतो पांढरा चुना / रंग लावावा. तसेच त्यावर पालापाचोळा / तूराट्या / पाचट टाकावे. ज्यामुळे सूर्याची किरणे परावर्तीत होण्यास मदत होईल.
- परिसर थंड राहण्यासाठी गोठ्याच्या सभोवताली झाडे लावावीत. मुक्त संचार गोठ्याचा अवलंब करावा.
- गोठ्यामध्ये वातावरण थंड राहण्यासाठी पाण्याचे फवारे, स्प्रिंकलर्स यासोबत पंख्याचा वापर करावा.
- दुपारच्या वेळेस गोठ्याच्या भोवती बारदाणे, शेडनेट लावावेत व शक्य असल्यास त्यांना पाण्याने भिजवावे, जेणेकरून उष्ण हवा गोठ्यात येणार नाही व आतील वातावरण थंड राहील.
- जनावरांना मुबलक प्रमाणात थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करावे.
- बैलांकडून शेतीची मशागतीची कामे शक्यतो सकाळी व संध्याकाळी कमी उन्हात करून घ्यावीत. यावेळी त्यांना पाणी जास्त प्रमाणात उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी. आवश्यकतेनुसार पाण्यामध्ये मिठाचा वापर करावा.
- उन्हाच्या ताणामुळे जनावरांची भूक मंदावते. त्यामुळे शक्यतो थंड वातावरणात त्यांना चारा टाकावा.
- म्हशीच्या कातडीचा काळारंग व घामग्रंथींच्या कमी संख्येमुळे उष्णतेचा त्रास त्यांना गाईपेक्षा जास्त होतो. त्यामुळे त्यांची अधिकची काळजी घ्यावी.
- योग्य पशूआहार, मुरघासचा वापर, निकृष्ट चाऱ्यावर यूरिया प्रक्रिया करून दिल्यास उन्हाळ्यात सुद्धा आवश्यक दुग्ध उत्पादन मिळवणे शक्य आहे.
- जनावरांना वेळोवेळी जंतनाशक औषधी पाजावी, जनावरांचे नियमितपणे लाळ्या-खुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार इत्यादी रोगप्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.
- पशूखाद्यामध्ये मिठाचा वापर व पाण्यामध्ये इलेक्ट्रोलाइट यांचे योग्य मिश्रण करून वापरावे तसेच दुधाळ पशुंना संतुलित पशुआहारासोबत खनिज मिश्रणे द्यावेत. चाऱ्यामध्ये एकदम बदल करणे टाळावे.
- पक्ष्यांच्या घरट्यामध्ये तापमान नियंत्रक व्यवस्था असावी.
- मृत जनावरांची विल्हेवाट लावताना ती जागा पाण्याच्या तलावापासून, सार्वजनिक ठिकाणापासून दूर व संरक्षित असावी आणि तेथे या संबंधीच्या आवश्यक माहितीचा फलक असावा.

## काय करू नये

- कडक उन्हात जनावरांना चरावयास सोडू नये.
- पाण्याचे लोखंडी हौदामधील गरम झालेले पाणी पाजणे टाळावे.
- जनावरे दाटीवाटीने गर्दीने जवळ बांधू नयेत.
- मृत जनावरांची विल्हेवाट नियमित चराऊ कुरणाच्या ठिकाणी करू नये.